# चांदणवेळा

## शुभांगी पासेबंद



# चांदणवेळा

## शुभांगी पासेबंद

ई साहित्य प्रतिष्ठान

# चांदणवेळा


## लेखिका : शुभांगी पासेबंद

Address : 202,Anandi Bhuvan Veer Savarkar Marg, opp Maharashtra Vidyalaya. Thane (West) 400602.
मो.नं. 9869004712, 02225345992
मेल- scpaseband@gmail.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

**WA- 9987737237**

esahity@gmail.com

ई प्रकाशन : १३ एप्रिल २०२२ (चैत्र शु. द्वादशी शके १९४४)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**अर्पणपत्रिका**

**13/4/22**

**हे माझे 37 वे पुस्तक**

**कथासंग्रह 'चांदणवेळा'**

**अत्याचाराचे बळी पडलेल्या महीलांना**

**समर्पित आहे।**

**शुभांगी पासेबंद**

# अनुक्रमणिका

## चांदणवेळा

1/ चांदणवेळा (शीर्षक कथा)

2/ मुझे जीने दो

3/काचेचे घर

4/ मधुमालती

5/ अदलाबदल

6/ सुपारी हवेली

7/चौकोन

8/खजिना विहीर

9/ विकेंड होम

10/मी अशी,गुलाम?

चांदणवेळा ,कथेतील नायिका ,तिच्यासह ,हे पुस्तक अंतर्मुख करते.हे शोषित नायिकांचे कथांचे कथन आहे.या नव युगाचे नायिका आहेत.आधुनिक आहेत,तरी पारंपरिक ताण सोसतात.कधी बंडखोरी करतात पण दुबळ्या व्यक्तीचे बंड लवकरच समाज थंड करते.कधी या शोषित ठरतात.

सदरील कथासंग्रहामधील सर्व कथा ह्या काल्पनिक असून कथेतील नावं, स्थळं आणि पात्रं हे देखील काल्पनिक आहेत. या कथेतील नावे आणि पात्रे वास्तवातील कोणाशी जुळत असतील तर तो निव्वळ योगायोग समजावा.

# चांदणवेळा

# 1 चांदणवेळा

"चांदणे चांदणे झाली रात
एकविरेची पाहत होते वाट!
पाऊस सारी घेऊन आलीय रात
हिंग्लज मातेची पाहत होते वाट"

भाग्यलक्ष्मी च्या देवळात, संध्याकाळची देवळातील संध्या आरती झाल्यावर पूजा आटोपून मंडळी आपापल्या घरी जात असत. मोरगावी रात्री मंदिरा समोरील मंडपात मंडळी जमून चर्चा, करमणूक असे कार्यक्रम करीत असत. वादविवाद करीत, फुकटचा मोठेपणा, इतरांना शिकवला जाणारा शहाणपणा असाच तो कार्यक्रम असे. माझे आजोबा आणि काका खाप पंचायत चालवल्याच्या थाटात, लोकांची प्रश्न, भांडणे सोडवीत असत. त्याबद्दल कुळ चार -पाच नारळ, शिंगाडे, फुले, फणस, आंबे असे भेटीचे खाद्यपदार्थ घरी आणून देत असत.

त्या मोरगावी, गावात काकांच्या व आजोबांच्या शब्दाला मान होता. माझे वडील त्या दोघांच्या तुलनेत कमी हुशार होते. ते फक्त ऐकून घेत असत व घरी येउन घरच्यांवर आम्हा भावंडांवर रुबाब गाजवीत. काकांपुढे त्यांची शब्द काढायची हिम्मत होत नसे.

माझे आजोबा प्रेमळ होते, पण काका रागीट होते. घारे डोळे फिरवून ,आम्हा मुलांकडे बघत असत. वेळप्रसंगी एखादा फटका देखील मारत असत. मुलींच्या वेण्या ओढत असत. मी रागीट व हटटी होते. त्यांच्या नजरेला नजर देऊन बघत उभी राही. त्यावेळी काका हातातली काठी ,माझ्या पाठी मारत असत. एकदा त्यांना वेडावून मी पळून जाऊ लागले तेव्हा त्यांनी माझा हात घट्ट पकडला. त्यावेळची त्यांची ती विचित्र नजर, तो हावरा स्पर्श, न कळत्या वयात सुद्धा खूप बोचला. पुरुषांना विरोध करण्या ऐवजी स्त्रीवरच बंधने घातली जातात. ते सोपे असते. त्याचवर्षी आजोबा वारले. मी मोठी झाले. अंगणात सागरगोटे, झोके,लंगडी, लगोरी खेळणे कमी झाले. त्यातही कधी खेळताना काका आपल्याकडे बघत आहेत, हे जाणवले कि मी गोठून जात असे. माझे वडील मला हिडीस फिडीस करीत असत. मुलगी म्हणून माझा राग राग करीत होते. काका अंगाला हात लावतात हे मला न आवडून एकदा मी आईला म्हणाले,

"आई, काकानि  माझा हात पिरगळला"

"तू मस्ती केली असेल" आई रागावून म्हणाली.

"ते अंगावर हात फिरवतात." मी नाराजीत बोलले. मला बरेच काही सांगायचे होते. जे ती  आई , बाई ,समजून घेईल असे मला वाटले होते. पण तिने मला गप्पच केले.

"भावाभावात भांडणे होतील. तुझीच बदनामी होईल." असा धाक घालून मला गप्प केले. रात्री आई मला जवळ घेऊन झोपू लागली. मोरगावी मला एकटे राहावे लागेल ,असे प्रसंग टाळायचा ती प्रयत्न करू लागली.

आई ,साधी सरळ बाई होती.घरात रमणारी. नातेवाईकांच्या टीके ,तिला घाबरवणारी होती.

नवऱ्याचे खेकसणे सोसणारी माझी आई , ती काय सल्ला देणार? ती स्वतःच हताश होती. बघा जर स्वतःच्या घरात मुलगी जर इतकी असुरक्षित आहे तर हिचे बाहेर कसे होईल? या विचाराने घाबरत होती. त्यामुळे तिला मी नकोशी झाले.

त्या मोरगाव खेड्यात, सर्वजण काळे सावळे होते. बहुतेकांची त्वचा रापलेली होती. त्या सर्वांमध्ये मी गोरी होते. आमच्या घराचे आजोबा ,ज्या देवळात पुजारी म्हणून काम करीत असत.त्या देवळातील वेगवेगळे उत्सव हे नातेवाईकांचे एकत्र जमण्याचे ठिकाण होते. त्यावेळी आई मला खूप जपत असे. धोका घरातसुद्धा असतो, हे तिला जाणवले होते. भाग्यलक्ष्मी मंदिरात नातेवाईकांचे हेवेदावे, खाणेपिणे, कपडे खरेदी हेच विषय असत. घराण्याच्या त्या हिंग्लज देविसाठी घराण्यातील एक तरी मुलगी बिनलग्नाची राहते. घराण्याला तो शाप आहे, असे त्या अर्धवट वयात मला कळले. अशा लग्न न करता राहिलेल्या मुली मोरगावी समाजासाठी देवदासीचे जिणे जगत होत्या.

माझे आजोबा जीवंत होते, जुना काळ होता. संस्कार चांगले होते. तो पर्यंत त्या मुली ठीक होत्या.पण आजोबा वारले.मोरगावात भाग्यलक्ष्मी मंदिरातील आंदोल दासींची परिस्थिती बिघडायला सुरुवात झाली.

काकांच्या राज्यात, देवळात त्या खोल्यात ,भलत्या वेळी भलत्यांची, प्रामुख्याने काकांची ये -जा सुरु झाली. देवीचे उत्सव वगळता बाकी वेळी देऊळ सुने असे. आजोबांनी या मुलीना शिक्षण घेऊन पायावर उभे राहा असे सांगितले होते. पण आजकाल नोकरी कुठे मिळते?आजोबांनी कपडे शिवून, पूजा सांगून, काडी-चटया मणी माळा विणून,विणकाम केलेल्या साड्या, शाली विकून या आंदोल दासींची जीवने सुधारली. स्त्रिया स्वयंपूर्ण बनल्या होत्या.

पण आनंदी अशा काकांनी या मुलीना नव नृत्य शिकवले. देवीचे कलास्तरीय नृत्य, देविपूजन, भल्लेरी कलाकाम, हळूहळू करमणूकीकडे वळू लागले. मोरगाव धास्तावले पण गावकरी काकांच्या पंखाखाली सर्वजण वावरत होते. त्यामुळे कुणीही ब्र काढला नाही.

काकांचा मुलगा ,माझा पुतण्या चांगला शिकला. सात किमी अंतरावरील कुणे नाव असलेलया शहराच्या ठिकाणी त्याने बंगला बांधला. लग्न केले. वेगळे घर थाटले. ते कुणे शहर मोठे होते. अनेक मोठ्या इंग्रजी शाळा, कॉलेजेस तिथे होती. मुला सुनांबरोबर काका-काकू तिथे गेले. मात्र त्या खास कामासाठी, मोरगावी मंदीरी मागच्या खोल्यांना भेट देणे ,या छंदा साठी काका, मोरगावी वारंवार येत होते.

ऋतू बदलले. मी अठरा वर्षाची सुजाण मतदार झाले. मोरगावच्या शाळेतून दहावी पास केले. पुढच्या शिक्षणासाठी बस पकडून कुणे शहरात जावे लागे. कधी ट्रेनने जावे-यावे लागे. खूप लवकर उठावे लागे. खूप खर्च होत होता. मोरगावी ,घरी बाबा अधिकच चिडचिडे झाले होते. सारखे आईशी भांडत, वेळ प्रसंग आईवर हात देखील उगारत असत. घरात वातावरण खूप खराब होते. मी आल्यावर आई बाबांची अधिकच भांडणे होत असत. चांदणवेळी ते बिथरत, करकर करीत असत. आजी त्यांना "बाधा झाली " म्हणे. मी कुणे शहरात वसतिगृह (मुलींचे) बघायचा प्रयत्न केला. पण ते परवडण्या सारखे नव्हते. नापास झाले असते, तर शिक्षण बंद झाले असत. कुणे येथे,कॉलेजात माझ्या सुंदर दिसण्याचे, गोऱ्या रंगाचे कौतुक होई. मोरगावी ,घरी मात्र मी नकोशी होते. संध्याकाळी कातर मनाने मी घाबरून जाई. 'आज काय वाढून ठेवलय नशिबात देव जाणे' असा विचार येवून, अस्वस्थ वाटून चांदणवेळा हैराण करून सोडत असे. चांदणवेळा झाली कि मला खूप कसेसे होई,अंग खाजू लागे. ताप चढल्या सारखे वाटते. आई वडिलांच्या भांडणामुळे काका अधिक धीट झाले होते. मला त्यांच्या नजरेची भीती वाटे.

अंगा खांद्यावर खेळवलेली मुलगी तरुण झाली म्हणजे आपण वृद्ध झालो हे सत्य विकृत पुरुष का विसरतात? प्रवासाला कंटाळून शेवटी कुणे गावी काकूंकडे ३ दिवस राहून मी चवथ्या दिवशी घरी येई. काकांची भीती वाटे पण काकूंचा आधार वाटला म्हणून राहिले. त्याचवेळी मला टायफॉईड झाला. तापातून उठले पण मोरगाव ते कुणे,प्रवास करायची शक्ती नव्हती. पंधरा दिवस

काकूंकडे शहरात राहिले. सोळाव्या दिवशी मोरगावी जायचे होते. पहाटेची गाडी पकडणार होते.

त्या पहाटे काका माझ्या जवळ आले. माझ्या पांघरुणात शिरून त्यांनी माझे तोंड दाबले. मी ओरडायचा प्रयत्न केला, हात पाय झाडले. पण माझा प्रतिकार कमी पडला.

काकांकडून रडत रडत मी सामान भरले, मोरगावी परत जाऊन मी कधीही परत येणार नव्हते. मी मोरगावी परत गेले. पोटात पाणी सुद्धा नव्हते. माझे कपडे घामट होते. जखमा होत्या. घरी जाऊन आईला मिठी मारली व म्हटले,

"आई मी परत कुणे येथे जाणार नाही. इथूनच शिकेन".

"बये, तुझीच कमी होते. कशाला जन्माला आलीस, अवदसे! घरची भांडणे, बाबांना तू आवडत नाहीस. कशाला आलीस? जीव दे.मरायचे तिथे कुणे येथे "

आई मला मारू लागली. मी जखमी होतेच, आईचे वागण्याचे अधिकच दुःख झाले. रात्री शांतता झाल्यावर मी आईला म्हंटले,

"काका जवळ येतात. आई बाबांना सांग त्यांना समजवा.सांगा मी त्यांच्या मुली सारखी ,मुलीच्या बरोबरचीच आहे."

आई म्हणाली, "भांडणे होतील, नाती तुटतील"

"आई मुलीचे आयुष्य तुटतेय आई!" मी रडत आईला म्हटले.

"गप्प बस, त्यातच तुझे हित आहे" आई मुसमुसत ,दुरवर बघत म्हणाली.

काकांना विरोध कुणी केला नाही. माझ्यावर नैराश्याच्या ,अंधश्रद्धेने उपवासाचा,औषधांचा भडीमार केला.  कॉलेज बुडवून मी आठवडाभर मी मोरगावच्या घरी राहिले. ते मंदिर ते नातेवाईक, ती शक्तिहीन देवी, मला नकोशी वाटे. अबलांचे रक्षण न करणाऱ्या त्या देवाला भाग्यलक्ष्मि  म्हणायचे? सिंहावर बसलेली देवी फक्त मूर्ति?शक्तीहीन?कि मी अभागी होते? त्या मोरगावात ,खोलीत राहणाऱ्या अनाथ मुली व मी आमच्यात काय फरक होता? आई व मी आम्ही दोघीहि , काकू ,त्या सर्वजणी, शोषितच होतो. चांदणवेळी तर मी अधिकच दुःखी होवून जाई.मला रडू येई. अश्रू आटेना. नकोशा मुली हि भाग्य लक्ष्मी का जन्माला घालते?

असे वेदात म्हटले आहे कि पुरुषांना हिंसाचार कमी व्हावा म्हणून देवाने पुरुषांच्या मनात स्त्री बद्दल शारीरिक आकर्षण सोबत थोडे प्रम पेरले. पण पुरुषांची हिंसा संपली नाही. शारीरिक आकर्षण हिंसक झाले.

भाग्य लक्ष्मिची पूजा करणारा पुरुष ,काका,बाबा,हे पत्नीला,मुलीला मारहाण करीत. आईला मी म्हटले, "मी सुद्धा या खोल्यां मधील एका खोलीत राहू का”?

आई रागावली. "असे करू नको,लोक काय बोलतील?" म्हणाली.

मोरगावी घरातील भांडणे चालूच होती. परीक्षेचे दिवस जवळ येत होता. मोरगावी,मी मूड लागला तर अभ्यास करीत असे, अन्यथा भाग्यलक्ष्मि मंदिरातील पायरीवर रडत बसू लागले. मात्र मला त्या वाईट, सर्व प्रसंगांतून बाहेर पडण्यासाठी पुढे शिकायला हवे होते. इथेही मोरगावी ही,काकांकडून धोका

होता कि काय? मला काकांनी त्रास द्यावा? शत्रू घरात का असावे? देव देवळातून कुठे गेले?

देवाने निदान देवळात तरी असावे ।

असे देव रक्षण करतात का?

थोड्या फार अभ्यासावर मी परीक्षा द्यायचे ठरवले. कुणे गावी परीक्षेचा दिवस आला. देव हि कल्पना अगतीकतेतुनच जन्माला आली असावी. मी पहाटेची गाडी पकडून मोरगाव हून,विमनस्कपणे कुणे येथे कॉलेजला परस्पर गेले. परीक्षा दिली व रात्र झाली होती तरीही कुणे येथे,बस पकडून परत मोरगावी घरी आले. बस स्टॅन्ड वरून घरी येईपर्यंत भीती वाटत होती. मुलगी, स्त्री कुठेही सुरक्षित नसते. अंधारात नाग सापांपेक्षा, पापी पुरुषांची भीती वाटत होती. ते मोरगावचे घर तरी माझे कुठे होते? मी तिथेही नकोशी होते. पण बाईला पर्याय कुठे असतो? माहेरी, सासरी, पाहुणघरी, दारी ,स्त्री म्हणजे देह असतो. मन नसलेला देह असे समजले जाते.

'बाई ,हात असते राबणारा,

देह दागिना सजणारा.'

पेट असते,रक्षणाची गरज असणारा.

बाई हा ,एखादा कामगार,

दुय्यम प्रतीचा मानला जाणारा ,

पण दुप्पट काम करणारा !

समाजाचे नजरेत बाई कामगार असते. स्त्री देह दागिना असतो. या देशात चोरांची, गुंडांची कमतरता नाही. रक्षणकर्त्या व्यक्तीची आहे. मी मोरगावी देवळा पर्यंत आले.भाग्यलक्ष्मि मंदिरातील ,लहान देवळात आई रडत बसली होती. माझी वाट बघत होती. मला जवळ घेऊन रडू लागली. आम्ही दोघी खूप वेळ रडलो. दोघीही अबला होतो.

सबळ पुरुष,बाप ,घरचे मालक,फक्त स्त्री उपभोगण्याची कर्तृत्व करत ,घराची मालकी सांगणे यात सबळ होते. बाकी असे फालतू होते. माझी आई तरी कुठे सुखी होती. वरकरणी बरी दाखवत होती. मी माझ्या मोरगावी खेड्यातल्या घरी आले. परीक्षा संपल्याने सुट्टी होती. घरी पैसा असूनही मुलींवर खर्च न करणारे, भिकारी असे ते घर, गावातील श्रीमंत घर होते.

समाजात असे चालवले जाते. मी सुट्टीत भाग्यलक्ष्मी मंदिरातील पायरीवर आकाश कंदील करून विकले. त्या पैशांचा आधार मला वाटला.

त्यामुळेच शिक्षण पूर्ण करून स्वतःच्या पायावर उभे राहावे हि मनाची इच्छा प्रबळ झाली. आई तिला घटस्फोटाची हिम्मत नाही ,निर्णय सोपा नाही म्हणून, मी पर्याय नाही म्हणून त्या घरात ते रॅगिंग सोसत होतो. का? कारण परित्यक्ता स्त्री अधिक, कायम घरीसुद्धा असुरक्षित असते. त्यापेक्षा विवाहिता हे बीरूद लाऊन ,घरात त्या रक्षणकर्त्या वॉचमन बरोबर ,राहणे ठीक असते.

अनेक संसार असे चालत राहतात. बाई मूर्ख अकार्यक्षम आहे, म्हणून सारखे बोलून तिचे पार खच्चीकरण होते. दगड छाप पुरुष श्रेष्ठ ठरतो. भाग्य लक्ष्मीच्या देवळाच्या पायऱ्यांवर त्या खोलीत राहणाऱ्या एका मुलीबरोबर मी

गप्पा मारत असे. आकाशकंदील, रंगवलेल्या पणत्या, चित्र, रंगवलेल्या साड्या अन्य अशा गोष्टी विकण्यासाठी आम्ही थांबत असू. दिवाळी आली. त्या थंडीत मोरगाव,कुणे येथे स्वेटरला मागणी असते, मी त्या भाग्यलक्ष्मि मंदिरातील मुलींना लोकर, सुया आणून दिल्या. त्या मुली स्कार्फ, कानटोप्या. स्वेटर, पायमोजे बनवून विकू लागल्या. माझेही फीचे पैसे जमले.

माझा परीक्षेचा निकाल लागला. मला खूप छान मार्क्स मिळाले होते. स्कॉलरशिप सुद्धा मिळाली. माझ्या मेहनतीचे फळ मिळाले. मात्र मला पुन्हा कुणे येथे ,काकांकडे जायचे नव्हते. पुन्हा ते अत्याचार नको वाटत होते. शिवाय काही भलते घडले असते, तर, हिचा कॉलेजात मित्र असेल, तिचे चारित्र्य ठीक नसेल, असे आरोप याच काकांनी केले असते.

आई हीचा विवाह करु या,उरकु या, असे बोलत असे. अति श्रीमंतांना सुद्धा लग्नासाठी नोकरी करणारी वधू हवी असते. मला नोकरी मिळण्यासाठी शिकायला तर हवेच होते. पण बाईपण आड येत होते.या ढोंगी समाजाची पैशाची, हाव संपत नाही.बायको नोकरी करणारी हवी.

माझ्या त्या मोरगावी,घरात मला किंमत नाही हे काकांना कळले नसते तर काकांनी माझा गैरफायदा घेतला नसता. बाबांनी काकांना हडसून खडसून " भाऊ हि तुझ्याकडे शिकायला राहील, तुझी लेक आहे. तिचे रक्षण कर" असे सांगितले असते तर ,कदाचित तो काका नावाचा नराधम नीट वागला असता का?

असा नातेवाईक, हा काका,

मग तो परका तो परका!

मी कुणे येथे,कॉलेजला प्रवेश घेतला. कुणे शहरातील ते कॉलेज निसर्गरम्य होते. मी मोरगावची मुलगी होते,साधी होते, कपडे साधे होते. पण मी हुशार व मेहनती होते. कुणे येथे होस्टेलवर जागा मिळेना. मला परत काकांकडे राहावे लागले. नैराश्याची औषधे ज्या जनावर काकामुळे मला घ्यावी लागली. तो काका मजेत होता. त्यानंतर परत एकदा कुणे येथे रात्री काका माझ्या खोलीत आले.

मी त्यांना आवाज चढवत सांगितले, "काका बाहेर जा, नाहीतर मी ओरडेन." त्यावेळी जिन्यात काकुंची पावले वाजली म्हणून काका बाहेर गेले.

दुसऱ्या दिवशी मी काकूंना म्हटले. "काकू मला काहीतरी बोलायचेय" काका समोर बसले होते. ते धास्तावले. मात्र मी काकूंना त्यातले काही सांगितले नाही.बर्याच स्त्रिया अशाच सुखी संसाराच्या भ्रमात वावरतात.परत एकदा मला रात्री काकांची चाहुल लागली.मला तसा भास होताच मी काकांना म्हणाले.

"काका मी मोरगावी , भाग्यलक्ष्मी मंदिरातील ,लहान देवळात, पंचायत समोर, बाबांना ,लोकांना ,तुमची दुष्ट कृती सांगेन.”

काका बाहेर गेले. पण कुणे येथे धोका होता. मोरगावाहून जाणे,प्रवास व अभ्यास दोन्ही तब्बेतीला झेपत नव्हते. त्यामुळे मी काही दिवस कुणे येथे, काकांकडे काढले. परीक्षे पूर्वी अभ्यासासाठी सुट्टी लागली. मी मोरगावी परत आले.मे महिना होता. मी चॉकलेट, केक घरी बनवून, गावात,भाग्यदालक्ष्मि

मंदिरातील दुकानात विकून, छंद वर्ग चालवून पैसे जमवले व अभ्यास केला. मागच्या वेळी प्रमाणे, मोरगावाहून,घरून परस्पर कुणे येथे ,परीक्षा हॉल वर गेले. परीक्षा दिली. रात्री घरी यायला बस वाहन मिळेना.मोरगावला उशिरा परत आले.

बाबा भांडू लागले. "रात्र झाली, मित्रा बरोबर फिरत होतीस का?"

यांना काय सांगायचं? कालबाह्य झालेली माणसे हि, ह्यांना धोका कुठे आहे ते कळतच नाही. डोळे अधू,डोके कमी असते व विचार करण्याची कुवत कमी असते.केवळ मजा, करमणुकीसाठी हे जगतात. माझा परीक्षेचा निकाल चांगला लागला. तेही वर्ष कसेतरी गेले. पुढच्या कुणे येथील शिक्षणाला शिष्यवृत्ती मिळाली व वसतिगृहाची सोय झाली.

मी विचारी शांत बनले. मला जग कळू लागले. वेळेची बचत करणे, बॅग भरणे, अभ्यास, काम,खाणे,टाळणे, मदत घेणे,देणे, सर्व जमू लागले. चांदण वेळी आईची आठवण येते. काकाचे अति वाईट वागणे आठवते.कोवळया कळया खुडणे ऐवजी अशांनी वेश्यांकडे जावे.मनात काहूर माजते. मोठ्या कष्टाने माझे शिक्षण पूर्ण झाले. फक्त आनंदीबाई जोशींनाच शिक्षणाला त्रास झाला असे नाही. प्रत्येक स्त्रीला होतो. आता तर समाजात स्त्री कडे बघण्याचा दृष्टीकोन विकृत झाला आहे. लघवीला जायची सोय नसते,बाहेर तर पडावे लागते.

पोर्न आणि नको त्या चित्रफिती बघून काही पुरुष, काही जण चळले आहेत. समाजात मद्यपान प्रमाणाबाहेर वाढले आहे. सर्व मुलींना जगात स्वतःला फार जपावे लागते. सुरक्षिततेची काळजी घेत, शिक्षण पूर्ण झाले.

देवाच्या कृपेने काकानंतर कुणाकडून दगा फटका झाला नाही. पण लग्न करायची इच्छा, मनाचा कोवळेपणा संपला. काका नावाच्या त्या वृध्द पुरुषांच्या विकृत अनुभवाने किळस बसली. मी स्वयंपूर्ण झाले. मला कुणे येथे,कॉलेजात प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाली. कुणे येथे,वसतिगृहाच्या मागे राहायला घर मिळाले.

भाग्यलक्ष्मी च्या देवाच्या पायऱ्या वरील मुलीनी बनवलेल्या ,विविध वस्तूंची छोटी मोठो प्रदर्शने मी कॉलेजला, खूपदा ,लायब्ररीत लावते. विक्री होते. त्या मुली स्वयंपूर्ण होतात. आता त्यात बऱ्याच जणी वृद्धत्वाकडे झुकल्या होत्या. त्यांना मी कापसाच्या वाती बनवण्याचे काम दिले. बोलता बोलता त्या सहज वाती ,करतात. दिव्याला लागणाऱ्या वाती मधून त्यांना कमाई होते. फार नाही पण पोटापुरती! भाग्यलक्ष्मी देवी ,समाज,आम्हाला कठोरपणे वागवत राहिला. अवेळी वाईट अनुभव दिले,त्यानंतर असे कष्टमय जीवन दिले, कधीतरी,पुढे आम्ही पायावर उभे राहिलो.

मग सदभाग्य कुठे कधी दिले? चांदणवेळी मनात काहूर उठते. सारे आठवते.

पण वाटते. काका नीच होते, वाईट वागणे हा त्यांचा मूळ धर्म होता. सर्वांचे हित करणे ,हा माझा धर्म बनला आहे.

भाग्यलक्ष्मी तर प्रत्येकाच्या करतलातच वसते. कष्ट केले तर फळ मिळते. चांदणवेळी मावळता सुर्य सांगतो कि दुखा:ने भरलेला दिवस संपलाय

,भूतकाळावर ,काळाचा काळा पडदा टाका, परम शांती मिळवा.मोहमाया दूर टाका. सतत शिका.मी नव नायिका,नवीन ,आधुनिक तरीही शोषित आहे.

उगवता चंद्र सांगतो, शीतल हो, उद्याच्या कष्टासाठी विश्रांती घे.

पण याहून अधिक काही त्याला सांगायचे असे मला चांदणवेळी वाटते.

समाप्त

***

# 2 मुझे जीने दो

ही कथा आशाची आहे.आशा एक साधी आणि भाबडी शनिवार चाळीत राहणारी तरुण मुलगी होती. खूप सुंदर गाणी म्हणायची .आशाचे लाडके,एक गाणे आठवते. भगवन मुझे जीने दो

हे भगवान जैसी भी है ये जिंदगी!

क्या है गम है या खुशी

मुझे जीने दो ,मुझे जीने दो

आशा एक सुंदर तरुणी होती.आशाने गाण्याच्या परीक्षा पण दिल्या होत्या.शनिवार चाळीत कुठल्याही,कुणाच्याही लग्नाच्या, वाढदिवसाच्या, डोहाळे जेवणाचा किंवा बारशाच्या कार्यक्रमाला आशाच गाणं नक्कीच ऐकलं जाई. जेमतेम वीस वर्षाची , कोवळी आशा तिला खूप सुंदर नवरा मिळेल अशी सगळयांची कल्पना होती .पण सत्य आणि जगाचे नियम काही वेगळेच असतात. त्या देवाच्या मनात काय आहे ते कधीच लक्षात येत नाही. पैसा मिळेल म्हणून सांगितलं जाते, ती व्यक्ती भिकारी होते. चांगला नवरा मिळेल सांगितलं जातं ती संतीण ,जोगन होते.

रंगी को बेरंगी कहे बने दूध को खोया

चलती को गाड़ी कहे देख कबीरा रोया !

केव्हा तरी सुंदर तरुणी

बंनो रे बंनो मेरी गई ससुराल को आखो मे पानी दे गई.अशा प्रकारे मुलगी पळून जाते.

पण आशाचे राजा बरोबर प्रेम जमले.राजा वरात घेऊन येईल,आपल लग्न होणार, ह्या आशेने आशाने त्या पडक्या चाळीतील घरात खूप वर्ष वाट बघितली.तो काळ live in relationship चा नव्हता. राजा आणि आशा एकाच वर्गात एकाच शाळेत शिकले .दोघांचे प्रेम झाले .

दोन्ही कुटुंबांची तशी,चांगले शेजारी म्हणून ओळख देखील होती. आशा आणि राजा चे प्रेम आणि आता लग्न होणार याचा अंदाज शनिवार चाळीने लावला होता.

कुठल्याही कार्यक्रमाला आशाला बोलावलं कि आशा खूप सुंदर गाणं म्हणायची .मात्र काही वर्षांनी काहीतरी बिनसलं. आशा शी लग्न करायची गोष्ट राजा कडचे आता टाळू लागले .आशा त्यांना सासरचे लोक समजे,पण राजा लग्नाचे करिता मुली बघु लागला. आशा हताश झाली होती .

इतर मुलींच्या मानाने आशाचे लग्नाचं वय पण निघून गेलं होतं. त्यावर कडी म्हणजे अचानकपणे कॉलराने आशाचे आई वडील वारले. नोकरीच्या वयाची आशा आता नव्हती.आशा शिवण करु लागली. पर्याय नव्हता. राजा अन्य मुलीशी लग्न केल्यावर त्याची बायको घेवून शनिवारचे चाळी त राहायला आले. राजा ची बायको गरोदर झाली .तिला मूल झाल्याचे आशाने खोलीच्या

आत कोंडून घेऊन घेतला. सर्वत्र राजाची खुषी,आपली ती फसवणुक नीट पाहिल्यावर आशा खचली.

नवे काही घडले

मात्र सुदैवाने एका वर्षात राजाचे कुटुंब दुसरं घर घेऊन राहु लागले.बरे झाले. आता गावात राजाचे आई-वडील ,राजा आणि बायको वेगळे घर घेवून शनिवारची चाळ सोडून निघून गेले.आशाने खोलीचे दार उघडलं.

आशा ती आता लोकांची आशाताई झाली.राजाने ईथली खोली, हक्क द्यायचा नाही ,म्हणून पोटभाडेकरुला दिली होती.राजा कधीतरी भाडे वसुली साठी यायचा,तेव्हा बाकीचे लोकांना भेटे.आशाला कानकोंडे वाटे.त्यामुळे राजा येई तेव्हा आशा स्वतःच्या,शनिवार चाळीच्या घराबाहेर पाऊल सुद्धा टाकत नसे.जणु आशानेच गुन्हा केला होता आणि गुन्हे करणाऱ्या राजाला लाज नव्हती.तो मजेत पोर कडेवर घेऊन फिरत असे.

शनिवार चाळीत आशाला शेजाऱ्यांनी खुप सतावले.शेजाऱ्यांनी दिलेला त्रास मान्य करूनही ,प्रेमाला प्रतिसाद देऊ न शकणारा, फसवणूक करणारा,दुष्ट राजा आशा दुरुन बघायची.

“आता काय आशाचे लग्न होणार आहे?कार्यक्रमाचे ठिकाणी बोलावू नका .”गंगाबाई. “आशा ईथेच म्हातारी होणार आहे.”चाळीच्या मालक. त्यांच्या त्या छोट्याशा गावात आणि शनिवार चाळीत,राजा आणि तिचे प्रेम प्रकरण लपलं नव्हतं. बऱ्याच जणांना ते प्रेम प्रकरण माहिती होतं .

“जवळच अब्दुल नावाचा एक माणूस आशाला ब्लॅकमेल करतो म्हणून मी ऐकले आहे”अन्य चाळेकरी

“ आशाशी वार्ता करायचा की!"एक

" तुझी भानगड मी सगळ्यांना सांगेन. तुझं दुसरीकडे लग्न होऊ देणार नाही तुझं लग्न मोडेल अस अब्दुल म्हणतो” दोन

काय गोष्टी घडल्या देव जाणे ,अब्दुल लग्न करून बायको व सहा बहिणी घेऊन शनिवार चाळीत राहायला आला.

अब्दुल वॉचमन सगळयात वरच्या खोलीत राहत असे.अब्दुल बर्यापैकी पैसे वाला झाला .आशाची आई वडील वारलेले,हळूहळू आशाचे दागिने पैसे गायब होऊ लागले. बहीण आणि मित्रांना आशाला कोणीतरी ब्लॅकमेल करत ते कळत होते .पण सर्व गप्प बसून बघत होते. आशाला आता गा असे सांगितले तर गाणं म्हणत असते.

भगवन मुझे जीने दो

हे भगवान जैसी भी है ये जिंदगी!

क्या है गम है या खुशी

मुझे जीने दो ,मुझे जीने दो

शनिवार चाळ जुनी झाली होती. नाल्याचे बाजूला भेग पडली होती. कधी ना कधी, कधी मधी पाऊस पडत असताना बिल्डिंग कोसळणार म्हणून बरेच जण जागा सोडून कुठेतरी गेले.आशाला पण खोली सोडायला हवी होती. पण

पैसा नव्हता. आशा अशुभ मानली जात होती, म्हणून शिवणाची काम कमी झालेली होती.आशा चे हाती काहीच उरलेले नव्हते. दिवस जात होते. त्या शनिवार चाळीच्यात राहण्याला पर्याय नव्हता. वरच्या मजल्यावर अब्दुल अजून होता.तळ मजल्यावर आशा आहे आणि मधल्या मजल्यावर गंगाबाई आपल्या जुन्या शेजारी आहेत.फटी आणखीनच इमारतीतून पसरल्या.पण आशाला पर्याय नव्हता. "बिल्डींग कधी कोसळेल काहीच माहित नाही. तर पुढे काय होईल अंबाबाईला माहीत!"गंगाबाई म्हणे

वरचे खोलीत अब्दुल राहत होता. पण त्याचे काही धड नाही.अब्दुल च्या सहा बहिणी होत्या. वाईट घटना त्या ठिकाणी घडत असत.त्या बहिणी नव्हत्या असे लोक म्हणत. शनिवारची चाळ बदनाम झाली होती.

अशा वेळी आशा तिथेच राहत होती.

तिथेच राहते.पर्याय नव्हता. स्त्री ला नसतो.

2020 साली कोरोना आजार आला. त्यांत ती काळरात्र उगवली.आशा नाहक बदनाम पर्यायाने एकाकी झाली होती . बाहेर धो धो पाऊस कोसळत होता.आशा वेदनेने जवळजवळ बेशुद्ध झाल्या सारखी रडत होती . अंधार होता . पर्याय नव्हता .प्रेमात काय पडले,संकट घेऊन आलेल्या घटनांची मालिका सुरू झाली.

भाग 2

गंगाबाई

त्या वर्षी 2020साली जगभरातच असह्य असा करोना आजार पसरला. त्यावेळी एके दिवस आशाची तब्येत खूप बिघडली.मी गंगाबाई दुसऱ्या मजल्यावरील खोलीत राहत होते.अब्दुल आणि त्याच्या सहा बहीणी तिसऱ्या मजल्यावर वरच्या खोलीत होत्या. अब्दुल कडून मदतीची अपेक्षा नव्हती .आशा सर्दी व.कारणावरून फारच आजारी झाली. कुठे जायचे?अब्दुल दारुड्या झाला होता. आता वाटते या आशाला मग मीच कशाला मदत करायला गेले. खरच मी पण आता वयस्कर झाले होते .कशासाठी माणुसकी म्हणून भेटायला गेले अन आशाचे खोलीत राहिले.

आशाला खूप खोकला येत होता.पण कोणीच बाहेर पडले नव्हते,त्यामुळे आम्हाला तसं करोना काही होणार नाही.अस वाटत होत. पण बाहेर पडलेले नाही तरी करोना चा धोका आहे . आम्ही तिघेही वेगवेगळ्या मजल्यावर होतो. तरीही दरवाजाच्या बाहेर सुद्धा पडत नव्हता. घरात दूध पोळी ,तिखट मिठाची पोळी ,गोड पोळी किंवा बटाटा असं खाऊन राहात होतो. मला पण आधार नव्हता. त्या वयात कुठल्यातरी फडतुस मैत्रिणींचा ग्रुप करून, इतरांवर टीका करून ,करमणूक करून घेऊन मी दिवस काढले होते. ज्या तथाकथित सभ्य आणि संसारी बायका ज्या आशा फसली म्हणून आशाला त्रास देत त्यांच्यातली एक होते. त्यांच्या कंपुत टर उडवून आशाला चालू ठरवून मोकळी झाले होते .खरंच आशा निर्दोष आहे हे मला माहिती होतं. त्या राजाने तिला फसवले,हे

तर सगळ्या जगालाच माहिती होत.पुरुष  नामानिराळा होतो अशा परिस्थितीत बदनामी मुलीची होते. हे सुद्धा मी जाणून होते .पण दुसऱ्या कोणावर वाईट वेळ आली की मनातच विकृत आनंद होतो ,मला तो झाला. जोपर्यंत नवा विषय येत नाही, कंपुत जुना संपवणार नव्हतो .

अनुभव तसा मलाही आला होता.मी तर बालविधवा होते. त्याकाळी पारंपरिक ब्राह्मण कुटुंबामध्ये असो किंवा अन्य कुटुंबांमध्ये असो बाल विधवेची परिस्थिती फार वाईट असायची. तिला सती जावं लागलं नाही ,याचा अर्थ तिने जिवंतपणीच मरण भोगावे असे मत असे.मला मधल्या मजल्यावरिल खोल्यांतील लहान  खोली सेठनी  दिली होती.  मधल्या मजल्यावर ही खोली शनिवार आळीतली दिली कारण की मी निराधार होते. मात्र ही चाळ बांधणारे मालक माझ्या बद्दल काहीशी आपुलकी बाळगून होते .मी त्याच्या बद्दल आपुलकी बाळगून होते, त्याच्यापेक्षा माझ्याबद्दल सेठ खास आपुलकी बाळगून होते. आणि त्या काळी काय खोली द्यायला त्या सेठ सरां ना  काही विशेष वाईट वाटलं नव्हतं. सेठ, मालकाकडे पैसा रगड होता आणि त्यांला माझ्यापासून सुख मिळत असे.वरचे मजल्यावर राहतात ते अब्दुल चे वडील त्याकाळी माझं केशवपन करायला घरी यायचे. त्या काळी विधवेच्या डोक्यावरचे केस काढायला बोलावुन,अगतिकेला  पूर्णपणे भादरून काढली जात असे. त्यावेळी हा न्हावी पण त्या बाईचा गैरफायदा घेण्याची शक्यता असे. शनिवार आळीतील खोलीत पाठीमागच्या बाजूला एक विहीर होती. वाड्याचे मालक श्रीमंत होते पण व्यसनी होते. त्यांनी माझ्या बरोबर संबंध ठेवले .

मी बालविधवा होते.पण मी गरोदर राहिल्यावर सेठ मालकांनी हात वर करून दिले. केशवपन करणाऱ्या न्हाव्याला (अब्दुल चे वडिल)मी गरोदर असल्याची शक्यता वाटली .अब्दूलच्या वडिलांनी माझ्याकडे कधी वाईट नजरेने पाहिलं नव्हतं. त्यामुळे मी गरोदर आहे हे त्यांनी गुप्तपणे शनिवार आळीच्या मालकाला सेठला सांगितले. विधवेला अशुभ म्हणायचं ,विधवेचा तोंड बघायचं नाही त्यामुळे मुख्य वाड्यापासून बाहेर येथे हा एका छोट्या खोलीत मला ठेवण्यात आलं होतं .त्यामुळे मालकांची पण सोय झाली आणि घरच्यांना संशय येऊ नये याची देखील सोय झाली .मी गरोदर राहिले तरी पाय पोटाशी घेऊन ,शरीराचं गाठोड करून या खोलीत व्यवस्थित राहिले.शनिवार आळीच्या सेठ मालकांचा अब्दूलच्या वडिलांवर आळ  ढकलायचा विचार होता, पण मी त्यांना तसं करू नका अस सुचवल्यावर ते म्हणाले.

“ मग जा विहिरीत जीव दे.मूल पाड, जे होते ते कर. जीव दे,”सेठ साहेबांनी मला सांगितलं. त्यावर मी त्यांना म्हणाले

“पुण्याला हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेत अनेक तरुण विधवांची शिक्षणाची ,राहण्याची सोय आहे. तर विधवांची मुले, तिथे सांभाळायची सोय आहे. तुम्ही मला तिथे न्या”मी गंगा

“नाही पण हे गाव छोटा आहे इथेच बोभाटा होईल .मी तुला नेणार कसं?” साहेब

“ रात्रीच्या वेळेस पाहिली बैलगाडीतून मला घेऊन जा.  आता तर माझे दिवस भरत आले आहेत. मी कुठल्या क्षणाला बाळंतीण होईल. मला तुम्ही

पुण्याला घेऊन जा .''मी शनिवार आळीचे मालकांना सेठना म्हणाले .पण मालक आता काही मनावर घेत नव्हते. मुलाचे झिंगट त्यांना नको होतं .

''उद्याच्या दिवसात तुम्ही माझी काहीतरी सोय करा अन्यथा मी विहिरीत जीव देईन''मी गंगाबाई

'' उद्या कशाला आत्ताच दे''असे रागारागाने म्हणून शनिवारी चाळीचे मालक सेठ साहेब निघाले.

''मुझे जीने दो ''मी त्यांचे पाय पकडून म्हणाले.पण तो कठोर माणूस,सेठ झिडकारून निघून गेले. काय करावं मला सुचेना .मी रात्री अकरा साडे अकरा च्या दरम्यान सगळीकडे सामसूम झाल्यावर ,शनिवार आळीतील त्या वाड्याच्या मागच्या बाजूला असलेल्या परसातल्या विहिरीचे राहाटा जवळ गेले .तिथे जाऊन मी विहीरीत डोकावून पाहिलं .मी दोन जीवांची बाई होते .माझ्यासोबत पोटातील मुलाचा मृत्यू होणार होता .कुणीतरी जरी मदत केली असती तरी मी पुण्याला पोहोचले असते. तीन तासाच्या अंतरावर पुना होतं. पण माझ्या माणसांना मला मदत करायची नव्हती. सुदैवाने गावात कुठेही बोभाटा झाला नव्हता. कारण की मी या गावाबाहेरच्या चाळीत एकटीच राहत होते. मालकांच्या कुटुंबियांना सुद्धा काहीही कल्पना नव्हती, की चाळीतील इतर लोकांना कल्पना नव्हती .आपण आता विहिरीत उडी मारली की उद्या आपलं प्रेत फुगून येईल. भल्यापहाटे वरच्या जुबेदा काकू म्हणजे आमचे न्हाव्याची बायको (अब्दुल ची आई)सर्वप्रथम आंघोळीला येते. तिला आपलं प्रेत दिसेल. काय करावं उडी मारावी का ?

तोच कुणाची तरी पावलं वाजली आणि मी विहिरीच्या मागे जावु लागले. मी लपले पण दुर्दैवाने त्याच वेळी माझ्या पोटात बाळंतपणाच्या कळा सुरू झाल्या होत्या .बाळा जन्माला येणार होते. दुष्ट माणसापासून दिवस राहिले होते तरी मला माझं मूल हवं होत,अस वाटतं. पण मी ते मुलाला उघडपणे माझं म्हणून पण वाढू शकत नव्हते. पावले वाजल्यावर ,समोर कोण आहे ते मी बघितलं.सेठ मालक विहीरी त ढकलतील ,अशी भीती वाटत होती. समोर जुबेदा, न्हाव्याची बायको गरोदर असल्यासारखं पोट होतं.सेठने ह्या झुबेदाला मला विहिरीत ढकलून द्यायचे म्हणून पाठवले होते का?

“झुबेदा काकी मी पण गरोदर आहे. मला मारु नका.माझी खोली घ्या,माझा पैसा घ्या.

“मुझे जीने दो”( तो मुलगा मी अब्दुल नावाने त्यांच्या घरी वाढताना पाहिला )जुबेदाने ,पोट मोठे करणेसाठी, गरोदर पणाचं नाटक करण्यासाठी पोटावर लुगड्याच्या घड्या बांधल्या होत्या. मला बघून केस कापण्याला येणाऱ्या न्हाव्याने मी गरोदर असल्याचे जुबेदाला त्याचे पत्नी ला सांगितलं होतं. बाळ मिळवायचा कार्यक्रम त्या दोघांचा पूर्वी ठरला होता. अब्दूलने वडिलांनी पूर्वी देखील कधी म्हणता,केशवपनाचे वेळी काय,माझा गैरफायदा घेतला नव्हता .

जुबेदा जवळ आली.आणि आता तर जुबेदा मला वरती त्यांच्या खोलीत घेऊन गेली होती. त्यांनी गरम पाणी तापवलं .दोघांनी मिळून माझं बाळंतपण

केले. मला मुलगा झाला तो मुलगा अब्दुल म्हणून मी झुबेदा  त्यांच्या तावडीत दिला. भगवान मुझे जीने दो

हे भगवान जैसी भी है ये जिंदगी!

क्या है गम है या खुशी

मुझे जीने दो मुझे जीने दो

पाच दिवस मी जुबेदा च्या खोलीत मेल्यासारखे पडून होते. पूर्ण चाळीतल्या कुणीही माझी चौकशी केली नाही. मी खोलीत जगते का मरते बघायला कोणी आले नाही. मला गरोदर करणाऱ्या शनिवार  आळीचा मालक सुद्धा बघायला आला नाही. विहिरीत पडून मेली, मी विहिरीत पडून जीव दिला असेल या कारणाने त्याचा बाकी त्रास संपला. मागे लागलेली कटकट, काही प्रश्न मिटले,आता बदनामी होणार नाही म्हणून तो खुश होता.

वरच्या झुबेदा च्या खोलीत मी तिच्या सोबत  छपून  पोचले. न्हावी काका आणि जुबेदा ने मिळून माझ्या बाबतीत सर्व,छपून, पण व्यवस्थित केले.  गरम पाणी उकळून ठेवले होत. सुदैवाने अब्दूलच्या वडिलांच्या खोलीच्या शेजारी लागून संडास  असल्यामुळे तोही प्रश्न मिटला. दहा दिवस पार पडले.बाळ झुबेदा चे ओटीत घालून मी तळमजल्यावर माझ्या खोलीत  आले. कुलूप उघडून माझी खोली उघडली .माझ्याकडे शेजारी-पाजारी बघत होते.

‘‘गंगाबाई  कुठे गेला होता का?कधी आला?’’जोशी

“ आज आले. मंदिरात गेले होते काही दिवस राहिले. पोथीचा सप्ताह झाल्यावर आले. पण तिथले पाणी खराब होते.पोट बिघडुन गेले आहे. भात खाऊन झोपून राहते.”मी

माझ्या लहान,पसारा मय खोलीत आधार वाटला .पडकी खोली सुद्धा मला किती आधार देत होती.घर माणसाला त्यांना किती सुख देते .सगळे बिल्डिंगच्या बाकी खोल्या पडल्या. यापुढच्या काही पडल्या नाही. किती बरं झालं.आजूबाजूच्या खोल्यांमध्ये माणसं राहत होती .पण कोणी बघायला आलं नाही .थोड्या वेळाने दरवाजाच्या बाजूला पाय वाजले.मला क्षणभर भीती वाटते, पण आताच भितीचा काळ पळून गेला होता. मी दार उघडलं.शेजारच्या खेळणाऱ्या मुलीच्या काकी ,तळमजल्यावरच्या बापट (आजच्या आमच्या आई) ,आल्या होत्या .

“तुम्ही आता परत येणार नाही कायमच्या पुण्याला गेले “अस शनिवार आळी चे मालक सेठ सांगत होते .अजून दोन-तीन दिवस तुम्ही आला नसता, तर कुलूप तोडून आम्ही आमच कुलुप घालून, ही खोली ताब्यात घेणार होतो.सेठने सांगितलं होतं”

“त्या काकींना सांगितलं होतं “मी

माझ्या वर काय गुजरली होती. इथे जीव जात होता, पण या लोकांना खोली ताब्यात घेण्याची पडली होती.नंतर जोशी आले ते राज्याचे आई-वडील होते.असच बोलले.रिकाम्या हाताने आले होते. बडबडले गेले, पण मी काय करू शकते? दुर्दैव असं की पुढे मी त्या कंजूस लोकांच्या कंपनीत रमले.

झुबेदा काहीतरी खायला आणून देई. मी बनवे,पेज चहा बटर खात राहीले,40 दिवस काढले.

मी अब्दूलला प्रेम पण दाखवलं नाही अगदी शेजाऱ्याचा मुलगा इतकी सुद्धा चिकटले नाही, कारण की मला त्यात गुंतायचं नव्हतं. त्यात मोठा धोका होता. अब्दुल जुबेदा चा मुलगा म्हणून चाळीत छान वाढत होता. तो माझ्यासारखा दिसत काही नव्हता आणि मी त्याच्यात गुंतले देखील नाही .माझ्याकडे मी इतर कामात ,वाचनात रमून राहीले.मी शिवणेही करुन,काही तरी खाऊन राहिले.मी कामाला पण बाहेर पडत नव्हते त्यामुळे त्यातून बाहेर मी काहीच कळू  दिल नाही. विधवेला कसले माहेर कसले सासर?कोकणात सासरची मंडळी,मी माझी सोय केली होती यात समाधानी होते. कधीतरी गोणीभर तांदूळ पाठवत,ते बरे होते.

या घटनेला साठ वर्ष झाली आहेत.

अब्दुल सुद्धा तर आता साठ वर्षाचा झाला होता. मी साधारण 75 /76 वर्षाची झाले.पूर्वी काही घडले   होते.ते दडलेले आहे. मी चाळीत रमले.आशा माझ्यासारखे होती.

आज या महा मारीच्या काळात आशाच्या खोलीत मी आशाला मदत करायच्या निमित्ताने आले होते. आशा स्वतःपुरती स्वतःतच वावरत असे. शिलाई मशीन घेण्याचा उपयोग झाला होता. शिलाई करी.आशा ची तब्येत फारच बिघडली होती. तिला बहुतेक दवाखान्यात ॲडमिट करावे लागेल असे मी मनाशीच म्हणत होते. आशाला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट करायची वेळ आली

तर पैसे नव्हते.  माझ्याकडे तरी चार दागिने होते.आशा कडे काहीच नव्हतं. आशाला अब्दूलने ब्लॅकमेल करून आशा कडे जे काही होतं ते पण परत हिसकावून घेतलं होतं. त्यामुळे तिला सरकारी दवाखान्यात न्यावे लागेल . वरच्या मजल्यावर जाऊन अब्दुल ला सांगावं की काय असे माझ्या मनात विचार येत होता .

आशाची खोली उचकली.मुझे जीने दो,अस एक चित्र होत.घरात काय असणार?भिकारडी, बघू दे,राजा ने दिलेले काही लपून ठेवले का?असं म्हणून मी त्या खोलीतली ट्रंक  काढली.  लिहिलेली काही पत्रे होती.

एक पत्र फार विचित्र होते.

“मी स्वतः आपले फोटो काढून घेतले होते.  तुझ्याकडे असतील नसतील ते दागिने तु ताबडतोब पाठव.अन्यथा मी तुझी पत्र आणि फोटो सगळ्या शनिवार आळीतील लोकांना जाहीर  करेन. ते लोक तिथे तुझी अधिक बदनामी करतात.खोलीतून हाकलतील.तू बेघर होशील. आपण जत्रेत काढलेले फोटो सुद्धा माझ्यासमोर आहेत. तुझ्यासाठी मी कुणाला स्थळे आणुन दिले नाहीत. तुझे कुठेच लग्न जुळलं नाही कारण की तुला जे स्थळ सांगुन येईल, तिथे मी निनावी पत्र पाठवत असे.त्याला जमेल तर वेडेवाकडे सांगणारे फोन करत असे. तुझं मी कधी चांगलं होऊ देणार नाही. तुला मी माझ्याशी संबंध ठेव म्हणून परत सांगतो तर तू ते सुद्धा ऐकत नाही. आज तू पाच हजार रुपये रोख घेऊन आली नाहीस,अब्दुल तर्फे पाठवले नाही  तर तुझी काही खैर नाही.माझ्याशी संबंध ठेव.'मुझे जीने दो' अस रडून काय उपयोग?ये मजा करू.

तुझा:राजा.

विचित्र अशा अर्थाचे पत्र होतं. मी हादरले. ज्या राजाला चाळीतली लोक देव माणूस सांगत होते, तो असा होता. देव माणूस शब्दाचा अर्थ मला कळेनासा झाला .म्हणजे राजाने गावात घेतलेलं घर सुद्धा ,आशाचे कडून पैसे लुबाडणूक करून मिळालेल्या ,याच पैशातून घेतले आहे. आशाला मनाने देहाने लुबाडून घेतलेलं होतं.वरून बघून बाहेर चे रुपाने माणसं कळत नाही.

बाहेर अंधार होता.आशा तापाने फणफणली होती.दारा बाहेर वेड्यासारखा खूप पाऊस पडत होता. मागच्या सर्वपित्री अमावस्येला तर ह्या चाळी चा अर्धा भाग कोसळून पडला. आमच्या तीन खोल्या उरल्या होत्या. आज असं काही झालं तर काय करायचं? कुठे जायचं ?मित्र नाही कुणाचा आधार नव्हता. शनिवार आळी तील या वाड्यात जेमतेम आता आम्ही तीन कुटुंब उरलो होतो. मी गंगा मावशी ,खाली आशा, आई वरती ते राहणारे न्हावी काकांचे अब्दुल कुटुंब होते. बाकी पडल्यापासून चाळीतले सर्व जण अन्यत्र गेले होते .अब्दुल न्हावी काकांच्या दुकानात तळमजल्यावर,अब्दुल ने वडिलांच्या न्हावी कामाचे खोलीत,तसे इस्त्रीचे दुकान सुरू केलं होतं . इमारत पडली तरी थोडासा किरकोळ बदल करून जागा मिळवून त्याच्यात अब्दुलने इस्त्रीचा काम चालू ठेवलं होतं . अब्दूलने ज्या बायका बहीण म्हणून आणल्या होत्या त्या बहिणी होत्या की नाही याबद्दल शंकाच होती. त्यामुळे शनिवार आळी ,अब्दुल चे घरामुळे बदनाम झाली होती .

बाहेर धो धो पाऊस कोसळत होता आशा वेदनेने जवळजवळ बेशुद्ध झाल्या सारखी पडली होती.मध्ये रडत होती .वीज कोसळल्याचा आवाज आला आणि कडकड आवाज आला मला वाटलं आता आमची चाळ पडली. अंधार होता पण मी झरोका होता त्यातून बाहेर बघितलं. व रच्या मजल्यावर च्या पायऱ्या उतरत होतं .चोर?खुनी?काहीच पर्याय नव्हता.

बाहेर काय पडलं.इमारत कि देऊळ? .कंदिल घेऊन आलेल्या अब्दुल ला मी ओळखलं.अब्दुल ऊतरन आशाचे खोलीच्या दाराशी आला. अंधारातच दार ठोठावलं आणि म्हणाला

“ आशाताई आणि गंगा मावशी आपली चाळ तर पडली नाही बर का!पण गंगाबाई ची खोली ची मोरी पडली.पण त्या समोरच्या बाजूला जी बिल्डरने इमारत बांधली होती ती पूर्ण पडली. त्या इमारतीच्या मजल्यावर च्यात त्या राजा जोशीने फ्लॅट घेतला होता.प्रेत बाहेर काढायला वेळ लागेल.तुम्ही काळजी करू नका. औषध खाऊन घ्या.बाहेर पडू नका .”

कसतरी मी खोलीत असलेल्या वीक्स आशाचे छातीला चोळलं .गरम पाण्याच्या पिशवीने तिचे छाती शेकत बसले. दोघी एकत्र राहायचे ठरवले. रात्र कशीतरी पार पडली.काळ रात्र संपली होती. सकाळी लख्ख ऊजेडआल्यावर मी खोलीचं दार उघडून बाहेर आले .समोरच्या गल्लीतल्या पडलेल्या इमारतीच्या ढिगारा उपसण्याचे कामासाठी थोडी किरकोळ लोक जमली होती. आमची चाळ पडली नाही आणि आम्ही तिघं कुटुंब सुरक्षित राहीलो यातच मी आनंद मानला आणि देवाला प्रार्थना केली .

*“भगवन मुझे जीने दो*

*हे भगवान जैसी भी है ये जिंदगी!*

*क्या है गम है या खुशी*

*मुझे जीने दो मुझे जीने दो !*

***

# काचेचे घर

काचेचे घर हॉटेल चे आकर्षण लोकांना फार आहे.हेमाच्या मुलीचा साखरपुडा,तो थाट,तो विधी साधा नव्हता. काचेच्या घर नावाचे,एका बेटावरील ते हॉटेल संपूर्ण काचेच बनवलं होतं. शहरापासून 21 किलोमीटरवर सर्व बाजूंनी तलाव अथवा खाडीने वेढलेल्या त्या एका छोट्याशा बेटावर हे काचेचे घर नावाचे हॉटेल वसलेलं होतं.काचेचे असून सुंदर होत.महाग म्हणून सुद्धा, या हॉटेलचं नाव होतं. या हॉटेलमध्ये खूप श्रीमंत लोक वाढदिवस किंवा खास कार्यक्रम करत असतात, तसं होतं. आम्हाला या हॉटेलमध्ये जायचे निमित्त आमच्या एका हेमा नावाच्या मैत्रिणीच्या मुलीचा साखर पुडा होत.हेमाच्या मुली सुंदर, त्यांनी बनवलेल्या पोरांच्या यादीत बरेच जण आहेत. इथपर्यंत,या पुढे त्या मुलीची आतापर्यंत अनेकदा लग्न ठरलं होतं आणि मोडलं होतं.

“ साखरपुडा ,त्यात हेमाच्या मुलीचा. ठरलेल्या जायचे पुढे काय बघायचं नाही. पण इतक्या सुंदर हॉटेलमधे जायला कुणाला आवडणार नाही. त्या काचेच्या घरात पार्टीला झालं त्या बेटावर राहणं आणि एकूणच त्या बेटावर जाणं हे सुद्धा प्रत्येक व्यक्तीचे स्वप्न असतं.”ज्योती

"आयुष्यात कधी ना कधीतरी एकदा तरी त्या बेटावर जावे,ही त्यांची बकेट लिस्ट असते."मी

" नक्की यायचं बर का"कसे आणि नक्की येणार ना आणि व्हेज की नॉनव्हेज विचारण्यासाठी या मैत्रिणीच्या स्वीय सहायकांना फोन केला.

"मी व्हेजिटेरियन आहे मला काही मिळेल ना! जमेल ना."मी विचारलं

" हो हो का नाही नाहीतर बटाट्याचे फिंगर, फ्राईज वगैरे कुठेही होतात .तू ये. हे बघ अगदी जवळच्या लोकांना बोलावलं तरी 70 जणांची लिस्ट झालेले बघ. पाहुण्यांची यादी भली मोठी झाली असती आणि त्यांचे मैत्रीण आहेत. अगदी जवळची पाहुणेही 70 लोक तिथे जाणार आहात आणि त्या हॉटेलमध्ये याहून अधिक लोकांना परवानगी दिली नसते.70चे लिमिट  असतं. सर्वजण यायचं बर का आणि कोणाचा रद्द झालं तर कळवायचं. म्हणजे त्याच्या ऐवजी वेटिंग लिस्टवर दुसर्या  व्यक्तीला घेण्यात येईल."हेमा

"जायचं कस?"मी

"त्या साठी तुम्ही गेट पाशी जमा तिथून तुम्हाला बसेस करून आणि तिथून क्रूजनी मी तुम्हाला या काचेचे  घर  च्या घरावर, या बेटावर नेण्यात येईल."हेमा

3 मार्च 21,तारीख ठरली आणि आम्ही सर्व जण त्या तीन मार्च ची वाट बघू लागलो.

" दारू वगैरे सगळी सोय आहे आणि त्यामुळे तब्येतीचा प्रॉब्लेम आला तर असावं म्हणून एक दाताचा डॉक्टर आणि एक साधारण लेडी डोक्टर आहे.

एक नर्स सुद्धा आहे .तुम्ही काही काळजी करू नका. तुमचं वय जास्त आहे असा विचार सुद्धा करू नका. काचेच्या घरातील पार्टीला नक्की यायचं.” असा निरोप या मैत्रिणीने दिला. तीन मार्च 21 ची वाट बघता बघता तीन मार्च उजाडला. त्या दिवशी आम्ही सगळेजण स्टेशनवर जमलो. गाडी घेऊन जी व्यक्ती आम्हाला घ्यायला आली.ती तिथे तशीच थातूरमातूर व्यक्ती होती .एका थर्ड ग्रेड हॉटेलमध्ये जिथे वेश्याव्यवसाय चालतो असं म्हटलं जातं,अशा खोली मध्ये राहणाऱ्या व्यक्तीला ड्रायव्हर म्हणून ठेवलं याच मला नवलच वाटले. पण तरी मी त्या नवलाच्याकडे दुर्लक्ष केलं. माझी गुप्तहेर तपासणी आतां पासूनच चालू करायला नको,असा मी विचार केला. सर्व मैत्रिणी भरपूर गोसिप केलं होतं. ह्या बाईच्या मुली राहतात की नाही किती लग्न करतात. किती नाती मोडतात. आर्थिक खर्च याचा मूळ स्त्रोत काय आहे असा कुठला नवऱ्यामुलीला मिळाला आहे?पैसा कुठून आला की त्या काचेच्या घरात पार्टी द्यायला तयार झाली. अशा चर्चा आणि चुगल्या करत मध्ये दिवस काढले होते. पण तरीही स्वप्न होतं .त्या स्वप्नपूर्तीचा काळ, काचेच्या घरातील बेटावर जाण्याची सहल, चांगले भारी कपडे घ्यायचे म्हणून सगळयांनी भरपूर खर्च केला होता.

कारण शोधले पाहिजे ना पार्टी का देते?शुभेच्छा मजा याच्यापेक्षा लोकांना कपडे आणि दागिने याच सतत कौतुक असत. भारी दागिने घालू नका सगळे पिऊन पडतील आणि कोणीतरी चोरी केली तरी आपण तोंड उघडू शकत नाही.अशी चर्चा आम्ही दोन मैत्रिणीनी एकमेकींची केली. खोटे दागिने घालून

जायचे ठरवले आणि आहे त्यातले एक कफ्तान घालायचे ठरवलं .तीन दिवसांचा मुक्काम,तिथे घालण्यासाठी म्हणून ड्रेस विकत घेतला.

दागिने घालायचे नाही असे ठरवलं कारण चोरी झाले तर काय म्हणून? गड्या सगळे चोरांचा राज्य होतं .रेल्वे स्टेशनवर जमलो. सच फन बचपन असे म्हणत सगळे जण जमले होते .पुढे कितपत फन येणार होती हा प्रश्न होता. या हेमा मैत्रिणीची आई झाडाचा पाचोळा जाळून,बागेत चूल आहे, काटक्या सरपण बनवून स्वयंपाक करायची. कारण की गॅस ला खर्च येतो.सहज म्हणून शेजारी पाजारी यांचेकडून मागून जेवण जेवायची.भाजी करायची तर जेवायला पैसा नसायचा. मात्र बंगला विकल्यावर कोट्यान कोटी रुपये मिळाल्यामुळे या मैत्रिणींनी आज काचेच्या घरातील ,आयलंडवर पार्टी ठेवली होती.

चिठिया हो तो हर कोई बाचे,भाग न बाचे कोई

असं गाणं गाडीत या मैत्रिणीचा नवरा देखील गात होता. थोडा डोक्यावर परिणाम झाला होता आणि नेहमी हेच गाणं म्हणायचा. मला त्याचं ते गाणं खूप बेसूर आणि अशुभ वाटत असे, पण पर्याय नव्हता.

मजा करायची म्हणून खुशीत सगळे टन टन उड्या मारत आम्ही पाच वृध्द मैत्रिणी एकत्र निघालो होतो .स्टेशनवर इथे पोहोचण्यासाठी आम्ही क्रूज पकडली. क्रुज मधून निळा समुद्र,खाडी सुंदर दिसत होती. सर्व प्रकारची माणसं होती असावीत. बहुतेक साधी होती. जरी मोजली नाही .पण सतत साठ तरी वाटत होती.आम्ही असेच काचेचे घरी पोचलो .मैत्रिणींना बायका बायकांना मला पाच जणींना एकत्र हा ॅल दिला होता .आम्हाला खूप सुंदर निसर्गरम्य

रूम दिली होती .पाची बायकांना पाच मोठे बेड होते .खिडकीतून सुंदर आकाश दिसत होते, तो निळाशार समुद्र दिसत होता .कशीद बेट म्हणत होते पण या बेटाचा एक भाग पलीकडे डोंगराच्या पलीकडून जमिनीला जोडलेला होता. म्हणजे मागच्या बाजूने तिथून जमिनीवर जायला मार्ग होता .त्या जमिनीवरून असं म्हणतात की तो रस्ता पुढे काढली नावाच्या गावाला जायचा. मी पूर्वी एकदा बदली होती तेव्हा मला सांगितलं होतं.गूगल वर रस्ता  बघितला असता तर कळलं असतं. पण नेटवर्क नव्हतं.जेवण होते सर्वजण दारू पिण्यात रमले होते. दारू चिकन मटन यांच्या टेबल चे पलीकडे एक हातावर शिक्का मारणारा माणूस होता .तो हातावर शिक्का मारून देत होता आणि त्यासोबत एक व्यक्ती इंजेक्शन देत होता.

“मी घेणार नाही” मी म्हणाले तिथे बसलेली माझ्या मैत्रिणीची मुलगी जवळ आली.

“ मी इंजेक्शन घेणार नाही” मी स्पष्टपणे सांगितलं .

“मग परत जा.इंजेक्शन घ्यायला तुमचा नकार का? तुम्हाला मजेला विरोध करायचा आहे? जायचं असेल तर जा”काशी

“ठिक आहे मी परत जाते”मी

मी खोलीत आले आणि माझी बॅग भरायला सुरुवात केली .

“अस काय करतेस, त्यांच्या पद्धती नुसार इंजेक्शन घे.असं काय करतेस .”अशी समजूत सर्वांनी माझी काढायला सुरुवात केली .मात्र मी स्पष्टपणे नाही

म्हणत होते. त्यावेळी त्यांचा एक मॅनेजर माझ्याजवळ आला आणि मला विचारल “आंटी आपखी उमर कितना है ?आपका विरोध है”

“62 साल की हूं”मी

“इनको नहीं चलेगा ,मत दो”तो

त्यामुळे माझे इंजेक्शन टळले.

“मला कळलं ,चल जाऊ,दे ग,नको घेऊ”, असे म्हणून माझ्या मैत्रिणीने माझ्या हातातली बॅग काढून घेतली आणि मला परत हॉलमध्ये आणलं. परत पार्टी सुरू होती. त्या टेबल च्या पाशी येऊन मला बोलली.

“ ह्यातल्या एकही कुठे पैसे देत नाही. दारू प्यायची तर नको पिऊ नये. नॉन व्हेज खायचं नको खाऊ. गप्पा तर मार.” असं म्हणून मला प्रमुख ठिकाणी जिथे पार्टी चालू होती तिथे घेऊन गेली. त्यावर असंबंधित गप्पांमध्ये मला काही रस नव्हता. पण मी त्या गप्पा ऐकू लागले .केसरी माझी मैत्रीण, ज्योती बाथरूमला लागली ,म्हणून खोलीत गेली आणि जोरात ओरडू लागली. काय झालं बघायला सगळेजण त्या खोलीच्या दाराशी उभी राहिली. खोलीच्या दारातून डोकावून पाहिले असता, आत माझ्या मैत्रिणीचा हेमाच्या  नवरा कुणीतरी पोटात चाकू मारलेला उताणा पडला होता आणि त्या आम्हाला दिली गेली होती त्या कोपरे च्या खोलीभर रक्त पसरलं होतं. नेमक आमच्या बायकांच्या खोलीत हा माणूस कशासाठी घुसला आणि तिथे त्याचा खून कोणी केला? हा एक मोठा प्रश्न होता .सगळीकडे खळबळ माजली. मैत्रिणींनी सांगितलं होतं की

डॉक्टर आणि नर्स ठेवणार आहेत. तसा तो डॉक्टर होता, तो जवळ आला. तपासलं पण त्यांनी सांगितलं की ,“ ही व्यक्ती मृत झालेली आहे” सर्वत्र खळबळ माजली. पोलिसांना फोन करण्यात आला. तसेच व्हीआयपी लोक होते .कुणाचा तरी कुठेतरी ओळखीचं होतं. त्यामुळे पोलिसांना फोन केल्यावर सगळेजण गप्प बसून होते .तरी खुप काही तणाव नव्हता. मॅनेजर म्हणत होता.

“ होत राहतात या गोष्टी तुम्ही लोकं तुमची पार्टी कंटिन्यू करा .तुम्ही तुमची पार्टी कंटिन्यू करा.”

पण सगळ्यांचा मूड गेला होता. पोलीस आले. इंजेक्शन देणारा डॉक्टर आणि काही काही व्यक्ती गायब झाल्या होत्या. पोलीस आले माझ्या मैत्रिणीचा अजिबात मूड नव्हता.हेमा मुलीचा, काशीचा साखरपुडा म्हणून लोक जमवली आणि स्वतःच्या नवऱ्याचा खून झाला होता. खून कोणी केला असावा अपघाती मृत्यू म्हणण्याची सोय नव्हती .खून कोणी केला लोक अंदाज करत होते. इंजेक्शन टोचणाऱ्या गायब झाल्यामुळे मला नवल वाटलं होतं.

ज्योतीला या प्रकारामुळे टॉयलेट करायला मिळालं नव्हतं ,म्हणून ज्योती मला परत म्हणाली ,”मला टॉयलेट ला जायचे. माझ्यासोबत ये”लगबगीने मी ज्योती सोबत टॉयलेटच्या इथे गेले .तिथे दोन व्यक्ती थंडीमुळे कॅप डोक्यावर घेतलेल्या एकमेकाशी बोलत होत्या.

“ हे इंजेक्शन म्हणजे आजारावरची एक प्रकारची लस आहे. तिचा प्रयोग या लोकांवर करण्यासाठी या सगळ्यांना इंजेक्शन दिले. तीन दिवसात या लसीचा काय परिणाम होतो. हे कळेल. जर या लशीमुळे या लोकांना सर्दी

खोकला झाला ,तर ती लस परिणामकारक नाही, असे म्हणता येईल. कुणीच स्वयंसेवक ही लस घेत,टोचत नसून ,ईथे यायाला तयार नव्हतं .म्हणून मी ही आयडिया काढली. ती लस शोधणाऱ्या कंपनीने हा सगळा खर्च दिलेला आहे आणि ह्या बेटावर केल्यामुळे जर आजार अधिक वाढला तर इतर लोकांमध्ये पसरण्याची भीती राहणार नाही. म्हणून काचेचे घर,हि लस येथे जमलेल्या 70 लोकांना देण्यात आली होती..

**भाग 2**

या लोकांमध्ये मी आणि तो लस देणारा आणि एक डॉक्टर एका मैत्रीणी व्यतिरिक्त  सर्वांनी इंजेक्शन घेतलं होत.एक खून झाला होता.

थोड्यावेळाने सर्वजण शिकू लागले खोकु लागले आणि वारंवार लघवीला देखील जाऊ लागले. त्या लसीचा काहीतरी परिणाम होतो हे मी ओळखलं. पण मी हे ज्योतीला सुद्धा सांगितलं नाही आणि कुणाला सांगितले तर मी सांगू शकत नव्हते मी हे चोरून ऐकलं. हे सुद्धा मी गुपितच ठेवणं भाग होतं. अन्यथा माझ्या जीवाला धोका होता. या सगळ्या कार्यक्रमाला यायला मी तयार होत नव्हतं.आता अस ऐकल म्हणून सत्य परिस्थिती कळली. मी गुप्तपणे,ऐकले.त्या डॉक्टरला घाबरले.

‘‘पळून जाऊ या’’ज्योति

मला माहिती होतं याच रस्त्याने मागून जंगलातून टॉयलेटच्या पाठीमागून, असलेल्या,नदी कडून गेले तर, मी नली बांगला पोचेल. या वाटेची मला कल्पना होती .

‘‘बघू काय घडतंय ते ‘‘असं मी ज्योती ला सांगितलं. मनाशी काहीतरी ठरवून मी चौकशी कडे बघू लागले. पोलीस इन्स्पेक्टर तरुण आणि तडफदार होता. मी जर मागच्या मार्गाने निघून गेले तर माझा संशय येण्याची शक्यता होती.खूनासाठी मी आले असावे त्यामुळे मी तिथे वावरले असेल,असा संशय

आला असता . माझे वय बघता माझ्यावर कोण संशय  घेणार होत? पण क्राइम पेट्रोल 100 वगैरे ,चौकशी बघून आठवून घाबरुन गेले.

चौकशी खास नाही. माझ्या मैत्रिणीची मुलगी गंमत असल्यासारखी दिसत होती. माझ्या मैत्रिणीच्या मुलीने पोलीस पाटीलला, डोळे डोळे घालून नको त्या गोष्टी सांगितल्या.

“खूनी पाहुणे  आले,यात आहे. मला आईने सांगितलं की खूनी  इथे आहे.ही यादी या व्यतिरिक्त कोणीही इथे आलेले नाही.”काशी

पोलीस इन्स्पेक्टरने यादी आणि त्यानुसार माणसं पडताळून पाहिली ज्योती बाथरूमला गेली होती, तिच्या साठी देखील थांबला. नाही त्याने निरखुन पाहीले माझी मैत्रीण हेमा बरोबर त्यांनी चर्चा केली .

“या मैत्रिणींपैकी कोणीही मैत्रीण तुमचा दुश्वास करत होती का ?”तपासणीसाठी  आलेल्या.

माझ्या मैत्रिणीने हेमा ने सांगितले,” अहो आमचे असे शत्रू, काही वैरी नाही .आम्ही संशय घेवून,खुनी म्हणू शकत नाही.

“ही 70 लोक आणि या यादी व्यतिरिक्त एक व्यक्ती देखील बाहेरुन आलेली नाही.”हेमा  माझ्या मैत्रिणीला नवरा वारला याचं आक्रंदन, काही दुःख नव्हतं. खून कोणी केला असेल, खून कोणी केला असेल याची कुरकुर  ती करत होती. शिवाय तिच्या बाकीच्या मुली “चांगल्या चांगल्या फंक्शनचे वाटोळे झाले .बघा मजा केली असती तर हे मध्ये झालं “असं म्हणत होत्या. एक-दोन

दिवसांनी बाबा मेले असते सुद्धा तरी चाललं असतं " अस देखील एका मुलीला म्हणताना मी ऐकलं .पोलीस इन्स्पेक्टर ऐकून न ऐकल्यासारखे करत होता. या सर्व मुली त्याच्या पुढे पुढे करत होत्या. पण तो हुशार होता तुमची तुमची पार्टी चालू ठेवा ,असं त्याने सांगितलं. त्यातले काहीजण खोलीत झोपायला गेले. काही जणांनी परत खायला प्यायला सुरुवात केली .मात्र सर्वजण वारंवार लघवीला जात होते आणि सार्यांना खोकला देखील येत होता. कुठल्या तरी पदार्थाचं तेल खराब आहे सगळेजण बोलत होते.

" खूप खोकत आहेत,त्या भाजीत,हुक्कात गडबड आहे" माझी मैत्रीण ज्योती म्हणाली. शास्त्रज्ञ आणि डॉक्टरांनी एकमेकांकडे पाहिलं .सत्य काय आहे ते मला आणि त्या दोघांना माहिती होतं, पण मी बोलू शकत नव्हते. माझ्या मैत्रिणीला हेमाला नवरा मेल्याचे,आता नंतरचे काही दुःख नव्हतं. ती "आपला विचका कोणी केला असेल? कोणी कोणी केला असेल? खूनी कोण ?मेला वाईट, मूड घालवला" अशी बडबड करत होती. पोलीस इन्स्पेक्टरने तिच्या कडे चमकून पाहिलं .त्याच वेळी एका खोलीतून आरडाओरडा सुरू झाला .काय आहे ते बघायला पोलीस आणि त्याचे दोन सहाय्यक या खोलीत गेले. त्या खोलीत रक्ताने भरलेला शर्ट सापडला होता. पोलिस चमकले.त्या चार भावांना ग्रील करायला सुरुवात केली.

"जर शर्ट या खोलीत असेल, तर खूनी इथला असेल ,तर या दृष्टीने त्या खोलीतील माणसांची झडती घेऊ "पोलिस महीलाना पण, पोलीस इन्स्पेक्टरने

ग्रील करायची सुरुवात केली .रक्ताने माखलेला शर्ट ओळखीचा तर वाटत नव्हता. मात्र शर्ट असलेली व्यक्ती उंच आणि धिप्पाड असावी असं वाटलं.

या काचेचे घर या हॉटेलच्या कर्मचाऱ्यांपैकी कोणी असेल? कदाचित यापूर्वीसुद्धा असं घडत असेल, पण लोक नींदे'च्या, पोलिस त्रास या भीतीने या गोष्टी सांगत नसतील. काचेचे घरचे कर्मचारी मात्र आरामात वावरत होते .ते कर्मचारी होते का काशीचे मित्र आहोत याचा सुद्धा मला प्रश्न पडला. कारण ती सर्व काशीची हसून खेळून वावरत होते. यापूर्वीसुद्धा काशी ने एक पुण्यातला हॉटेल चालवायला घेतलं होतं. त्यामुळे काशी ने सुद्धा काही भानगड केले असण्याची आणि हे सर्व नुकतेच लागे बंधारा वाले असलेले असण्याची शक्यता होती.

मला भीती वाटली आणि नंतर असे वाटले की आपण किती चीप आहोत. एवढ्या व्यक्तींबद्दल वाईट माहिती असूनही त्या व्यक्तींच्या कार्यक्रमाला आपण आलो कशाला?

चूक झाली होती आत चौकशी चालू होती. पैसे वगैरे प्रश्न 70 जणांना विचारले जात होते .पोलीस इन्स्पेक्टर मला मात्र काही विचित्र प्रश्न विचारत नव्हतं आणि मी सुद्धा फारच बोलायचं ठरवलं नाही असं ठरवलं होतं.

आता चूक ती सुधारू शकता येत नव्हती.मी बेटावरील होटेल मध्ये अडकले होते. पोलिस चौकशी केली असता,मग कळले.हेमाच्या नवर्‍याला पैसे जवळ होते ,म्हणून मारले असावे.

पूर्णपणे चौकशी संपेपर्यंत कुणीही बाहेर जायचे नाही आणि कुणीही बाहेर येत असतील तर आरक्षित करून द्यायची असं ठरलं होतं. ते जेवण जेवून जे काही होते ते सर्वजण रात्री चौकशी संपल्यावर बारा-साडेबाराला झोपले. सगळ्यांच्याच मनात भीती होती,पण दारु इंजेक्शन चा परिणाम म्हणून झोपले होते.

सकाळी मागच्या रस्त्याने मी निघाले .मी पळत असताना थोडी पुढे गेल्यावर मला थांब थांब असा आवाज ऐकू आला.

"ही ला भुताटकी !माझा पाठलाग करत आहे की काय?"मी ही थांबले नाही.

पण ज्योती मागून आली आणि म्हणाली, “ मला सोडून गेलीस का ?मी पण तुझ्या सोबत येणार.” आम्ही दोघी जंगलाबाहेर आलो.हायवे समोर दिसू लागला.

दोघींना आनंद झाला.संकट टळले.highway वर बसस्थानक होते,बसने मुंबईला परत आल्या बरोबर मी बस स्टेशन वरूनच, गाडी करून ज्योतीला दवाखान्यात नेलं.

“ यांना पूर्ण तपासा यांनी बहुतेक चुकीच इंजेक्शन घेतले आहे.” मी ज्योती समोरच डॉक्टर ला म्हणाले.

गोंधळून बावचळलेली महिला नर्स व्यक्ती म्हणाली , “काय बोलता हो ?”

“ज्योती मी ऐकलं ते इंजेक्शन विचित्र होतं “मी ज्योती चे कानात कुजबुजले.

“अरे बापरे आपण कशा,यात मोठ्या संकटात फसलो”असे म्हणू लागली.मी तिला गप्प बसायची खूण केली. डॉक्टरांनी इंजेक्शनचा दुष्परिणाम होऊ नये ,म्हणून औषधोपचार केले. आम्ही आमच्या घरी परत आलो. सुदैवाने त्या घटनेनंतर आम्ही कधीही हेमाच्या कुटुंबाशी संपर्क साधला नाही .

पोलीस खरे होते का खोटे होते.चौकशी झाली की नाही याबद्दल काहीच कळलं नाही. आम्ही मैत्रिणींना ठरवलं यापुढे असे जायचे नाही .आम्हाला आठवी अतिविश्वास टाकून आम्ही गेलो होतो. मजा ही सजा होऊ शकत होती .

काचेच्या घरात राहण्याचं महागडे स्वप्न काही खर्च न देता, पैसे खर्च न करता, पूर्ण होणार म्हणून हावरटासारखे गेलो होतो ,पण ती मजा सजा ठरली .या जगात काहीच स्वस्त मिळत नसतं किंवा कुणी कुणाला काही फुकट देत नसतं .दिलेल्या गोष्टी च्या बदल्यात अनेकपटीने मोबदला लोकांना हवा असतो. हेमाकडच्या साखरपुड्यात आम्हाला तोच धडा मिळाला. अशी काचेच्या घरासारख्या पॉश हॉटेलमध्ये राहण्याची संधी, सहजासहजी कधीच मिळत नसते आणि ती मिळाली तरी तो धोका ठरू शकतो.आज तर ड्रग चे प्रमाण फार वाढले आहे.

***

# 4 मधुमालती Madhu malati

माझं नाव मालती ,मी आधुनिक स्त्री आहे.मी मालती आणि माझ्या पती देवाचं नाव होतं मधू! आमच्या दोघांच्या पतिपत्नींचे नावाची अक्षरे जुळवून आम्ही मधुमालती नावाचा सुंदर बंगला ठाणे येथे बांधला होता . मुंबईत स्वतःचे घर म्हणजे अप्रूप असतं. अशावेळी बंगला म्हणजे काय विचारा? आमचा ठाण्यातला बंगला खूप सुंदर होता. माझ्या दोन मुलांपैकी एक मुलगा कलैकुंदा येथे नोकरीच्या निमित्ताने राहत होता . हा माझा मोठा मुलगा मध्यम श्रीमंत होता आणि धाकटा मुलगा ऑस्ट्रेलियाला नोकरी करत मालामाल होता. ऑस्ट्रेलियात तर त्यांनी एका गुजराथी मुलीशी प्रेमविवाह केला होता आणि त्याचा तो खुश होता. मी माझ्या पती सोबत आनंदात राहत होते. वयोमानाने माझ्या पति देवांना अटॅक आला होता. एक आखरी इच्छा म्हणून त्यांनी मृत्युपत्र केले.पतीला शेवटचे कलईकोंड्याला आपल्या मुलाकडे जायचं होत.आम्ही जाणे बेत करून नीट असं ठरवलं.

खूप टुर्सना आणि कुठेही सहलीला जाताना माझे भाऊ आणि वहिनी आमच्यासोबत सहसा येतातच येतात . तर Kalaikonda kolkatta,ला,कलई कोंडाला त्या वर्षी ,मोठ्या मुलाकडे ,जेव्हा माझ्या पतिसह कलईकोंडाला गेलो होतो, तेव्हा दोघ सोबत आले. तिथे हवा छान होती.माझ्या पतिला जरी

पॅरेलेसिस होता.त्यांची स्वतःची तब्येत खूपच खराब होती,पण ते मजा घेत होते.पतीची शेवटची इच्छा म्हणून तर ईथे आलो होतो.

पति असेही इथे मुंबईत फारशे दिवस जगतील, असं वाटत नव्हतं. लाडका मोठा लेक त्याचा संसार बघणे ,ही पण त्यांची शेवटची इच्छा होती. म्हणून आलो. या कलईकोंड्याला घरी हवा सुंदर होती .बाग,सुंदर विहीर होती.हे खूप खूष होते.पण बागेत मोठ्या पाली होत्या. बागेत दुधीची वेगवेगळे मोठे वेल होते.मोठे चींचेचे झाड होते.पहाटे ठराविक वेळी, आंधळा हरी नावाचा,वृध्द भिकारी बासरी वाजवत येई.सारे ठीक होते. मात्र एक प्रकारे अशुभ वाटायचं .संध्याकाळीखूप सुंदर असत.पण वहिनी घाबरत असे आणि एका रात्री ठराविक वेळी घाबरुन सर्वच जणांनाजाग येई. आम्ही मजेत होतो. खूप सुंदर दिवस गेले.खुशी होती.

एका रविवारी सहलीला कालीमाता देवळात मस्त जाऊन आलो.ते शारीरिक त्रासाचे होते. पण मजा आली. रात्री घरात सगळे होते,झोप लागली. रात्री त्याच ठराविक वेळी मला जाग आली.मला माझ्या पति देवांचे रडणे ऐकु आले.त्यांच्या छातीत दुखायला लागलं होत आणि ते ओरडत होते. मी मुलाला उठवले ,पण दहा मिनिटात सगळं संपलं.पति वारले.कधीतरी ते होणारच होतं .

मला उगीचचसहलीला गेले म्हणून स्वतःची चीड येत होती. पण मुलाचे घरात मृत्यू झाला हे बर झाले असेही वाटत होते.मुलाचे हातून देह संस्कार झाले.त्या प्रसंगी मुलगा जवळ होता त्यामुळे मला पण आधार झाला .मुलाचे बरेच मित्र जमले. घरात मुलगा ,सून,माझे भाऊ आणि वहिनी मोलकरीणी

होत्या.  अजून एक चोवीस तास काम करणारी मोलकरीण आणि लावून घेतली होती. मी,पति , माझे भाऊ वहिनी अशी चौघे सहली बरेचदा करायचो.यावेळी देखील ते दोघे  सोबत होते. मुलाचे मित्र जमले.मित्रांनी बंगाली रितीने , शांती करून स्मशानात नेले.मोठा मुलगातिकिटमहागम्हणूनआला नाही.

प्रेत नेतांना त्या बंगाली किरवंतांचे पद्धतीनुसार अंगावरची कपडे सर्व काही दान केले होते.मोलकरीणीची मुलगी तिला,माझ्या  पतीच्या सर्ववस्तु दान करण्यात आल्या.माणसाला अचानकपणे अस कस मरण येतं ?.पश्चिम बंगालचे रितीने मला वाटलं ते दान,कपडे शाली चादर सामान मी घरात काम करणाऱ्या कल्पना नावाचे मुलीला दिले. तिला पण खूप आनंद झाला दान केलेल्या वस्तू अगदी बचळी,  काठी ,औषधी डबे ,सलवारी शर्ट सर्वकाही घेऊन ती गेली.घर कामाला असलेली कल्पना नावाची मुलगी सर्व सामान आनंदाने बांधून घरी घेऊन गेली .तिने आयुष्यात कधीच ईतके सामान पाहिलं नव्हते. बंगालमध्ये गरिबी आहे.कल्पनाचे घरी दारिद्र्य होतं. गरिबी वाईट असते त्यामुळे अशावेळी तुम्ही दिलेली अडगळ, ती अडलेली व्यक्ती किंवा अन्य कोणी,जे असेल ते काही मोहापायी तो ते असे दान स्वीकारतो. असं तिने स्वीकारले.

दुसऱ्या दिवशी कल्पना  कामावर आलेली असताना बाथरूममध्ये कपडे धूत होती. त्यावेळी ती खाली बसून,कपडा पिळत असतांना मी दरवाज्यातून डोकावून पाहिलं  आणि ती कल्पना जोरात ओरडली. कामात असल्यामुळे मला बघताच दचकली . "भाऊ,भाऊ" असं ओरडून ऊभी राहीली आणि पुन्हा मटकन खाली बसली. त्यानंतर ती चार-पाच दिवस कामाला आली नाही. “

मला बरं नव्हतं मला ताप होता''असं कारण तिने काहीतरी सांगितलं. चौदाव्या चा विधी करून आम्ही परत येत असताना मी बघितलं, की त्या कचराकुंडी वर कल्पनाने,काठी बॅग आणि माझ्या आमच्या घरून नेलेले सगळे कपडे ,शाली वस्तू उकिरड्यावर फेकून दिलेल्या आहेत. माणूस कितीही गरजु असला त्याला पैशाची गरज असली तरी त्याला जीव प्यारा असतो.सामान  घेऊन जायला माणूस तयार असतो पण जीवाची  भिती वाटते. त्यामुळे कल्पनाने  घेतल्या आहेत ,त्या वस्तू फेकून देण्याचे मार्ग पत्करला होता.

मला थोडं वाईट वाटलं कुणाच्या तरी उपयोगी येतील किंवा या दिल्या या कारणांमुळे ती मुलगी /वाॅचमन घरात अधिक चांगलं काम करेल म्हणून काही काही चांगल्या वस्तू आणि काही काही चांगले कपडे दिले.शाली उपयोगी पडल्या असत्या. आणि तरीदेखील मी कल्पनाला दिल्या होत्या पण कल्पना घाबरली आणि त्या फेकून दिल्या .असो जीवाची भीती वाटली की माणूस काहीही करायला तयार होतो. आम्हाला सुद्धा भटजींनी ,ईथल्या  पद्धतींनी घाबरवून सोडलं होतं .

''वाईट मुहूर्तावर तुमच्या पतीचा मृत्यू झाल्यामुळे मोठी शांती करावी लागेल अन्यथा घरातील पाच जणांचा मृत्यू होईल'' असं सांगितल्यावर आम्ही शांती केली. विधी झाले पण तरीही अनामिक भितीही उरली .ठरल्याप्रमाणे ज्या दिवशी परत येणार होतो त्याच्यापुढे तेरा दिवस मुक्काम वाढला.

पतिचा तेरावा करून आम्ही दोन दिवसांनी ठाणे येथे परत आलो. मी आणि भाऊ वहिनी ठाणे येथे येताच वहिनी म्हणाली, “ आम्ही दिव्याला आमचे घरी जातो.”

“ अहो आपण तिथे एकत्र होतो.ठाणे येथे ,या घरी मी आणि माझे पतीदेव राहत होतो, आता मी तिथे एकटीच आहे.मला घर खायला ऊठेल.मी तुमच्या घरी चार दिवस येते..”मी (मालती)

“तुम्ही शक्यतो आता सवय करून घ्यायला हवी.”वहिनींची बत्तीशी बोलली.

“,मी तुमच्या घरी येऊ का?काही दिवसांनी परत माझ्या घरी येणार.”मी

“नको आमच्या घरी!दिव्याचे  घर लहान आहे, वाटलं तर आम्ही दोघे ठाणे येथे  तुझ्या घरी राहतो.”

मला ते दोघे पुन्हा ठाणे येथे  ,माझ्या घरी यायला, राहायला नको होते. खर्च,पसारा करणे,कपडे धुवायला टाकणे अति खाणे मला अति परिचयात अवज्ञा झाली होती.लहान आॅस्ट्रेलियन मुलगा बापाचे दिवस करायला सुद्धा आला नव्हता. कारण त्याला तिकिटाचा एक लाख रुपये खर्च येणार होता.ठीक आहे.तशी मी सुद्धा व्यवहारी आहे त्यामुळे मी देखील फारसा विचार केला नाही.

सुखी काळात सोबत असलेले भाऊ वहिनी दिव्याच्या त्यांचे घरी गेले.मी एकटी ठाणे येथे,मधु मालती बंगल्याच्या  घरी  आले.आता मी एकटी

राहते.कधीमधी भाऊ वहिनीएक दोन दिवस येतात.पण त्या वेळी मला दिव्याच्या घरी नेले नाही.अजून हे मला खटकते.मधुमालतीचे जोडीत मालती एकटीच उरली आहे.

***

# 5 .अदलाबदल

मी नोकरदार वृद्धा ,पतीचे मृत्यु नंतर दोन वर्ष काढली.पण निवृत्ती नंतर एकटे राहणे अवघड होते.मुलाकडुन सुनेचे बाळंतपणासाठी आमंत्रण येताच मी खूष झाले.

लगेच  या ऑस्ट्रेलियातील मुलाकडे सहा महिने जायचं असं मी ठरवलं.विसा व  तिकिट झाले.या मोठ्या बंगल्यात भाड्याने देणे ठरवल्यावर बर वाटल.भाडेकरू मिळाले  पासून, भाडे अॅडव्हान्स भरपूर मिळाले.  मी आनंद घ्यायला, खर्च करायला लागले. परदेशात जाण्याची तयारी, खरेदी  त्या पॅकिंग ला सुरुवात केली.सर्व जण जळत होते.

ठराविक दिवशी सर्व घर भाड्याने देणे उरकून विमानतळावर बहिणीसह पोचले.विमानाने ऑस्ट्रेलिया  पोचले.मी परत भारतात येणार नाही हे ठरवले होते. त्यामुळे मी तडजोड करुन या मुलाशी सुनेशी पटवून घेत राहणे मनात ठरवले होते. तिथे पोहोचतात सून नातीला  बेबीसिटींग  सारख ठेवायचे सोडून,तिचे आजीशी सख्य  वाढवण्यासाठी तीन दिवस घरी ठेवून बाळीला घरात ठेवू लागली .त्यामुळे फारसा त्रास नव्हता.फावला वेळ होता.  भरपूर काम करायची सवय लागली. मुलाचे मित्र-मैत्रिणी जमायचे.मी चवीने त्यांना दहा बारा  किलो चिकन बनवायचे.  त्याची दारू ची व्यवस्था असायची.

त्यांच्यासोबत मी पण खाऊन  पिऊन मजा करी.सर्व काही ठीक चालू होतं जर एवढे सुख मिळणार असेल,तर तडजोड करायला मी तयार झाले.सून एकत्र कुटुंबात राहिलेली होती, त्यामुळे स्वभावाने चांगली होती. ते सर्व काही आनंदात चालू होतं .त्यामुळे त्यामुळे दिवस खुपच आनंदात चालले होते .असे सहा महिने झाले .

.मात्र एक दिवस सुने चे वडील तात्या तिथे हजर झाले. तसे ते एकदम बावळट पण ते त्यांच्या मुलाकडे न्यूझीलंडला राहत होते ,तिथून त्या लोकांनी गाडी करून दिली. नक्की काही माहीत नाही पण तिथे भांडणं झाली असावी. बदल म्हणून तात्या आपल्या लेकीकडे ऑस्ट्रेलियात म्हणजे सिडनीला आमच्या घरी हजर झाले. मला काहीच बोलता येईना. मुलाच्या घरात एकच बेडरूम  एक्स्ट्रा होती. त्या बेडरूम मध्ये मी  आहे. तो वृद्ध माणूस ईथे कसा राहणार ?

"आई लोक राहतात , आपण मुंबईसारख्या गर्दीत राहीलो.चाळीत खूष होतो ना आपण!तडजोड कर"असे म्हणाले.खोली तात्याला द्यायच्या सूचना सुनेने दिल्या .पण  मी तात्यांना माझ्या रुमचा ताबा  दिला नाही. तो वृद्ध काका,तात्या असे त्याला सर्व म्हणायचे. तात्याची राहणी अती अस्वच्छ होती.तो कुठेही थुंकी.कसेही काय ,काहीही करायचा, बोलायचं .फोनवर बोलायला मी कुठे आहे असा अंदाज घेण्याच्या नादात ,मागे मागे यायचा. त्यामुळे माझे स्वातंत्र हरवून बसले .मला भारतात मित्र-मैत्रिणींशी गा ॅसिप

करणे आवडे. माझ्याशी गप्पा मारण्यात नंबर एक वर माझा एक मित्र होता त्याच्या बरोबर मी काही वेळ खास गप्पा मारत होते.

प्रत्यक्षात तात्या एखाद्याचे आयुष्यात आल्यामुळे त्रास होईल असे होते .माझ्या रुटीन मध्ये खंड पडला आहे. पण माझ्या सुनबाईला आपल्या वडिलांना जा अस सांगायचं नव्हत.ती तात्या ला आता न्युझीलॅंडला परत पाठवायला तयार नव्हती .त्यामुळे मीही तात्यांशी केसरी जुळवायचे ठरवुन, मन घट्ट करून घेतलं .

मी व्रत करायचे ,मी देवाला प्रार्थना करायचे, देवा तात्याना लवकर कुठे तरी पाठव.वर ऊचल.मला परत भारतात त्या मूर्ख लोकांबरोबर ,अस्वच्छ अशा जुन्या फ्लॅट मध्ये नको वाटत होते.मला वय जास्त होते तरी ईथे मजा येत होती.तिथे भारतात जाण्यात रस राहिला नव्हता.मला फॉरिनची चटक लागली होती. पण माझ्या संकटातून सोडायला कोणी येईल; असं मला वाटत नव्हतं .मी देव देव करायला सुरुवात केली मंत्रांत वाढ केली.अघोरी उपाय केले. अनेक देवाला साकडे घातले.

मार्च 2020 आले. त्यात एक दिवस ऑस्ट्रेलियात सुद्धा, मार्च 2020 मध्ये करोना ची साथ पसरली .भारता एवढी झपाट्याने नाही पण पसरली.भारतात पटापट किडा-मुंगी सारखी माणसं मरत होती.ईथे जरा बरं होतं.

एक दिवस गुटखा खावून खोकणाऱ्या तात्याला पण त्या साथीत हॉस्पिटलमध्ये ॲडमिट केलं गेल होतं .त्यामुळे थोडावेळ मला बरंच वाटलं .कटकट मिटली .म्हाताऱ्या चा त्रास कमी झाला, म्हणून मी खूष झाले.तात्या

होते ते हॉस्पिटल चांगलं होतं. फुकट होतं. हव त्यावेळी जेवण-खाण मिळे,तात्या फोनवर म्हणत होते ,"मी ठीक आहे." अर्थात म्हाताऱ्याला ईथे तेथे थुंकायची सवय असल्यामुळे ते आणि ईतर कितपत खुश राहु शकतात, संशय होता. पण निदान एक महिना तिथे quarantine मध्ये तात्या राहिल्यामुळे घरी काही अडल नाही,फार फरक पडला नव्हता.मी खूपच खूष होते.

एक दिवस कोविड हॉस्पिटल मधून फोन आला.

"सरकार तर्फे कळवतो की त्या quarantine मधील तात्यांचा मृत्यू झाला आहे. त्यांची बॉडी इथे करोना असल्यामुळे, परस्परांच्या संमतीने जाळली जाईल.सामान घरच्यांना देण्यात येईल .मात्र तात्यांचं सामान जर आपणाला न्यायचे असल्यास , आपण स्वत यावे लागेल. अंत्यदर्शनासाठी आपण येऊ शकता." सुन मुलगा मी आम्हाला काही कोणाला तात्या बद्दल फार प्रेम नव्हते.मी हॉस्पिटल मध्ये गेले नाही. सून मुलगा हॉस्पिटलमध्ये गेले. त्यामुळे कोण परत येईल त्यांनी येताना कोणते सामान परत आणायच, हा त्यांचा प्रश्न होता. या सामानात मोबाईल, बॅगमध्ये सामानात वॉकमन भारी बूट मोजे, कराओके, रेडिओ, चामड्याचे हॅन्ड ग्लोव्हज,भारी भारी स्वेटर टोप्या थंडी सामान होतं. मोबाईल सुद्धा तात्या ना मुलीने नवा भारी घेऊन दिलेला होता .

"आहे ते सगळे एखाद्या पिशवीत बांधावे आणि घरी घेऊन यावं "असं मी मुलाला सुचवलं.

"अरे या जुन्या वस्तू भारतात नेऊन एखाद्या गरिबाला दिल्या किंवा बिल्डिंगचे वॉचमनला,कामावरच्या बाईला दिल्या तरी आयुष्यभर त्या

कामगारानी सेवा केली अस समज." सामान पण टाकाऊ नव्हतं आणि त्या वस्तू देऊन आपण एखाद्याला आयुष्यभराचा गुलाम करू शकतो ,याची मला जाणीव झाली .

“काय असेल ते या पिशवीत भरून आणा आणि ठेवा बाहेर!आठ दिवसांनी सूर्यप्रकाशाने करोना वायरस गेल्यावर नंतर आपण ते बघू! त्याचे काय करायचे ते .गैराज सेल बघु किंवा भारतात जाईन तेव्हा घेऊन जाईल. मृत्यूपत्र रजिस्टर करण्यासाठी आणि एक फ्लॅट विकण्यासाठी मला भारतात जायचं आहे.".मुलगा बंटी आणि सुन यांना असं मी सांगितलं  असलं तरीही नंतर मान वर  करून म्हणाले.

“ तुमची इच्छा नसेल तर या वस्तू आणू नका.” असे देखील सांगितलं कारण मला माझ्या पतीच्या मृत्युचे नंतर दिलेल्या सर्व वस्तू सामान एखाद्या कचराकुंडी त पडलेल्या दिसल्या.

“अंगणात पार कोपऱ्यात ठेवता येईल.तिथे ठेवल्यावर करोनाची काळजी संपल्यावर,भारतात जायच म्हटल्यावर ,किमान दोन-तीन महिन्यांनी भारतात जातांना मला ते नेता येईल .”मी

मोलकरीणीने ते दान तिला दिलेल्या सर्व सामानासह नंतर कचराकुंडी वर फेकलेले मला आठवत होते.

“मी भारतात ठाण्याला नेणार आहे त्यामुळे आण”मी हे सांगितल्यावर सुनं हो म्हणाली .सून अजून सुद्धा कंजूष आहे.ती चिकट आहे. त्यातल्या काही गोष्टी सेकंड हॅन्ड गॅरेज सेल मध्ये विकेल.

बॉडी झाकलेली होती.तर अशा रीतीने तात्यांचे अंत्यसंस्कार परस्पर तिकडे करण्यात आले. येताना एका मोठ्या पिशवीत सामान आलं.मागेकोपरा आहे तिथे ठेवण्यात आले. सामान ठेवण्यासाठी जुना रेनकोट कव्हर म्हणून ठेवला. नातीचे फुलाफुलांचे दुपटे वर टाकल्यावर वर, कार्पेट टाकण्यात आले आणि तात्या ची आठवण म्हणून बागेचा कोपरा खूप छान झाला.

आता hello dear करत मी मित्रासोबत गप्पा मारू लागले .तात्या चे मृत्यूने मी सुटले. असे चाळीस दिवस गेले.आता मी मजेत होते.

एका दुपारी कोविड हॉस्पिटल मधून फोन आला आणि फोन आल्यावर त्या वक्ता ने सांगितले.

“ईथे असतात,त्या तात्यांची तब्येत सुधारली आहे.घेवून जा" .त्यानंतर तात्यांची ‘मला घरी यायचयं ,न्यायला या.मृतदेहांची गडबड झाली.’असे बोलले.

मला ते काय बोलतात कळेना आणि त्यांच्या बोलण्यातून वारंवार जाणवत होत,ते तात्या आहेत वर काहीतरी गडबड आहे.

“आपण ते सामान उघडून बघा”मी

मी इथे ठेवलेले सामान उघडून बघितले. कुठल्या तरी दुसऱ्या गायकवाड नावाच्या माणसाचे आहे. सुन मुलगा ऑफिसला गेले होते. काय करावे?त्यावेळेस सामान बघितलं असतं तर कदाचित कळले असत.चुक झाली नसती.

“ तुम्हाला सामान दिल गेले होते ते दाखवा.केस बंद करा.” वक्ता. मला लक्षात आलं मृतदेहांची अदलाबदल झाली होती. संध्याकाळी तात्यांना घेऊन, सून नात परत घरी आले. मला अन्य कोणालाच आनंद झाला नव्हता, पण आम्ही वरवर वा वा असे दाखवत होतो.माझी बेडरूम तात्याजींना करोनाचा सरव्हायवर म्हणून काही परत केली गेली दिवसा करिता.परत केली गेली.

अरुंद पलंगावर आराम  करण्यासाठी मी त्यामुळे परत लोळताना नाराज राहू लागले.मला भारतात  परत जायचे नव्हते..कोरोना  झालेला तात्याला परत हॉलमध्ये जायचं नव्हतं. मी परत तात्यांनी परत जावे म्हणून व्रत सुरु केल होतं. कारण ऑस्ट्रेलियन एलियन दर्जाचे जीवनाची  चटक लागली होती .

आस्ट्रेलियात या दोन फुट रुंदीच्या पलंगावर बसून आणि कुचंबून  बसताना मला भारतातल्या  घराची आठवण येई.मी दिवस काढत होते.ईथे बागेत मधुमालतीचा वेल लावला होता.पॉश घर मजा विकेंड सहली,खाणे पिणे मोकळेपणाने पॅट शर्ट घालत फिरणे सोडून मला परत जायचे नाही.

तात्यांचे बरे वाईट व्हावे म्हणून मी परत व्रत सुरु केली.

याला पर्याय कुठे  आहे??

अदलाबदल झाली.ऑस्ट्रेलियन मुलगा दिवस करायला सुद्धा आला नव्हता. कारण त्याला तिकिटाचा एक लाख रुपये खर्च येणार होता.ठीक आहे मी सुद्धा व्यवहारी आहे त्यामुळे मी फारसा विचार केला नाही.

मी एकटी ठाणे येथे,मधु मालती बंगल्याच्या घरी येताच या ऑस्ट्रेलियातील मुलाकडे सहा महिने जायचं असं मी ठरवलं.विसा व तिकिट झाल.या मोठ्या बंगल्यात भाड्याने देणे ठेवल्यावर बर वाटल.भाडेकरू मिळाले पासून, भाडे अॅडव्हान्स भरपूर मिळाले. मी आनंद घ्यायला, खर्च करायला लागले. परदेशात जाण्याची तयारी खरेदी त्याला सुरुवात केली.सर्व जण जळत होते.

ठराविक दिवशी सर्व घर भाड्याने देणे उरकून विमानतळावर बहीण सह पोचले.विमानाने ऑस्ट्रेलियात पोचले.मी परत भारतात येणार नाही हे ठरवले. त्यामुळे मी तडजोड करणे या मुलांशी सुनेशी पटवून घेत राहणे मनात ठेवले होते. तिथे पोहोचतात सून नातीला बेबीसिटींग सारख ठेवायचे सोडून,तिचे आजीशी सख्य वाढवण्यासाठी तीन दिवस घरी ठेवून बाळीला घरात ठेवू लागली .त्यामुळे फारसा त्रास नव्हता. होता भरपूर काम करायची सवय लागली. मुलाचे मित्र-मैत्रिणी जमायचे.मी चवीने त्यांना दहा किलो चिकन बनवायचे त्याची दारू ची व्यवस्था असायची. त्यांच्यासोबत मी पण खाऊन पाणी पिऊन मजा करी.सर्व काही ठीक चालू होतं जर एवढे सुख मिळणार असेल,तर तडजोड करायला मी तयार झाले.सून एकत्र कुटुंबात राहिलेली होती त्यामुळे स्वभावाने

चांगली होती. ते सर्व काही आनंदात चालू होतं .त्यामुळे त्यामुळे दिवस खुपच आनंदात चालले होते .असे सहा महिने झाले .

.मात्र एक दिवस सुने चे वडील तिथे हजर झाले. तसे ते एकदम बावळट पण ते त्यांच्या मुलाकडे न्यूझीलंडला राहत होते तिथून त्या लोकांनी गाडी करून दिली. काही माहीत नाही पण तिथे भांडणं झाली. बदल म्हणून तात्या आपल्या लेकीकडे ऑस्ट्रेलियात आमच्या घरी हजर झाले. मला काहीच बोलता येईना. मुलाच्या घरात एकच बेडरूम होती. त्या बेडरूम मध्ये मी आहे. तो वृद्ध माणूस ईथे कसा राहणार ?राहतात , मुंबईसारख्या गर्दीत असे म्हणायचे. मी त्यांना माझ्या रुमचा ताबा दिला नाही. तो वृद्ध काका,तात्या असो त्याला सर्व म्हणायचे. तात्याची राहणी अती अस्वच्छ होती.तो कुठेही थुंकी.कसेही काय काहीही करायला, बोलायचा .फोनवर बोलायला मी कुठे आहे असा अंदाज घेण्याच्या नादात मागे मागे यायचा. त्यामुळे माझे स्वातंत्र हरवून बसले .मला भारतात मित्र-मैत्रिणींशी गॉसिप करणे काय आवडे. माझ्याशी गप्पा मारण्यात माझा एक मित्र होता त्याच्या बरोबर मी काही वेळ खास गप्पा मारत होते. प्रत्यक्षात तात्या एखाद्याचे आयुष्यात आल्यामुळे त्रास होई.माझ्या रुटीन मध्ये खंड पडला आहे. माझ्या सुनबाईला आपल्या वडिलांना जा सांगायचं नव्हत.ती तात्या ला आता न्यझीलॅडला परत पाठवायला तयार नव्हती .त्यामुळे मीही तात्यांशी जुळवायचे ठरवुन मन घट्ट करून घेतले .व्रत करायचे मी देवाला प्रार्थना करायचे, तात्याना लवकर कुठे पाठव.वर ऊचल.मला परत भारतात त्या मूर्ख लोकांबरोबर तिथे जाण्यात रस राहिला नव्हता. माझ्या संकटातून

सोडायला कोणी येईल; असं मला वाटत नव्हतं .मी देव देव करायला सुरुवात केली,वाढ केली.अघोरी उपाय केले. अनेक देवाला साकडे घातले.

मार्च 2020 आले. त्यात एक दिवस ऑस्ट्रेलियात सुद्धा, मार्च 2020 मध्ये करोना ची साथ पसरली .भारता एवढी नाही पण पसरली.भारतात पटापट किडा-मुंगी सारखी माणसं मरत होती.ईथे बरं होतं.

गुटखा खावून खोकणाऱ्या तात्या ला पण त्या साठी हॉस्पिटलमध्ये ऍडमिट केलं गेल होतं .त्यामुळे थोडावेळ मला बरंच वाटलं .कटकट मिटली म्हाताऱ्या चा त्रास कमी झाला, म्हणून मी खूष झाले.तात्या होते ते हॉस्पिटल चांगलं होतं. फुकट होतं. हव त्यावेळी जेवण-खाण मिळे,तात्या म्हणत होते मी ठीक आहे. अर्थात म्हाताऱ्याला तेथे थुंकायची सवय असल्यामुळे ते कितपत खुश राहतात संशय होता. पण निदान एक महिना quarantine मध्ये राहिल्यामुळे घरी काही फरक पडला नव्हता.मी खूपच खूष होते.

एक दिवस हॉस्पिटल मधून फोन आला.

"कळवतो कि त्या quarantine त तात्यांचा मृत्यू झाला आहे. त्यांची बॉडी इथे करोना असल्यामुळे परस्परांच्या संमतीने जाळली जाईल.सामान घरच्यांना देण्यात येईल .मात्र तात्यांचं सामान जर आपणाला न्यायचे असल्यास तर आपण यावे. अंत्यदर्शनासाठी आपण येऊ शकता." सुन मुलगा मला काही कोणाला तात्या बद्दल प्रेम नव्हते.मी हॉस्पिटलचे गेले नाही. सून मुलगा हॉस्पिटलमध्ये गेले. त्यामुळे कोण येईल त्यांनी सामान आणायच, हा त्यांचा प्रश्न होता. सामानात मोबाईल, सामानात वॉकमन भारी बूट मोजे कराओके,

रेडिओ चामड्याचे हॅन्ड ग्लोज भारी भारी स्वेटर टोप्या थंडीच सामान होतं. मोबाईल सुद्धा मुलाने नवा भारी घेऊन दिलेला होता .ते सगळे एखाद्या पिशवीत बांधाव आणि घरी घेऊन यावं असं मी मुलाला सुचवलं. या जुन्या वस्तू भारतात येऊन एखाद्या गरिबाला दिल्या किंवा बिल्डिंग वा ॅचमनला,कामावर बाईला दिला तरी आयुष्यभर त्यांनी सेवा केली असती. सामान पण टाकाऊ नव्हतं आणि त्या देऊन आपण एखाद्याला आयुष्यभराचा गुलाम करू शकतो ,याची मला जाणीव झाली .

“काय असेल ते या पिशवीत भरून आणा आणि ठेवा बाहेर!आठ दिवसांनी सूर्यप्रकाशाने करोना गेल्यावर नंतर आपण ते बघू काय करायचे ते .बंटीराजे बघ किंवा भारतात जाईन तेव्हा घेऊन जाईन. मृत्यूपत्र रजिस्टर करण्यासाठी आणि एक फ्लॅट विकण्यासाठी मला भारतात जायचं आहे .मुलगा बंटी आणि सुन असं सांगितलं असलं तरीही नंतर मान वर करून

“ तुमची इच्छा असेल तर या वस्तू आणू नका.” असे देखील सांगितलं कारण मला माझ्या पतीच्या मृत्युचे नंतर कल्पना ने दिलेल्या सर्व वस्तू सामान एखाद्या कचराकुंडीत टाकलेल्या आठवल्या.

“अंगणात पार कोपऱ्यात ठेवता येईल.तिथे ठेवल्यावर करोनाची काळजी संपल्यावर,भारतात जायच म्हटल्यावर किमान दोन-तीन महिन्यांनी भारतात जातांना मला ते नेता येईल .”मी

कल्पना नावाच्या मोलकरीणीने ते दान तिला दिलेल्या सर्व सामानासह नंतर कचराकुंडी वर फेकलेले मला आठवत होते. “मी भारतात ठाण्याला नेणार

आहे त्यामुळे आण''मी हे सांगितल्यावर सुनं हो म्हणाली .सून अजून सुद्धा कंजूष आहे.ती सोबत आहे त्यातल्या काही गोष्टी तिने सेकंड हॅन्ड गॅरेज सेल मध्ये विकेल.

बा ॅडी पडलेली तर अशा रीतीने त्यांचे अंत्यसंस्कार परस्पर तिकडे करण्यात आले. येताना एका मोठ्या पिशवीत सामान आलं.कोपरा आहे तिथे ठेवण्यात आले. ठेवण्यासाठी जुना रेनकोट कव्हर म्हणून ठेवला. नातीचे फुलाफुलांचे दुपट टाकल्यावर वर, कार्पेट टाकण्यात आले आणि तात्या ची आठवण बागेचा कोपरा खूप छान झाला.

आता hello dear करत मी गप्पा मारू.तात्या चे मृत्यूने मी सुटले. असे चाळीस दिवस गेले.आता मी मजेत होते.

एका दुपारी हॉस्पिटल मधून फोन आला आणि फोन आल्यावर त्यांनी सांगितले. ''ईथे असतात,त्या तात्यांची तब्येत सुधारली आहे .त्यानंतर तात्यांची 'मला घरी यायचं न्यायला या.मृतदेहांची गडबड झाली.'असे बोलले.''

मला ते काय बोलतात कळेना आणि त्यांच्या बोलण्यातून वारंवार जाणवत होत,गडबड आहे.

''आपण ते सामान उघडून बघा''

मी इथे सामान घेतले. कुठल्या तरी दुसऱ्या गायकवाड नावाच्या माणसाच आहे. सुन मुलगा ऑफिसला गेले होते. काय करावे?त्यावेळेस सामान बघितलं असतं तर कदाचित कळल असत.चुकल नसते.

“ तुम्हाला सामान दिल गेले होते ते दाखवा.केस बंद करा.” मला लक्षात आलं मृतदेहांची अंमळ अदलाबदल झाली होती. संध्याकाळी तात्यांना घेऊन परत घरी आले. मला कोणालाच आनंद झाला नव्हता, पण आम्ही दाखवत होतो.माझी बेडरूम तात्याजींना करोनाचा सरव्हायवर म्हणून परत केली गेली.

अरुंद पलंगावर आराम  करण्यासाठी, मी त्यामुळे परत लोळत,पण थोडी नाराज राहू लागले.मला भारतात  परत जायचे नव्हते..कोरोना  झालेले तात्याला परत हॉलमध्ये जायचं नव्हतं. मी परत तात्यांनी परत जाव म्हणून व्रत सुरु केल होतं. कारण ऑस्ट्रेलियन  दर्जाचे जीवनाची  चटक लागली होती .या दोन फुटाच्या पलंगावर बसून आणि कुचंबून  ठाण्यातल्या मधुमालती बंगल्याची आठवण काढत होते.

ईथे बागेत मधुमालतीचा वेल लावला.याला पर्याय कुठे  आहे??जागांची अदलाबदल झाली.

*****

# 6 सुपारी हवेली(असे मनी तसे मनी) :

श्रीमती पामेला एक आधुनिक सोप्पी गो लकी बाई होती.पति सुनिल सरळ होता. ही कथा सुनिल आणि पामेला यांची आहे.सुनिलचे साधेपणाची आहे की पामेलाचे चतुराई बद्दल आहे?बदललेल्या स्त्री व्यक्तीरेखेची आहे?पामेला च्या जीवनाची आहे.पामेला च्या वाट बघण्याची आहे की तडजोडीची आहे.तरी तशी पामेला आयुष्य तर मस्त जगली.मुलगा चांगले प्रकारे वाढवला.

नवरा बायको भांडण होतात,त्यात कोण बरोबर कोण चूक कसे ठरवायचे?

सुनिल

तसा सुनिल चवदा वर्षे वयाचा ,अडनिड्या वयात असताना, सुनिलची आई वारली.बायको वारल्यावर,वडिलांनी दुसरे लग्न केले.सुनिल आणि त्याच्या अर्धवट वयांच्या काळी, शेजारी पाजारांनी, “ अरे तुला आता सावत्र आई त्रास देईल”अशी राय दिली.सुनिल ,नव्या आईचे वागणे ,नव्या वातावरणातील जीवन,यांनी असं हादरून गेला. रागात घर सोडले.बदललेल्या हवेमुळे सुनिल घर सोडून पळून मळगाव येथे येऊन राहिला. काकांनी समजूत काढली. वडिल, आले,त्याची समजूत काढली, पण सुनिलला परत जायचे नव्हते.या वयात Ase mani tase mani,विचार येत.जावे वाटे,पण…

असे मनी तसे मनी,येते असे,म्हणे.

"मी येणार नाही"वडिल संतापत,म्हणत, "तुलाही कळेल संतान दूर जाण्याचे दुख काय असते."

अति दुर गेलेल्या पुत्रासाठी हाय खाऊन सुनिलचे वडील वारंवार म्हणायचे,

" मी मध्यम वयात लग्न केले.काय चुकलं? मी हे लग्नच करायला नको होतं का? माझा मुलगा मला दुरावला" त्या दरम्यान दुसऱ्या पत्नीपासून पण, सुनिलच्या वडिलांना दोन मुलं झाली. सर्व मुलांचे करता करता, तो बापमाणूस गांजून गेला. आणि सुनीलच्या वडिलांनी सुनिल बद्दल खंत काढून,सुनिलला आठवुन बिछाना पकडला. त्यावेळी त्यांनी सुनिलला भेटायला बोलावलं "मला सुनीलला भेटायचं" पण सुनिल मात्र अहंकारात जाणे टाळत होता. का? काय मनी होते सुनिलच्या ?की त्याला जुने वाईट दिवस आठवत होते,हे तो सुनिल जाणे. सुनिल त्यांना भेटायला जात नव्हता. सुनिलचे वडील म्हणत, "तुलाही कळेल संतांनाच दुःख काय असते? संतानांनी आपल्याला आदर केला नाही की किती वाईट वाटत .तुला माझे दुःख कळेल." असं म्हणत म्हणत सुनिलचे वडील वारले.

सुनिल मळगावला ,धणवंत काकांच्या मदतीने खोली घेऊन राहात होता. तिथेच सुनील शिकले. धणवंत काकांची घरात,अजुन तीन मुलं होती.लीला विजू आणि कमळ होती .घरांत सुनिल सहज आला, तसा तो घरात मिसळून गेला होता.धणवंत काकांकडे पण पैशाची चणचण असे ,मात्र आपल्या तिघे मुलांसोबत सुनिलला पण त्यांनी शिकवलं आणि त्या काळाच्या मानाने ह्या मुलांना त्यांनी कष्ट करून शिकवले. याचं कौतुक मानायला हवं. सुनील ला

नोकरी लागली. नवल म्हणजे त्या काळात त्या धणवंत काकांच्या मुली देखील नोकरी करत होत्या.घर तसं मोठं असलं तरी लहानच पडत असे.

धणवंतराव काकांकडे एवढी माणसं असायची ,पाहुणे रावणे असायचे कि काय सांगायचं. धनवंत काका वकील होते. त्यांच्या ग्राहकांचे साठी,ऑफिस ,म्हणजे घरामध्ये पुस्तकांच्या,रॅक नी बनवलेले,बसण्यासाठी बाक असलेले होत. बसण्यासाठी बाहेरचा पॅसेज होता.छोट्या खुर्च्या,सर्वत्र धुळीची पिट होती. सुनिलला पडवीतच गादी टाकली कि सोय होत असे.तेथे एका पलंग असावा, ऐवढी सुद्धा त्याला सत्ता नव्हती. पण त्या मळगावी, वर जे घरात असेल ते खाऊन सुनील चांगला शिकला. सुनिलला सरकारी नोकरी लागली. सुनिलचे लग्नाच वय झालं होतं.

धनवंत काकांचा मुलगा विजय यांच्यासाठी बरी स्थळ सांगून येत असत ,पण विजुचे अपेक्षांचे नखरे होते. हे नको ते नको करायचं आणि त्यातल्या त्यात एक गोरी आणि अतिश्रीमंत घरची लेक विजुनी पसंत केली .विजयने नको म्हटलेली ,चांगली पण,रंग गोरा नसलेली एक मुलगी, पामेला तिच्याशी सुनिलचा लग्न झाले. सुनिलच सर्व व्यवस्थित होत.मुलगा झाला. पण सुनिलला शिक्षणाची आवड होती. पामेला,"अहो, लॉ करा"म्हणे. वर पामेलाने सुनिलला पुढच शिका,असं सुचवलं .सुनील वकिलीची तिन्ही वर्ष पूर्ण केली आणि सनद काढली.सुनिल धणवंत काकांकडे वकिलीत मदत करु लागला.

पूर्वी काकांनी एका अशा ओळखीच्या माणसाकडे राहाण्याची सोय केली होती .ओळखी,अति मित्र जेवण खाण वगैरे मिळेल असे होत गेले.गॅलरी अथवा

पडवीत कुठेतरी झोपायला पडे. काकाचे घरी बरे नसता काही तास एका पलंगावर निजायची देखील ,चहाची सुद्धा सत्ता नव्हती. कसातरी कुठेतरी मित्र मैत्रिणीच्या मदतीने, न खाता गैरसोयींना राहून खानावळीत खाऊन सुनिलने शिक्षण पूर्ण केलं .

सुनिल तसा अशक्त होता. खेळाच्या दरम्यान वारंवार त्याचा हात निखळ त असे .कधी मान दुःखे. तसेही त्याला योग्य खाणंपिणं नसल्यामुळे सुनील अतिशय अशक्त होता.धणवंत भाऊ नावाचा नातेवाईकाकडे तो राहू लागला होता. धणवंत भाऊला तीन मुली होत्या.धणवंत भाऊ आणि त्या मुली मात्र दादा दादा करून सुनिल कौतुक करत असत.खाण्यापिण्याची सर्वांकडे आबाळ गेली. धनवंत भाऊ थोडेसे थापा मारणारे.कोर्टाचे सुटीमुळे,कधी घरात पैशाची अडचण असे .त्यांचा स्वतःचा एक मुलगा होता.विजय अस त्याच नाव होतं .सर्व मुले एकत्र वाढली,विजयला मात्र धनवंत काकांनी अति चांगले शिक्षण दिले. सुनिलला मात्र घरची कामं , चप्पल शिवायला जाणे ,भाजी आण किराणा आणि अशीअशी काम कार्यालयात जा,अशी काम असत. तो काळ काही घराजवळ दुकानांचा नव्हता. बाजार फार लांब होता. यादी करून काय काय हवं ती मोठी यादी,पैसे,पिशवी सह पाठवून,सामान मागवाव एवढी सुद्धा बुद्धी त्यामुळे नसायची.कस काय असा प्रश्न कधी कधी मला पडतो .वारंवार सुनिलला लांबवर पाठवत.धणवंतकाकांचे घरचा एक चांगला गुण, स्वतःची सगळी मुले,शीकली नी त्यांनी सुनिलला ही शिकण्याला उत्तेजन दिले. सुनिल शिकला. सगळे जण, मुलं नोकरीला लागले. 1975 साली पैसा आला.

# भाग 2

मी पामेला.

माझे पती सुनिल, हे त्यांचे,वडिलांचे पहिल्या पत्नीचे सुपुत्र होते.मी शिकलेली होते .किरकोळ किरकोळ लिखाण करायचे. एका वकीली अनुभवानंतर,सुनिलला खूप पैसे मिळाले,नि नंतर माझे पति सुनिल त्यांनी जुनी नोकरी सोडून दिली.वकिली यावर कमाई केली.एक बलात्कारा बद्दलची केस जिंकल्यावर,नाव झाले. दरम्यान त्यांची आब वाढली.मी लेखिका झाले,एका वर्तमान पत्र वाल्याला नोकरी द्या असे बोलले.त्या लोकांशी सुनिलची ओळख होती.उठ बैठ तर असे .परिचय होता. “त्यातील कुणाशी तरी शब्द टाकुन मला,लिहायला वर्तमानपत्रात कामाला लावू.”मी

“शिव शिव, तू चांगलं लिहीत नाही.”सुनिल

सुनिलला शक्य होते,पण माझे लिखानाला मदत करायला माझ्या प्रगति ला मला सुनिलने,कणाची मदत केली नाही. उलट म्हणाले,

“ भारी भारी लोक आपली कला जोपासतात. तुझे लिखाण बोअर असते.तू अभ्यास करीत जा,मग लिहीत जा.”

मी खट्टू झाले पण काही दिवस लिखाण बंद केलं. नंतर मला जाणवलं की मला लिहिण्याचा बुस्टर डोस आवश्यकच आहे. माझ्या मनात जे काही,जे स्मरणदिवे ,जे काही साठलेल आहे, ते रिकाम करायला हवे.शांत होण्यासाठी

आणि मन शांतीसाठी मला लिहीत जायला हवे. मी किरकोळ काम करीत राहिले. तर किरकोळ किरकोळ ,असे करत नाव झाले.शाळेत नोकरी लागली. मी,नावारुपाला, भरात आले

उंबऱ्यावरचं माप सांडून मी आत, घरात आले,
दोन डोळ्यातील ज्योत झाले, माझे डोळे खाली वळले,
भुई म्हणाली, "तू माझी !
काढ केर, स्वच्छ कर,
मी म्हटलं ," खरंच ग, आई "
केरसुणी झाले, रांगोळी झाले,
चूल म्हणाली," तू माझी !!
मी तिची लाकडं झाले,
जात म्हणाला," तू माझी !
गहू झाले, ज्वारी झाले,
उखळीतलं भात झाले.
ताकातली रवी होऊन,
मथणित नाचत राहिले.
भिंत होऊन, छप्पर होऊन,
गुपितं राखली, छिद्र झाकली,

पणती,वात, तेल होऊन
कोनेकोपरे उजळून टाकले.
सून झाले, बायको झाले, आई झाले, सासू झाले,
माझी मला हरवून बसले, आता सोंगं पुरे झाली,
सारी ओझी जड झाली, उतरून ठेवून आता तरी माझी मला शोधू दे,
तुकडे तुकडे जमवू दे, विशाल काही पुजू दे,
मोकळा श्वास घेऊ दे,
श्वास दिला, त्याचा ध्यास घेत घेत जाऊ दे !!!

थोडीफार जाण आली आणि सरकारी कोट्यातून एका पत्रकारांच्या कॉलनीत आम्हाला हा बंगला विकत घेण्याची , महिला कोट्याची संधी मिळाली .

"आपण तिथे कुठे राहणार आहोत. आपलं भाड्याचं घर बर.कोर्ट जवळ आहे.घराच्या साठी पैसे भरले,तर मुलाच्या शिक्षणाला राहतील का? पैसे कुठून आणायचे?" अशी कुरकुर सुनिलने केली.

पण बंगला जुना होता पारंपरिक होता. मी कुठून तरी कसे तरी पैसे जमवून कर्ज बिर्ज काढून तो बंगला खरेदी केला.

माझ्या माहेरी आम्ही,उषा आशा सुशा ,मी अशा चार बहिणी होतो. आई वडील अगदी म्हातारे होते. वृद्ध वयात त्यांना मुलं झाली त्यामुळे ते सदैव चिडलेले असत.त्या घरात ना त्यांना सुख लाभो ना आम्हाला! कधीच सुख

लाभत नसे,भांडण होत, कारण पैसा पण नसे.ओल आणि एक प्रकारची उदासी त्या घरात भरलेली असे. रात्ररात्र आम्हाला भीती वाटे की रात्री झोपेत आई वडील मरतील.आपण अनाथ होवु आपल्याला कोणी बघणार नाही .भयंकर भीती त्या घरात वावरत असे .बहिणींना स्थळ सुद्धा कशी तरीच बघून दिली होती. मोठी बहीण श्रीमंत होती,पण ती माजोरडी होती.होळीला माहेरी आली की आईला किती पैसे पाहिजे ते मागे,भांडत सांगे.

"मुलीसाठी पीठ दळून,चांगले ते खायला दे. माझ्या मुलांना कपडे कर." अशा कारणाने भांडत असे. मधील बहीण मध्यम घरची सासुरवाशीण सून होती. मला नटायला मुरडायला आवडे. सुनिलच्या पगारात होत असे .पण मला हौस खूप होती. सुंदर दिसावं असं वाटत असे .मग मी या मधल्या बहिणीची,आशाची मुले आली कि ,दोन तीन साड्या सासरचे धाडतील तेव्हा घेऊन येतसे .सर्वांचे कपडे उसने आणून आणि नंतर त्यातील परत करायच्या वेळी पार बोळा,जुनेर करून बोळा करून खराब करून देते.त्या बहिणीला सासुरवास खूप होता.आशाचे सासर घर सुंदर मुक्तांगण होत.पण जुन्या काळचा कसा तरी पाटीचा संडास मागे दूर असे .काही केले तरी तो संडास,घाण आठवुन मला तिच्या घरी जायला अजिबात आवडत नसे. त्या सगळ्या लोकांना माझ्या घरी यायला आवडे.सिनेमा फिरणे होई.मला पण त्या लोकांना माझे घरी न्यायला मळगाव ला राहायला बोलावणे आवडत असे.कारण मी काम टाळे,त्या पाहुण्यांवर सर्व टाके.तुझे हे छान ,स्वयंपाक चविष्ट असे चढवुन देई.मग त्या पाहुण्या चढाओढीने राबत wst.

मळगावला त्यानंतर खरेदी केलेली ,आमची मळगावची आमची सुपारी हवेली सगळयांनाच आवडे आणि नंतर लोक सुपारी हवेली आतुन बघायला तरसत.काही सिनेमांचे शुटिंग सुपारी हवेलीत होई.ते बघायला दुरचे नातेवाईक, या बहिणी भावंडे आई वडील वारंवार येत असत.माझी ही मध्यमवर्गीय बहीण आशा,तिचे कपडे वगैरे मी बरेच काळ वापरले.नंतर सुपारी हवेली करोडो ला विकायच्या वेळी वाईट वाटलं .ज्या वयात कपडालत्ता,खाणे, लेणे, बाइला हवे,तेव्हा मिळत नसे.बेसिक खर्चाला हवा होता त्याकाळात पैसा नव्हता. आता पैशाला ददात नाही तर कपडे शोभत नाहीत.तिघींची हाऊसच मरून गेली आणि आता या वयात काही धड दिसत नाही.वयासोबत अभावानी मनाच्या इच्छा मेल्यावर पैसा येऊन काय उपयोग?आता काय? उपयोग कपाटाला? तरुण वयात थोडा पैसा कोणी उसना जरी दिला असता चार चांगले कपडे घालायला दिले असते तरी आम्ही आनंदाने नाचलो असतो. त्या वयात खायला प्यायला पण नीट न मिळाल्याने आई थकली नसती.आई बरी झाली असती, पण खायला प्यायला पण नसे .माहेरी खूप प्रॉपर्टी होती. बंगल्याचे नंतर करोडो रुपये मिळाले. घरात खूप सोन नाण होते, पण रोकडा नव्हता. आता वाटत,स्वत ती सोनं नाणं विकून का होईना आई नी,आम्हाला मुलांना खायला प्यायला द्यायला पाहिजे होतं .नातेवाईक मोठे पण भिकारडे ,दानत नसलेले असतात.आमच्या घरी जेवायला यायचे,हातावर चार आणे न देता जायचे.बागेत भाजीकैर्या फुकट न्यायचे.

मोठा भाऊ सेटल्ड होता.सगळ्यात जास्ती दोष मी या मोठ्या भावाला देते .यांनी कधीही येताना एक वीस किलोचा तांदळाचे पोते आणि दहा किलो डाळी आणली असती तरी आम्ही भावंडांना बरे झाल असते.नीट जगलो असतो.पण तोही लबाड आणि बाईल धार्जिणा होता .स्वत:चे बायकोच्या माहेरी लोकांचे,अन्नापासून सगळ करायचा,भेटायच निमित्त करुन ,देवीला येवुन सर्व आमचे घरी येवुन खावुन जायचे.वर्षाचे धान्य संपवायचे. त्यामुळे माहेरी मला त्रास होई,वरती ही माणस भांडत.आई देवी होती,वडिल सज्जन होते.पण कुणालाच सुख लागलं नाही.

मी फॅशन करायची म्हटली की आई म्हणायची "तुम्ही लग्न करा नंतर काय फॅशन करायची ती करा .ते लोक,या खेड्यात लोक नाव ठेवतात."मला चांगली राहणी आवडत असे.तर त्यामुळे मी सुनिल शी लग्न झाल्यावर थाटामाटात करायचं ठरवलं आणि तशी,इथेही थाटात राहू लागले.

उधार वस्तू विकत आणे,नंतर तो दुकानदार पैसे मागतो आणि नंतर सुनिलला पैसे भरावे लागत.

मी मजेत होते.पैशावरुन भांडण होत,पण कोणत्या नवरा बायकोचे वाद नसतात?त्याच दरम्यान सुनील च्या वडिलांनी पेणची हवेली विकली.हवेली वगैरे काही नव्हती,हो वाडा होता, बाजूची जमीन वगैरे शेती विकली. त्या पेण गावातून रेल्वेलाइन गेल्यामुळे भरपूर पैसा मिळाला.सुनिलचे वडील वारले होते. काका पुतणे सगळ्यांनी मिळून पैसे वाटून घेतले.मी सुनिलला पाठवलं

“आपला हक्क वाटा,हिस्सा मागून घे”सुनिल बस पकडून पेण गाव ला गेले.जमलेल्या सगळ्या नातेवाईकांनी भांडण काढलं .

“शर्म नाही वाटत का ?वडील मरतांना सुनिल ,सुनिल नावाचा घोषरा काढुन वारले.बापाची किंमत नव्हती,तेव्हा आला नाही. बापाने दुसरे लग्न केले,त्याची काय चुक होती? घरी खाण्यापिण्याचे हाल होत होत होते. मुलांना सांभाळायचं म्हणून बापाने लग्न केले .त्यावेळी तू बापाला मदत केली नाही .”

“बापाला अपमानित केले,गाव नाव ठेवी.हो आता तो वाटा मागतो?”काका

पेण गावातून निराश सुनिल ,परत मळगावला आला.

“असे मनी,तसे मनी,”मनात येते.माणसाचे मन द्विधा होत असते.माझे काय चुकले?”सुनिल मला म्हणाला.निराशेतून सुनिल कधीतरी ,काही प्रमाणात, हताश होई.सुनिल परत आल्यावर रुटीन सुरु झाले.मी लिखाण करत होते. नोकरी होती.

पेणचे कुटुंब कलह,मी हे कुणाला सांगितले नाही. पण आमच्या नात्यात ला एक शिवा नावाचा कुचकट मनुष्य, विनाकारण गावात हसत सांगे.मोठा भाऊ,मग त्याचे जवळचे माणसांसहीत गावभर सांगत फिरला.

मला असं वाटतं की माणूस त्या वयात काही निर्णय घेतो .त्यावेळी योग्य वाटून घेतो. मात्र हा निर्णय पुढे मागे,चुकले असं वाटून चुकतो सुद्धा! असे कसे?असे मनी तसे मनी? कशी मी ?असे दोन्ही प्रकारचे विचार माणसाच्या

मनात येत असतात. त्यातील जो विचार त्यावेळी श्रेष्ठ ठरतो तो निर्णय माणुस घेतो.स्वभाव,देवाची करणी अशी की वर्तनातून अनेक चुका माणूस आयुष्यात करत असतो. मला पण कधी कधी काही गोष्टी आठवल्या कि खूप पॉइंट्स चे वाईट वाटत. निष्कारण मी बऱ्याच जणांना दुखावत असे.चिडणं! खरं तर मी आता त्यांची क्षमा मागावी कारण अशी ,चीड यायची,मी दुखवायचे.आता ती माफीची माझी इच्छा आहे पण आता ती वेळ निघून गेली आहे. ही माणसं सुद्धा माझ्या आयुश्यातून निघून गेल्याने मला काही करता येत नाही.मला पण काही लोकांनी मला खूप दुखावलं. पण ते आठवून मला आता.मी सुनिलच्या मुलाची मनीषची आई होते.चांगली आई होते.पण पत्नी चांगली नव्हते.सुनिल दिसला की माझे डोके फिरत होते.सुनिलची दया येई,वाईट वाटे पण राग वरचढ ठरेल.सुपुत्र मनीषशी सुनिलचे जमत होत. तसंच मी इतरांचे जे अपमान केले तेही वाईट वाटत. कारण कि आता या वयात थोडी प्रगल्भ झाले .पण कधी कधी मला अस वाटतं,तरुण वयातील राग आणि अहंकार कमी होण्यासाठी काहीतरी उपाय ,त्या वयात मानसशास्त्रीय रितीने करायला पाहिजे .अनेक निराशा अनेक आत्महत्या थांबू शकतात.

असे मनी तसे मनी, त्या गोष्टी मनी येणं म्हणजे काय लगेच बायपोलर डिसॉर्डर चा आजार,विकृती नसते.माणसाचा मन आहे दोन्ही प्रकारे विचार मनात येत असतात .माणूस चुका करत असतो.रागारागात मी,स्वतःला पामेला द ग्रेट समजेल. बरेचदा सुनिलचा अपमान करत असे. खरं तर मी त्याला पिटाळून," जा वडलांना भेटून ये वडील मरतायत" सांगून सुनिलला पाठवू शकत

होते.पण मी सुनील च्या मागे लागून सुनिलला पेणगावला पाठवलं नाही .नंतर मात्र पैसे ,महागाई मुळे हिस्सा मागण्यासाठी पाठवलं. पण चूक माझीच म्हणायची का?काहीवेळा दारी आलेल्या पाहुण्याला मी न खाता पिता सुद्धा पाठवून देत असे. आता आठवलं की वाईट वाटत. जवळच्या माणसांना पण मी परस्पर वाटेला लावी.जिव्हारी लागेल असं बोलून दुःखावत तसे.आज असे मनी तसे मनी,मानवी च्या विचारात खोल आत येते.त्यावेळी वाईट वाटतं .पण कधी कधी असंही वाटतं डेडिकेटेड सुनील वर अन्याय झाला. अस मी पतिचा खूप अपमान करायचे.सुनिल म्हणे की,

”मी घर सोडून निघून जाईल. तुमच्याशी भांडण नको.”

एकदा घरातून सुनिल निघून गेला.तो असा कुठे गायब पण झाला होता.पण दोन दिवसांनी परत आला. परत आल्यावर मी सुनिल शी चांगली वागले.

जया ने मला सांगितले की “माझा नवरा पण भांडण झाले की दोन तीन दिवस गायब होई. देवस्थानी जाऊन राही.घरापासुन दुर ,शिवाय गावाकडे राही आणि राग शांत झाल्यावर परत येई”

असे म्हणतात,काही वर्षापर्यंत ,बर्याच घरी अशी भांडणाची मालिका असते.थोड्या दुराव्यानंतर भांडण मिटुन लोक सेटल होतात.माझे घरी भांडण वारंवार होत असत आणि सुनिल वारंवार निघून जात असे .

तर त्याचा वकिली व्यवसाय मात्र जोरात चालत होता. सुनिलला भरपूर पैसा मिळत असे वर भारी भारी केसेस सुनिल कडे येत .एक ड्रग माफियाच्या

माणसाची केस सुनिलने घेतली होती.तो के नावाचा माणूस केससाठी मळगाव व्हिजिटला येताना खूप वानोळा मिठाई वगैरे किमती सामान घेवुन येतसे.आमचा मुलगा मनीष चांगला शिकत होता.सुपारी हवेलीला अनेक खोल्या होत्या. मुलगा मनीष थोडा मोठा झाल्यावर ,मी मुलाला एका खोलीत टेबल खुर्ची टाकुन आणि त्याची खोली ,त्याच स्थान करून दिले.मुलांचे मनीषचे मित्र देखील तिथे,त्याच्यासोबत अभ्यासाला येत. मुलाच्या मनीष च्या स्वतच्या मित्रांमध्येच, सुपारी हवेलीच्या मालकाचा, एक दूरचा वारसदार येऊ लागला, असे लेकाने सांगितले.मला भीती वाटली.मला अचानक काळजी वाटे.

पण दोघांनी मिळून अन्य लोकांतर्फे गच्ची पण स्वच्छ करून घेतली .सिनेमातील काही शुटिंगची सोय वाढली.वरुन नदी दिसू लागली. गच्चीत खुर्च्या आणि टेबल टाकला. तेथून लांब पर्यंत ची नदी दिसत असे.मुलगा मनीष ,मी सुनिल आणि त्याचे मित्र आम्ही खूष होतो.कशात कोणाकडे काही कमतरता नव्हती. अधिक करता,सर्व खोल्या हवेलीच्या स्वच्छ केल्याने उद्यान चमकु लागले .हवेली जुनी आणि पडझड पण झालेली होती. पण जेवढे भागात आम्ही राहातो, तो तो भाग खूपच छान होता. शूटिंगसाठी होळीला लोक आले की भरपूर पैसे मिळत असत त्या पैशातून आम्ही पुण्याला सुद्धा एक छोटासा फ्लॅट विकत घेतला. मुलाला, मनीषला शिक्षणाला पुण्याला ठेवायची माझी इच्छा होती .भांडण झाले वाद झाला की सुनिल घर सोडून निघून जात असे. एकदा तर, तो आठ दिवस परत आला नाही. मी आणि माझा मुलगा मनीष घाबरलो .मी आणि मामी माझ्या भावाशी बोलले. भावाने मलाच दम

दिला.मुलाला मनीषला दम दाटी केली .वर बातमी पसरवली.गावभर चर्चा केली पण मदत केली नाही.पोलिस केस करावी का? असे वाटे.मात्र आठ दिवसांनी सुनिल सापडला,घरी परतला. पेणगावला त्याच्या वडिलांच्या घराच्या जवळ एका लॉजमध्ये खोली घेवून राहत होता. तिथून गोड बोलून त्याला मी आणि एका माझ्या वर्तमानपत्रातील काम करणाऱ्या आजोबानी जाऊन समजावून घरी आले.सुनिलला घेऊन आलो वाद मिटला. सर्व ठीक ठाक चालू झालं तेव्हापासून मी सुनिलशी भांडण कमी केलं .सुनिल निराशेकडे झुकतोय मला वाटत होतं .सुनिलला बरेच मित्र होते आणि त्या मित्रांवर तो हसत खेळत पण वावरत असे. त्यामुळे सुनिलच्या मनात नक्की काय आहे हे आम्हाला समजेना झालं.

सुनिल नाटक करतो की काही कळेना.अलकाला,बहीणीच्या मुलीला मी सोबत राहायला आणल.

बंगल्याला नाव आम्ही जन्नत मन्नत अन्नत अस त्याकाळी,वेगळ काही तरी द्यायचे ठरवित होतो ,पण कागदोपत्री असलेले जुने बंगल्याचे नाव कायम ठेवले.सुपारी हवेली!.माझी आमच्या नवीन खरेदी केलेल्या बंगल्याचे नाव, असे मनी, तसे मनी असे ठेवायची इच्छा होती.कारण ,लाडक्या ,लेकाचे,ठेवलेले आमच्या मुलाचं नाव मनीष होते.मनी असं मनीषला प्रेमाने सारे म्हणतात.

पत्रकारांच्या कोट्यातून हा बंगला आम्हाला मिळाला नि किरकोळ किंमत होती. एक थोडा फार फायदा झाला .माझे पती सुनिल नको म्हणत होते.

“आहे त्या भाड्याच्या घरात राहावं. अग प्रॉपर्टी म्हणजे भांडणात निमित्त असत. मुलांत नंतर भांडण होतात.मयताच्या प्रॉपर्टीचे प्रश्न निर्माण होतात. शिवाय कर्ज काढावं लागेल.मन मारून हप्ते भरावे लागतील हौशी मौजी कमी करावे, लागतील. आहे त्या आयुष्याचा आनंद घ्यावा.” त्यावर मी त्यांच्यावर खूप चिडले .

“तुमचे ना विचार भिकारडे आहेत. फार गरीबीतून तऱ्हेचं वकील झालात .या गावात तुम्ही मोठे, सारे तुम्हाला वकील साहेब म्हणतात एकमुखी सारे जण ,तुम्हाला छान वकील म्हणत असतात.जमेल.घेवु या.”

त्याच दरम्यान एक ड्रग्सची तस्करी करणाऱ्या ,के नावाच्या माणसाची केस सुनिल कडे आली.सुनिल हुशार होता सुनिल च नाव होतं .त्यामुळे सुनिलही केस जिंकून देण्याची खात्री त्या आलेल्या साहेबांना दिली. हो ,त्यातील गोष्टी,आता मला त्या विषयावर आणि त्या व्यक्तीचं नाव घ्यायला पण भीती वाटते, इतका त्या व्यक्तीचा दरारा होता .मुंबई पुण्याचे भारी वकील सोडून आमच्या,मळगाव सारख्या खेड्यातल्या त्या घाणेरडय़ा गावातल्या वाकड्या तिकड्या,खड्ड्यांनी भरलेल्या रस्त्यांनी येऊन ती के नावाची व्यक्ती माझे पती चा सल्ला घ्यायची.त्या ग्राहकाने दिलेल्या पैशात हवेली खरेदीची सोय,सुलभ झाली. या बंगल्याच्या साठी सुपारी पुत्राला रोकड पैसे देण्याची तयारी झाली.

त्या बंगल्यातील ज्या वारसदाराने बंगला विकला, तो बंगला मालक, सुपारीचे सुपुत्र होता.त्याला लगेच विकायचा होता .सुपारीची हवेली ही खूप जुनी होती आणि सुपारी शेठ याचा एकच मुलगा होता जो परदेशी राहात होता.

सुपारी थोडे नाजूक मीजाज राखायचे,चालु होते आणि हा मुलगा सुशिक्षित,स्मार्ट असल्यामुळे त्यांना ते पटत नव्हतं. म्हणून तो पुत्र दूरच राहिला.हवेली एक रकमी विकून, हा मुलगा पैसे घेऊन परदेशी परत गेल्यावर ,तो सहसा कधीही परत आला नाही.सुपारी हवेलीत आम्ही राहु लागलो.अनेक छुपे रिश्तेदार,वारस असलेली हवेली,पूर्वी बरेच काळ बंद होती.

लोक सुपारी हवेलीला, भूत घर म्हणत,मुले आजूबाजूच्या मैदानात खेळताना बॉल ,सुपारी हवेलीचे बोळात गेला तर बोळात, बॉल आणण्याच्या जाण्याला सुद्धा, सारे घाबरत असत.मनीष कडे घरी कमी मित्र येत.ड्रग केस वाल्या के गिऱ्हाईकांकडून मिळालेल्या पैशांनी पैसे देणे सुलभ झाल्यामुळे आम्ही बंगला ताबडतोब ताब्यात घेतला.आम्हाला बरे वाटले.चाळीतले भाड्याचे घर सोडून दिले आणि ईथे आलो. गाड्याने बंगल्याच्या प्रशस्त हॉलमध्ये सामान आणून टाकले. बंगल्याला भरपूर खोल्या होत्या. मळगावी, महिलांत, त्या काळी दुमजली असलेली, त्या गावातील एकमेव हवेली, असं सुपारी हवेलीचे वर्णन केलं जायचे.

कधीतरी जवळपास सातशे वर्षे जुने अवशेष मळगावात सापडले होते.

****

भाग 2

सुपारी बंगल्यात दिवस आनंदात जात होते. मात्र परत एकदा भांडण झालं .मनीष देखील सुनिलवर रागावला.आणि सुनिल घर सोडून गेला. आमचे दोघांचेही चारित्र्यही चांगलं होतं आणि सज्जन होतो. आम्हाला पैशाची हाव नव्हती .ती मोठी ध्येय नव्हती.पण आम्ही एकमेकाशी नीट बोलत नव्हतो. भांडणे मारामाऱ्या करत नव्हतो, गुन्हेगार नव्हतो, चोर दरोडेखोर नव्हतो, पण आमचे दोघांचे एकमेकांशी होणारे संभाषण नेहमीच बोलता-बोलता भांडणा कडे वळत ,ugly turn वर वळत असे.अकारण सुनिलला बघितले की माझ्या कपाळात राग जात असे आणि मी काही बोलले की, सुनिल डिप्रेशनमध्ये जात असे.  आमचं नातं असं काय , कस विस्कटले,आम्ही काय करत होते याचे कारण कुणालाच कळत नव्हतं. कुठलाही दोष नसलेले दोन व्यक्ती सुद्धा विवाहात सुखी होतील असं सांगता येत नसतं .विवाहात काय आहे हे कधीच कळत नाही. तशी बरीच भांडणं होत असत .सुनील निघून जाई आणि परत येई.तो घर सोडून निघून गेला.सुनिलने के  नावाच्या या व्यक्तीची केस घेतली होती त्यामुळे घरात भरपूर पैसा येत असे.

यावेळी सुनिल गायब होण्याचा, ड्रग केसचे अशील के शी संबंध असावा असे मला वाटलं. पण मला मनीषला सांगायला पण भीती वाटत होती.भावाला सांगितलं तर तो खेकसला.मग आम्ही मी आणि मनीषने,या बंगल्यात पुढच्या तीन खोल्यात सामान टाकलं होतं .सुपारी बंगल्याचे मालक सुपारी यांनी पण

म्हणे  एकट्याने जीवन कंठे. असे म्हणतात, त्यांची पण बायको म्हने गावात गायब झाली होती आणि त्यांचा ही मुलगा,एकुलता आखातात गेला.सुपारीचा मुलगा पुढे परदेशी गेला होता. माझा मुलगा मनीष 7 वी पासूनच परदेशी जायचा घोसरा काढू लागला.

"थोडे दिवस दम काढ.आता थोडे दिवस काढायचं"असे सांगून मी त्याला काही काळ मळगावात राहायला, भाग पाडलं. सुनिल गायब झाला होता. त्यामुळे लोक मला नाव ठेवायचे .

सुनिल  त्या वेळी एक महीन्याने घरी परतला. सुनिलच विचित्र वागणं थोडं वाढतच चाललं होतं .

त्यानंतर एकदा आम्हाला आमच्या वर्तमानपत्राच्या,प्रस्तावित विमानतळ जवळच्या, कार्यक्रमात एका भारी हॉटेलमध्ये जेवायला बोलावलं होतं. त्या हॉटेल समोर इटलीच्या फ्लॉरेन्स इथल्या एका चित्राची प्रतिकृती भिंतीवर टांगली होती. किस्को गोळया याचं शनी आपल्या पुत्राला गिळतोय अशा अर्थाचे ते विचित्र चित्र होतं .त्या चित्रातली व्यक्ती हालतात, बोलतात, बाहेर येतात, जिवंत वाटतात, असं सुनिल मला सांगू लागला.

मधेच रडू काय लागला .विचित्र काय वागू लागला. मला असं वाटलं की माझ्या,त्या वर्तमानपत्राचा कार्यक्रम आहे, म्हणून हा नवरा मला असा सतावतो.हा माणूस मुद्दामच करतोय.काय की काय मला भयंकर राग आला. कसातरी अर्धा कार्यक्रम पार पाडून आम्ही  घरी आलो.  थांबण्याची इच्छा होती पण रिक्षात बसलो.  कसेतरी सुनिलला धरून घरापर्यंत आलो. कोणीतरी

पोचवायला येतो म्हणाले, पण मला ते सगळं सहन होईना. घरी पोचल्यावर माझ्ञ आणि सुनिलच तर खूप भांडण झालं .

“तू नीच आहेस,नाटक करतो”वगैरे वगैरे मी खूप बडबड केली .

"त्या बंद असलेल्या खलबत खोलीत मला रघु दिसतो.घरी सोन्याच्या विटा आहेत.तू काढल्या का?"सुनील

"चित्रपटात बघून डोक फिरलय.ऐक रघुचे भूत तुला लागल आहे ."सुनिल माझ्यावर ओरडत म्हणाला. मी म्हटलं,"लोक काहीही उठवतात.भूत नसते.रघू कोण? तुम्हाला भास होतात.ईथे कुणी नाही,या सुपारी हवेलीत नाही.भूत मला नाही तुम्हालाच लागले आहे. वेड लागलेले आहे. बघू त्या खलबत खोलीत कुठलं घराचे भूत होते.बघु दे मला!”मी.सुपुत्र मनीष ऐकत होता.

"चला खोली उघडु या"असं म्हणून मी मागच्याच आठवड्यात सापडलेली, त्या गुप्त खोलीची किल्ली घेतली आणि त्या खलबत खोलीचे कुलूप उघडलं. नवल म्हणजे खोलीत असं चित्र होतं,जस त्या भारी हॉलमध्ये लावलेलं होतं. जे होटेल मध्ये गेलो,जायचो तेव्हा होते.शनि रागावतो आणि आपल्या पुत्राला गिळतानाच ते चित्र पाहून सुनिल परत रडू लागला आणि त्याने रडत रडत खाली मटकन अंग टाकले.खाली मातीत बैठक मारली. खाली सगळी धूळ होती .भिंतीवरच्या फळ्या पडायला आल्या होत्या. वर त्यात सुनिलच “कसतरी होतं ,रघु लवकर चल “ओरडण चालु होते.मी आणि सुनील,मनीष तिघे जोरजोरात रडू लागलो.

“ वेड लागले तुम्हाला वेड लागले.’’मी थोड्या वेळात शांत झाले.मनीषला आत पाठवले.रात्री रडत बसलेल्या सुनिलला तिथे बसु दिले.मी माझ्या खोलीत आले.मला आठवतं मी त्याला त्या खलबत खोलीत जाऊन औषधोपचार दिले.पंखा लावला.अंगावर चादर टाकली.नंतर मी माझ्या खोलीत जाऊन शांतपणे झोपले .सकाळी उठले तर मुलगा मनीष म्हणत होता.

“ आई तू रात्री बाबांची परत भांडलीस का? आवाज येत होता. बाबा घरात कुठे दिसत नाही.’’मनीष

“ गेले असतील परत रागावून कुठेतरी! दहा दिवस मठात पिठात राहतील,मग येतील परत!” असे म्हणून मी मुलाला गप्प केलं. माझं पण रुटीन सुरू झालं. सुनील कुठे गेला असेल? या विचाराने मला काळजी वाटू लागली होती. सुनील आज रात्री पर्यंत येईल,के च्या, कोर्ट केस साठी, उद्या तरी येईल ,असा विचार करत राहिले.पण सुनिल घरी परत आला नाही .मी त्याला त्या खलबत खोलीत रघुरावचे भूत आहे असे ओरडत, तिथेच सोडून गेले होते. त्यामुळे मला त्या खलबत खोली ची पण भिती वाटत होती. मी परत कधीही त्या खलबत खोलीत गेले नाही .वॉचमनने त्या खलबत खोलीला कुलुप लावलं .आम्ही ,मी आणि मनीष आमच्या आयुष्यात पुढे गेलो.

तरीही सुनिल सापडावा म्हणून जिथे जमेल तिथे,काही कळले कि आम्ही सुनिलचा शोध घ्यायचो.पंधरा दिवसांनी,रितसर सुनिल हरवल्याची पोलीस कम्प्लेंट केली .त्यानंतर तीन वर्ष सुनिलचा शोध घेतला.

***

तीन वर्षानंतर एकदा ,केरळचे पोलीस एक फोटो घेऊन घरी आले होते .

"केरलाला मण्णार गावी राहत होती, ती व्यक्ती सुनील असावी, असं पोलिसांचं म्हणणं होतं .आम्ही येऊन ती व्यक्ती बघावी. अस सुचवले.ती व्यक्ती मृत झाली होती पण तिचे फोटो आणि सामान बघावे .अशी त्या पोलिसांची इच्छा होती."

नाही म्हणू नये,म्हणून  मी आणि माझा मुलगा मनीष,सुनिल तिथे चंदन नावाने  कुठे राहत होता,तो शोध घ्यायला केरळला गेलो.

तो सुनिल नाही,हा अंदाज फोटोवरून आला होता. अर्धी मळगावची गल्ली सांगे, सुपारी सेठच्या मारणे आणि त्रासाला कंटाळून रघु नोकर गावातुन पळून गेला होता .पण रघु वारला असं सगळ्या गावात कस कोण जाणे,पण ऊठलं होते.या रघुचे भुत कायम दिसे असे वृध्द म्हणत. सुपारी सरदारांनी रघुला मारून त्या बंगल्यात कुठेतरी गाडला आहे अशी अफवा उठली होती .कदाचित ती गोष्ट मनात असल्यामुळे सुनिल रघुच भूत वगैरे. तसं म्हणत असावा. रघु राव,शेठचा नोकर साधा अनाथ  होता.  त्यामुळे रघूच्या हरवण्याची,लापता होण्याची तक्रार सुद्धा कोणी केली नव्हती.  रघु पुढे सापडला होता अथवा नाही?देव जाणे.हे सुद्धा कोणाला माहीत नव्हतं.

पोलिसांसोबत केरळला,ज्याला पोलिस सुनिल  म्हणत,ती राहणारी व्यक्ती ,जेथे हा चंदन परेरा राहत होता त्या जागी आम्ही जाऊन आलो. थोड फिरलो. तो सुनील नाही हे मला पक्कं माहीत होतं. तिथे रघु भेटला.आम्हाला भेटल्यावर रघुनी मळगाव ची आणि सुपारी हवेली ची हकीकत सांगितली.

" सुपारी शेट खूप दुष्ट आहे,तुम्ही हवेली सोडा" असेही रघु म्हणाले .

"मात्र आम्हाला आता काहीच पर्याय नाही"मुलगा

"ते सुपारी शेठची ती ,एक केस देखील माझे पती लढत होते." मी रघूला सांगितले .

"यापूर्वी सुद्धा एक वकील असेच गायब झाले होते .तुमचे पती परत येतील असं मला वाटत नाही ."असे रघु मला म्हणाला.

Bhag 3 रघु राव (नोकर)

मी रघू राव,गुंतावा नावाच्या,केरळच्या एका मंदिर ट्रस्टच्या बाजूला असलेल्या,धबधबा कोसळत असलेल्या मन्नार येथील डोशाच्या दुकानात काम करतो.टुरिस्ट स्पॉट आहे. मी डोसा विक्रीचं काम करतो.केळीची भजी, म्हैसूर डोसा, इडल्या,म्हैसूर पाक आणि सिगरेट हेच मुख्य माझ्याकडे विकले जाणाऱ्यातले पदार्थ आहे.मी मळगावहुन पळुन आल्यावर ईथे गाडीवर काम करु लागलो.

ट्रस्ट ओफिस माझे समोर आहे.गाडी जिथे लागते तिच्यासमोर दोन मजली एक लहानसे टुमदार घर आहे. हे घर वेळी वेळी लोकांना मी मध्यस्थीने भाड्याने देतो.टुरीस्ट घेत असतात. एकदा माझ्या ओळखीतला एक माणूस आता नाव मला सांजवेळी आला.चेहरा आठवत नाही.माझ्याकडे आला आणि म्हणाला की ,’’माझ्या नातेसंबंधातील एका दुबईहून आलेल्या मुलाला काही दिवस

राहायला,घर हवे आहे. फक्त त्याच नवीन लग्न झाल्यामुळे त्याला घर हव आहे. हे घर भारी चालेल,तुम्ही मिळवून द्याल का?”

मी त्या ओळखीच्या माणसाला ,”हो,देईन” म्हणालो. तसं ते गाव छोट होत,मी लोकप्रिय होतो. त्यामुळे तिथे सर्वजण सगळ्यांना ओळखत होते. श्रीलंकेतून मनारला होडीने पुढे लोक लपुन येतात.येउन येथे टुरिस्ट आणि बरेच स्मंगलर आणी गुंड इथे राहतात. असे मनी कुजबुजायचे किंवा उघड गावातले काही लोक या गावाची बदनामी  करायचे. त्यामुळे टूरिस्ट आले,रेंगाळले की थोडं त्यांचे कडे संशयाने  बघितलं जाई.तसे प्रकरण होईच असे नाही.लोक राहायचे,परत जायचे.

माझे डोसा मार्ट ,कुंदावा मार्ट अस त्या भागात प्रसिद्ध होतं. ही बंगली किंवा खोली भाड्याने घेऊन दिल्यावर येथे राहणारा माणूस आणि  पत्नीtime पास करीत.

मी चंदन परेरांना बंगला दिला.पत्नी सोबत होती.हा माणूस जिममध्ये पण जाई. हे घर भाराने घेतल्यावर तो इथे दोन वर्षे जवळजवळ राहत होता. रात्री उशिरा कचरा बाहेर फेकायला येई.बोलत नसे.“हा अंडरवर्ल्ड डॉन चंदन परेरा श्रीलंकेतील पळून त्याला आहे आणि इथे राहतो आहे”माझ्या डोसा मार्टमध्ये माझ्यासोबत काम करणारा एक नोकर माझ्या कानापाशी कुजबुजला.

“ गप्प बस आपल्याला काय करायचे?” असे म्हणून मी त्याला गप्प केले.या बंगल्याच्या मागच्या बाजूला या चंदन सरांनी समुद्र किनारा हून पळवून

आणलेल्या समुद्र पक्ष्यांचे पिंजरे ठेवले होते.हे समुद्र पक्षी अगदी क्वचितच आढळत असत.

“ हा चंदन बोटीतून परदेशातून पळून आला आहे. तुरुंग फोडून तो पूर्वी पळाला होता. मधल्या काळात दुबईला राहत होता. हा चंदन परेरा नावाचा स्मगलर आहे.” माझा दुसरा मित्र मला नेहमी सांगत असे आणि मी त्याला वारंवार गप्प करत असे.

जिमला चंदन वकिलात.मजा करत.त्या ओळखीच्या माणसाने चंदन सरांना ही खोली मिळवुन देतांना,नीट त्यांनी चंदन सरांचं आधार कार्ड बनवले .तो त्यांना फोन घेऊन दिला.तो गेल्यावर चंदन राहत होता. त्यांच्या सोबतच्या मैत्रिणीचे नाव कालिया होते.आधार कार्ड फोन मन्नार सारखी सुंदर जागा होती.दोघेजण नवीन लग्न झालेले होते,अस मित्राने सांगितल्या मुळे आम्ही दुर्लक्ष करीत होतो.

“आमच्या एका नाट्य गायकाचा, हा बालपणी जत्रेत हरवलेल्या भाऊ आहे ,तो सापडला .असे म्हणून आमच्या या नातेवाईकांनी त्याला घरी घेतलं.तो हरवलेला पुत्र समजुन कार्ड बनवली.त्या नातेवाईकांच्या पुत्राचे नावाने हा चंदन परेरा येथे राहिलाय.”एक गिर्हाईक मला म्हणाले.

दुबईतल्या चंदन परेरा नावाच्या भावासाठी,नातेवाईकांना घर,बघुन दिला होता.चंदन बरोबर राहणारी कालिया व चंदन सर एकदा रिक्षा करून दवाखान्यात जाताना . चंदन सरांनी नाकावर प्लास्टिक सर्जरी करुन घेतली. चंदन सर अधिक हँडसम दिसू लागले.

“ काय सर काय हे ?”मी विचारले.

“नी मला सिनेमात काम करायचे आहे म्हणून नोज जॉब करून घेतला.” असं चंदन सर सर्वांना सांगत .तशे ते फारशे कुणाशी बोलत नाहीत, नव्हते आणि आपापसातच राहात होते .तीन वर्षांचा घरभाडे ऍडव्हान्स ऍडव्हान्स मध्ये दिल होते.

त्या रात्री माझ्या मित्राचा वाढदिवस होता आणि पगार झाला होता .एक तारखेला ,मित्र अन मी सर्व हॉटेलची आणि जवळपासची मुले पार्टी करायला बसलो.

“जर आपले मित्र सांगतात ते खरे असेल तर मग हे दोघे जण गुंड असतील. तरी ते गपचूप कसे राहतात?” माझा एक मित्राशी रात्री मी दारु पित असतांना चर्चा करत होतो.

“या छोट्या गावी पती पत्नी म्हणून ,ते दुसऱ्याच्या नावाने येताना आणि हातांना हे दोघे जण तानिया आणि चंदन पोलिसांच्या नजरेतून सुटले होते.”दुसरा.

माझे ठीक चालु होते.पूर्वी मी मळगावला राहात असे.तिथे मी फार मार खाल्ला होता.जिवाच्या भीतीने मी मळगाव सोडुन पुणे,ते केरळ असा आलो.आता ईथे बरे होते.चंदन सर माझ्या डोसा मार्ट मधून रोज पार्सल नेत.बाहेर भारी भारी पिझ्झा सेंटरमधून पण जेवण मागवायचे .त्यांच्याकडे भरपूर पैसे होते त्यांच्या खिशात मी फॉरेन करन्सी सुद्धा पाहिली होती पण केरळमध्ये

परदेशी टुरिस्ट नेहमी येत.असं राहायलाच येत.त्यांमुळे मला तेच काही विशेष वाटलं नाही.

तीन वर्षानंतर मात्र थोडीशी,चंदन,कालिया या दोघांमध्ये कुरबूर सुरू झाली असावी .कारण बंगल्यातून भांडणाचे आवाज येत.रिक्शा येत असत.एके रात्री छातीत दुखत म्हणून म्हणे चंदन बाबा कोसळला.आमच्या घरून हॉटेलमधून दोन जणांना नेले .चंदन जड होता.त्यांना धरून आम्ही हॉस्पिटलमध्ये नेले .हॉस्पिटलमध्ये ते वारले. ओळखीने हॉस्पिटलमध्ये डेथ सर्टिफिकेट मिळाले. आधारकार्ड त्या नावाने बनवला होता त्या नाव्याने डेथ सर्टिफिकेट सुद्धा मिळालं. मात्र पोलिसांच्या नजरेतून काही गोष्टी सुटल्या नव्हत्या.

चंदनच्या प्रेताची नखं आणि ओठ काळे निळे पडले होते. त्यावरून पोलिसांना काहीतरी वेगळा संशय आला.

चंदन,कालिया,घर, घेण्याची चौकशी त्यांनी करायला सुरुवात केली.फ्लॅटमध्ये आढळलेले सगळे डीएनए त्यांनी घेऊन ठेवले.सामानात सुनिल काळे,वकील असे कार्ड ,पैसे,पासबुक सापडले.पक्षी पकडलेले होते. डेड बॉडीची सर्टिफिकेट बनवून जाळून झाले होते. त्यामुळे मृत व्यक्तीच्या डीएनए शोधताना पण खोलीत असलेल्या डीएनए वरून ते शोधण भाग होत.खोलीत खुप पैसा,परदेशी चलन सापडले.

केरळला येताना ही दोघ ,पोलिसांच्या नजरे तुन कशी सुटली?बोटीने ईतकी दुर आली?कि अलेबी आहे.Mistaken identity?

चंदन तोंडाने हिरो पण एक कुविख्यात गुंड होता.लोकांना फसवुन स्रीलंकेहुन भारतात,आला होता.कालिया सोबत तो बोटीच्या मार्गाने श्रीलंकेतून येथे पळून आला होता. मनणार येथे,लोकांना संशय येवु नये म्हणून चंदनने, कालियाने लग्न केलं आणि साध्या आयुष्य जगू लागले. पण दोघांचे भांडण झाल्यामुळे कालिया मॅडमनी, चंदन वर विषप्रयोग करून चंदन चा खून केला होता.जिममधील एका परदेशी बाई सोबत चंदनने सुत जुळवले.कालियाने ,त्या बाईचा नाद सोड असे सरळ सांगुन चंदन ऐकेना.कालिया चंदनाचा काटा काढला.

ज्या डॉनला पकडण्यासाठी अनेक देशांचे पोलीस,विविध राज्यांचे पोलीस शोध घेत होते,त्या गुंडांचा मृत्यू प्रेयसीकडून विषप्रयोगाने झाला असावा,असा संशय पोलिसांना आला.कालियाला पोलिसांनी पकडल.

या देशात अनेक व्यक्ती लापता होतात अनेक व्यक्तींचा अपघाती मृत्यू होतो आणि ही प्रेत बेवारस म्हणून सुद्धा जाळली जातात .नक्की ती व्यक्ती डॉन उर्फ चंदन होती का?

मडगावहून लापता झालेल्या एका सुनिल नावाचे वकील प्रथित यश होते.पोलिसांनी ही व्यक्ती सुनिल आहे का?शोध घेतला.ड्रग केस जिंकून देणारे सुनील काळे गाजलेले होते. देशातील एकमेव,सर्व केसेस जिंकणाऱ्या वकील सुनिल काळे त्याच काळात लापता होते.चंदनचे बेनामी राहणे समजताच पोलीस फोटो घेऊन दाखवण्याकरिता मडगावला आले .फोटो नोज जॉब केल्याने ,कसरत केल्यामुळे वेगळाच दिसत होता.प्रेयसीसोबत तीन वर्षे,ही

व्यक्ती मन्नार येथे राहते आहे. हा फोटो चंदनचा असून पोलिसांनी,सुनिलचे पत्नीला  दाखवला. पण पत्नी आणि  मुलगा  दोघे तो फोटो ओळखू शकत नव्हते. तो सुनिल होता का?

“हा तरी सुनिल  नव्हता ,हे मला तरी पक्क माहिती आहे"सुनिलची पत्नी म्हणाली.त्यामुळे तो सुनिल नाही असं,पोलिस, घर मालकाला सांगून मी केस तिथेच मिटवली.पण परत भाडेकरु टाकण टाळू लागलं अथवा अधिक काळजी घेऊ लागलो. नवीन भाडेकरू टाकताना आधार कार्ड वगैरे बघू लागलो.”तो चंदन परेरा होता.” असं वारंवार माझे मित्र मला अजूनही सांगतात.कालिया बेलवर सुटली.

पण कुठे तरी तो चंदन,सुनील असावा असं मला वाटे.सुनीलच्या पत्नीच्या नजर आठवुन त्यावरून ते आजही वाटतं.सुनिल सुपारी शेठच्या सहवासात आला होता.वाद झाला.नंतर मृत झाला असावा.

शोध घेताना,फोटो पाहताना,बाहेर पाऊल टाकताना,सुनिलची पत्नी पामेला बाई ताठ होती.

भाग 4 पत्नी पामेला

मी पामेला आणि माझा मुलगा मनीष तिथे राहून ,थोड परत येताना नाराज झालो ..रेल्वेने पुण्यात आणि पुण्याहून मळगावला परत आलो. दिवस उलटत होते. पर्याय कशाला नव्हता. मळगावला परत आल्यावर बहीण भाऊ भेटायला आले. ती व्यक्ती सुनील नाही हे कळल्यावर त्यांना कुठेतरी बरंच वाटलं होतं

.माझ्या या सुंदर हवेली वर सगळेजण जळत असतात. पण तरीही त्यांना हेवा देखील वाटत असे.खूप विचार मनात उठले ,घर खायला उठले.टोमणे मारायला आणि मला उपदेश करायला परत एक संधी या नातेवाईकांना मिळाली होती.

मळगावला वस्ती वाढली होती.रिसॉर्ट,विमानतळ जवळ झाले होते.मिरची नावाचा माणूस 35 कोटी रुपये,वर पुण्याला फ्लॅट देतो,ईथे हॉटेल बनवतो असे मला सुचवे.

मुलगा मनीष गप्प झाला होता.त्याने  वडिलाचा म्हणजे सुनिलचा फोटो हॉलमध्ये लटकवला.

“बंगल्यांतील व्यक्ती ची ,कथा ,इतिहास सारखेच असतात .म्हणूनच म्हणे शापित पडलेले घर लोक घेत नाहीत.” असं माझ्या ऑफिसच्या लोकांत म्हटलं गेलं.

“ तरी स्वस्तात मिळालेला तो बंगला सोडून आता मी कुठे जाणार, हो?” मी.

"सुपारी घेऊन सुपारी सेठ खून करत असे .म्हणूनच त्या सरदारांचं नाव सुपारी आणि या जागेत सुपारीने पळवून अडलेल्या व्यक्तीला बांधून ठेवत म्हणून सुपारी हवेली असं या हवेलीचं नाव पडलं होते. एकदा एक पंचायशी वर्षांची गावातील ज्येष्ठ नागरिक मी पामेला घरी असताना, माझा लेक मनीष सुद्धा घरी असतांना हवेलीला भेट द्यायला,मला भेटायला आला. पूर्ण हवेली ,उघड्या खोल्या काठी टेकत ,मान हलवत,वा वा करीत फिरले.

"पामेला बाई या खोलीला कुलूप का ?"आजोबा .

"हे खलबत घर आहे ."मी त्यांना सांगितले.

"या कमानी मागे, दार तुटलेल्या जिन्याच्या पाठिंमाग नक्की काय आहे?" आजोबा

"पूर्वीपासून ईथे  कुलूप आहे."मी सांगितल.

"बाई,आत सोन्याच्या विटांनी बांधलेले एका मुसलमान व्यक्तीच थडगे आहे ऐकलय"आजोबा मला म्हणाले.

"आजोबा,ऐका भाऊ मी अगदी मध्यमवर्गीय हातावर पोट असलेली बाई आहे.लवकरच सर्व सोडून दुसऱ्या गावी जायचं आहे. असं काहीतरी सांगाल तर, दुष्ट लोक माझा खून करतील .आता माझा खून होईल .पैसे आणि सोने यासाठी मला धोका होईल" मी म्हणाले.

आजोबा परत गेले.सुपारी शेठचा फोन आला.

"पामेला बाई ,अस भलत्या ,माणसांना,वेड्यासारखे त्या अनोळखी व्यक्तींना, अशी तुम्ही ती हवेली दाखवू नका. त्यात तुमच्या जीवाला धोका आहे"

"हो हो साहेब लक्षात ठेवेन ."मी सुपारी शेटला सांगितले

तरी बर मला किरकोळ पगाराची नोकरी होती. सुनिल पण घर सोडून गेल्यामुळे, त्याच्या केसेस त्याच्या सहाय्यक चुलत बहिणीने ताब्यात घेतल्या

होत्या. ती पहिले देखील,सुनिलला कोर्टात मदत करी .आता पूर्ण सुनिलचे ऑफिस कोर्टाच्या केसेस ती नीट सांभाळी.

मला यावेळी वास्को-द-गामा आणि केरळाची चर्चेस अशा काहीतरी वेगळ्या विषयावर लिहिण्यासाठी तिरुवानंतपुरंला परत जायचा योग आला.मला मी जावं अशी सूचना माझ्या ऑफिस तर्फे झाली. मी माझ्या मुलाला मनीषला  घेऊन परत केरऴला हजर झाले .जेवण ,जागा निसर्गरम्य होती. सुनिल आता परत येणार नाही, हे मला माहिती होतं .मुलगा मनीष पण थोडा हताश होता. केरलच्या निसर्गरम्य वातावरणात तर मला बर वाटल.असंही मनीषला मुलाला देश आवडत नसे.त्याला  परदेशी जायचं होतं  .त्यामुळे मनीषला मी घरात,खूप जपे,नीट सांभाळत असे. मात्र रस्सीखेच होई.

"केसचे कागदपत्र घेतलेली नाही .शोधुन द्या"असे सांगून के येई.

“मी शोधली,नाही सापडली.सुनिलने, की मदतनीसाने अन्यत्र कोणाला दिली.”मी के सरला सांगितले.

पूर्ण हा बंगला कधी उघडला गेला नाही. बंगल्याचे इतिहास लोक आता वारंवार येऊन सांगत.विचित्र काही बोलत.बंगला विकून सरळ पुण्याला जाऊन राहावं, असं वाटे .एकदा एक असे आलेल्या माणसांनी खुप विचित्र,कुचित्र काहीतरी सांगितल्यामुळे मी पुण्याला एका नातेवाईकानंकडे दोन दिवस जावुन शांत राहिले .मात्र या दोन दिवसांत माझे नातेवाईक माझ्याशी ईतके विचित्र वागले.कि मी  घरी मळगावला माझ्या त्या पडक्या हवेली त घरी बरी,अस मला वाटू लागलं

" या बंगल्यात,त्यानंतर, पुढिल काळात , कोणाला सुखी झोप लागत नाही. तुमचा मुलगा मनीष परदेशी गेला की तिकडेच राहील. परत येणार नाही." असं लोक मला सांगत .

मनीष (मुलगा)आधी काही काळासाठी अमेरिकेत गेला होता .

मी त्याला भेटायला.टूर बरोबर अमेरिकेला जावुन आले.मुलगा मनीष म्हणाला,

"It is important to be happy.not just having money."

"be straight forward"i

"you will,surely get hurt,if i say"son manish

"No problem,go ahead"I

"I do not want to return to India."son Manish

"Be a good artist,my art ended in the kitchen."I

"My art ended in study and homework."son manish

"You continue with art.purchase small art gallery.i can pay by selling Indian property.".

तो कायमचा तिकडे America राहायला लागला.

पामेलाबाईची मी वयस्कर होत आजी झाले.मुलाशी मनीशी मी फोनवर बोले.

”मला काय वाटते, उपचार घेत असताना ,सुनिल गायब होण्याचा संबंध ड्रग,के ,शी असेल?सुपारी बंगल्याच्या वास्तुतील ,नकारात्मकता यामुळे,सुनील गेला का?के शी ,कामकाजातील केसशी काही संबंधित असेल का?”मी.

“गप्प बसून बघ”मुलगा मनीष समजावी.मी किती वेळा कुठे बातमी कळली ,कि तिकडे जायचे.किती गावी जाऊन मी सुनिल ला शोधुन येत असे.पण सुनिल सापडत नाही. पुण्याला एका नातेवाईकाच्या जवळ, त्याच्या आधाराने राहायचं ठरवलं .पण त्याची बायको खूप खडूस होती. कचकच भरलेल्या दाताखाली येणाऱ्या चपात्या आम्हाला खायला देत असे .

"अहो,मुख्य म्हणजे उपाशी पोटी खाल्ल्या जात असतील" असं म्हणून वहिनी हसत असे .शिवाय एकदा तर आम्हाला खूप जुना चिवडा, थालीपीठ भाजणी बांधून दिली. घरी जाऊन करा .ती थालीपीठ भाजणी दोन वर्षे जुनी होती ,असं माझ्या बहिणीने नंतर मला सांगितलं .खरं खोटं देव जाणे पण आमचं मग भांडण झालं.पुणे येथे राहायला जावे हे विचार संपलं. बरं झालं .मी पुण्याला जायचा निर्णय घेतला नव्हता.घर आहे ,छप्पर आहे, म्हणून मी मळगावला तिथेच राहून आपल्या मुलाला वाढवायचं ठरवलं होत.पुण्याचा फ्लॅट होता .घेतलेला तो फ्लॅट एकाला तरी भाड्याने दिला आणि मळगाव ला परत आले .मन सुन्न झाले.आघात झाल्यावर संकट काळी उपयोगी न पडणारे हे नातेवाईक यांना काय म्हणावं? सहज म्हणून सांगते पुढे काही वर्षांनी हेच नातेवाईक माझ्या मुलाकडे ,मनीष कडे,परदेशी टूरसाठी राहायला आले होते. दिवस जात होते मुलाने परदेशी कायमचे जाण्याचा मनात ठरवलं. तो लहानपणा पासूनच

इंग्रजीचा अभ्यास करे. परदेशी जाण्याचा शिबिरांचा निट आराखडा बघा. अभ्यास करून अमेरिकेतून कोणी आलं की त्याचा सल्ला घेणे करी. माझ्या मुलाला मनीषला परदेशी जायचं होत.माझीपण ना नव्हती .असंही मला इथे वैराग्य आले होते. पण काही दिवस तर काढणे भाग होतं .

"सुनिल चा शोध मी परदेशी गेले तर कदाचित थांबून जाईल, त्यामुळे मी तुझ्या सोबत येणार नाही ."मी माझ्या मुलाला म्हटल.

"असं काही नसतं तू तिथे गेल्यावर सुद्धा बाबांचा शोध घेवु शकते. तू काळजी करू नको .बाबा जिथे असशील तिथे सुखी सुखरूप असतील.काळजी नाही .आपण बाबांना शोधू कधीतरी !ही परीक्षा पास झाल्यावर ,मी नोकरीला लागल्यावर माझ्या लग्नात,मुल झाल्यावर माझे बाबा मला आशीर्वाद द्यायला नक्की येतील. तू काळजी करू नकोस"मुलगा,मनीष म्हणाला. मला हमसून हमसून रडू येत असे .मला थोपटत मनीष शांत बसत असे. मुलगा ही माझ्या जीवनातील सर्वात चांगली बाब होती ही !माहेरी स्वप्नवत साजरी स्वप्न मातीमोल झाली होती. पण माझ्या मुलाचे व माझे चांगल्या प्रकारे जमत होतं. धीर वाटे, एकटेपणा मला काही जाणवत नसे. तो त्याच्या कामात बिझी असे,मी माझ्या कामात बिझी असे .

भाग 5

मुलगा मनीष परदेशी गेला.अॉफिसातुन घरी गेल्यावर मला जाणवत गेलं .बाईच्या आयुष्यातलं नवरा गेल्यावरच जीवन सुरु झालं म्हणजे किती दुःखद असते .बाई एकटी केविलवाणी होते .तिच्या चेहऱ्यावरची रया निघून जाते .ती

ने कितीही चांगला राहायचा प्रयत्न केला तरी ती कशीतरी दिसू लागते .समाजातील लोक तिच्या वागण्या बोलण्यावर लक्ष ठेवून असतात. ती कशीही वागली तरी ही महिला एकटी पडते.तत्पर आधार द्यायला कोणी येत नाही .मात्र काड्या करायला येतात .दुसरे लग्न कर असे देखील सांगणारे असतात. पण दुसरे लग्न म्हणजे तर बाईची अशीच मोठी फसवणूक असते .बाई कधीच दुसरे लग्न करू शकत नाही आणि ते लग्न झालं तरीही ती त्या लग्नात रमू शकत नाही .दुसरे पणी सुखी होऊ शकत नाही

"जुनी घरे लोक घेत नाहीत.ती शापीत असतात.ईतिहास पुन्हा एकदा घडतो." माझ्या बहिणीने मला म्हटले.

एकदा अपरात्री कुणीतरी माझे घराचे दार वाजवत होता.मी विचलित झाले.मी घाबरत मुख्य दार उघडलं. सोन्याचा दात चमकणारी,ड्रग ,भांडणे सोनेरी केस असलेली चांगले कपडे घातलेली ती व्यक्ती, के मला हातातील खजुराचे बॉक्स वरून ओळखता आली. के नावाची ही व्यक्ती पूर्वी वारंवार घरी येत असे.या ड्रग केसबद्दल भेटायला येणार्याला मी ओळखले.

ओळख असून ,आपल्या गुप्त खोलीतली खजुराची आणि कागदी ती पाकीट मनात आठवली. मी घाबरले. सोनेरी दात दाखवत हा गिर्हाईक के हसला.

मी त्याला म्हणाले," सुनील साहेबांचा पत्ता लागत नाहीये. तुमच्याकडचे केसचे काय होईल. याबाबत आम्ही काहीच करू शकत नाही ."मी

“पामेलाबाई हे मला माहिती आहे .मी फक्त तुम्ही कसे आहात बघायला आलो .तर मला आधी सांगा.ईथले सामान आणि हवेली विकत घेण्यात मला खूप रस आहे .विकणार असाल तर सर्वात आधी मला सांगा.”तो के मला अस सांगून निघून गेला.तो गेला ,पण मी खूप घाबरले.

परत एक  अनोळखी जण आले.मला ओळखू येईना .कोण असेल? त्यावेळेस  तो म्हणाला,” वहिनी ओळखलं नाही का ?मी केसच्या निमित्ताने तुमच्या नवऱ्याकडे यायचो ” त्याच्या हातातल्या खजुराच्या बॉक्स वरून मी ओळखलं.

"आठवते,फक्त नीट संबंध  लागत नाही."मी.

"हवेली बघायची होती."तो.नोकराने हवेली दाखवली.मनीषने मुलाने गावात, बाहेरच्या लोकांशी चांगले नातं जोडलं होतं. मुलगा परदेशी राहायला गेला.तो भारतात परत यायला मागेना.मी निवृत्ती नंतर पुण्यात गेले,तेव्हा हे नातेवाईक मला म्हणू लागले.” तू लग्न कर !”मला सहवासाची सोबतीची गरज होती पण सोय नव्हती.भाची अलका सोबत ठेवली होती. नंतर एक गावची चव्हाण बाई आणली.  पण त्या बाईचेही माझ्याशी पुढे पुढे भांडण झाले. वॉचमन ठेवला.  बायकांशी पटेना .मुलगा मनीष सांगे,” आई तू लग्न कर”

“ आता लग्नाच्या भानगडीत कुठे पडता?”भाऊ.

त्या वर्षात सहा महिने मी मुलाकडे अमेरिकेत गेले.माझे सहा महिने परदेशी मुलाकडे छान  गेले.

“आई इथे आपण ,लग्नासाठी जाहिरात देऊन बघु, इथे पुष्कळ भारतीय लोक आहेत.”मुलगा.

“ मनीष तू आधी लग्न कर,मग मी नंतर करीन.आधी तुझं लग्न जमलंय तर होऊ दे.परदेशी नागरिक असली तरी  काही बिघडत नाही.”मी

“ मुलाने आईचे लग्न करून दिलं तर काय बिघडते?”मुलगा.

लग्न कर असं माझा मुलगा मला म्हणत असे.पण ते जमेना .सहा महीने अमेरिकेत काढून मी परत आले. मुलाला मनीषला फोनवर म्हटलं “तू तुझं लग्न करून घे.स्वत:साठी जागा घे."

"ईथे वृद्धाश्रमात राहशीन?परदेशी  वृद्धाश्रम बघायला गेलो होतो.  वृद्धाश्रम छान होते."तो

मला तरी भारतात परत जाऊन काय करायचं होतं? मी भारतातल्या वस्तू घर सर्व विकायचं ठरवलं.परदेशी राहु या .ते ठरवून मी काही काळ भारतात आले.मी पुण्याला देखील जाणार होते .

"मी परदेशी जावून, एकूण तीथे वृद्धाश्रमात मध्ये राहु शकते.शनिवार रविवार  मुलाला भेटत गेले असते आणि तिथे पटत नाही वाटलं तर भारतात येईन."मी बहीणीला म्हटले.

"ईथे भारतात पण अनेक वृद्धाश्रम होते .ईथे राहा"बहीण

"बघु.पण तो मळगावचा सुपारी बंगला मी विकायचं ठरवलं आहे"मी.

सुपारी हवेली मी विकणार होतं .पुण्याचा फ्लॅट होता पण तो काही केल्या विकला जात नव्हता.आणि त्याचे फारसे पैसे आले नसते.तो नाल्याच्या बाजूला आला होता. आणि ठरवलं ते ठरवलं होतं .परदेशी जाताना येताना सुपारीशेट चा मुलगा मला घ्यायला विमानतळावर पोहोचवायला येत असे. मी भारतात ,मळगावला गेल्याबरोबर ,सुपारीचा मुलगा विमानतळावर हजर होता. माझ्या मुलाची मनीषची सुपारी पुत्राशी मैत्री होती. मित्राची आई त्यामुळे मला तो घ्यायला येई.मला अवेळी मळगावला कसे जायचे,हा प्रश्न पडत नसे.सुपारी हवेलीत वॉचमन लक्ष ठेवण्यासाठी ठेवला होता .मात्र राज्य घुबडांचे होते,गर्दुले व चोरांचा वावर असे रुप मी नसले कि हवेलीला येई.

भराभर भारतातली सुपारी हवेली विकायचा निर्णय घेतला आणि जमलं तर पुण्याच्या फ्लॅटची पण विक्री करायचं. विक्री खत वगैरे सगळं करायचं होतं आणि कुणाचेतरी ताब्यात हे सगळं सोपवून लवकर भारताबाहेर निघून जायचं होतं. मला परदेशातील राहण्याची सवय झाली होती. तो देश मला आवडू लागला,ते जग सुंदर होतं आणि तिथल्या जीवनाच्या मनाने इथे मला भयप्रद वाटत असे. सुपारी हवेलीत कायमच एक प्रकारची भीती मला वाटत असे.

सुनिल हरवला याच्यात नक्की माझ्या भांडणाचा हात होता कि वडिलांच्या मृत्यूचे दुःख होतं? जीवनाचा पश्चाताप होता की एखाद्या ड्रग,के तस्करी वाल्या के नावाच्या गृहस्थाची, क्लायंट्स चा हात होता.

मी सात वर्षे सुनिलचे परत येण्याची खूप वाट बघितली होती .रघू नावाच्या कुठल्या तरी इथे इडल्या विकणाऱ्या हातगाडीवाल्याला सुपारी शेठने खून

करून या हवेलीत गाडलं.खरंच रघूच्या भूत आहे. भुतावर विश्वास ठेवावा तर ते असंही लोकमानसाला लागले आहे.मध्येच असं काहीतरी बातमी उठल्यावर मीडियावाले आले.जवळपास जुने सांगाडे आणि नाणी सापडली ,असं मला सांगू लागले.हवेलीत आत कुठे सोन्याच्या विटा असतील ,असेही म्हणू लागले .जागा मोठी होती.आता नव विमानतळ जवळ आल्यामुळे आणि रस्ता रुंदीकरणामुळे हमरस्त्यावर आली होती.निवडक वास्तु बनली. आम्ही तर या हवेलीच्या चार खोल्या वापरत होतो.कवी रमोला बाईचं घर ,आशि या घराची ख्याती झाली होती.मोठे सुपारी शेट असतांना या बागेत कारंजे होतं. आता तिथे जंगल बनलं होतं .भिंतीतून झाडं उगवली होती.मध्ये आदेश शुटिंगसाठी शहरातली लोक या जागेवर येत. शहरातला शेवटचा अत्युत्कृष्ट जागेवरचा बंगला,बेस्ट शेजार अशी या बंगल्याची जाहिरात अनेक जण करत असत.पंचवीस वर्षापुर्वी तो बंगला आम्ही विकत घेतला होता. आम्हाला अपेक्षा नव्हती,पण काही काळ तरी आनंदात गेल्यानंतरच हे प्रश्न सुरू झाले.मृत्यु कुठे झालेला नसतो?

कमान आणि समोरची मोठी बंगली (झोपाळा)मुळे दार,लॉक ,कारंजे,आत मुर्ति,या सिस्टीम बंगल्याच्या हेरिटेज रूपात बदल न करण्याची ताकीद सुपारी शेटने आणि ऐतिहासिक विभागाने मला दिली होती.एक रकमी पैसे दिल्यामुळे मी हा बंगला घेऊ शकले होते. नाहीतर थोडीफार सवलत मिळाली असती तर अनेक लोकांनी या बंगल्यावर उड्या टाकल्या असत्या.जीव ओवाळून टाकला असता.

सात वर्षांनी कायद्यानुसार व्यक्ती परत न आल्यास मृत्त समजतात. हे मी जाणत होते.त्यामुळे सात वर्षानंतर सुनिल मृत झाला असे समजून त्याचीही मिळकत काही किरकोळ गोष्टी होत्या त्या माझ्या नावावर आपोआपच झाल्या होत्या. सुपारी हवेलीचे खरेदीखत माझ्या नावावर होत. त्यामुळे हवेली विकण्याच्या बाबतीत फारसा त्रास झाला नाही. हवेली पत्रकारांच्या कोट्यातून घेतल्यामुळे माझ्या नावावर होती.बोजा विरहीत होती. पुष्कळ शोध घेऊनही सुनिलचा शोध लागलाच नाही .माझ्या आयुष्यात मी पामेलाबाई आणि मग मुलाच्या आयुष्यात तो मुलगा मनीष असे आम्ही थोडेफार तरी रमलो .पण सुनिल हरवला हे डाग लागल्यासारख झाल किंवा चुकल.संसाराला दृष्ट झाल्यासारखं झाल.सुनिल का गायब होणार ?कसा?हे आम्हाला कायमच खटकत राहील.

भारतातले सगळे आवरून सुपारी हवेली विकून पुण्याचा फ्लॅट जमलं तर विकून सोनं-नाणं पण छोटे किडूक मिडूक विकून मोठ्या वस्तू फक्त सुनेला देण्यासाठी ठेवायच्या, असं मी ठरवलं होतं .फिक्स डिपॉझिट पावत्या पण छोट्या छोट्या मोडल्या. काही खाती बंद केली आणि मी परदेशी जाण्याची भारतातले सगळे आवरून तयारी केली. सुपारी हवेली विकून पुण्याचा फ्लॅट जमलं तर विकून सोनं-नाणं पण छोटे किडुक मिडूक विकून मोठ्या वस्तू फक्त सुनेला देण्यासाठी ठेवायच्या असं मी केलं होतं. फिक्स डिपॉझिट च्या पावत्या पण छोट्या छोट्या मोडल्या आणि मी परदेशी जाण्याची तयारी सुरू केली .

कायम जाण्याची तयारी सुरू केली .मला अस या मळगावापासून दूर जायचं होतं .लवकरात लवकर.मळगावच्या जवळच नवी मुंबई विमानतळ सुरू होणार. त्यामुळे या जागेला एकदम चांगला भाव आला होता. सुपारी हवेली च्या पुढे एक पडकी बाग होती .गावच्या नगरसेवकाने काहीतरी प्रयत्न करून तिथे फ्लॅट स्कीम बांधायला सुरुवात केली .त्या खेडेगावातली ती एकमेव फ्लॅट स्कीम होणार म्हणून आणि निसर्गरम्य जागा, नदीजवळ देखावा,नवीन विमानतळ जवळ म्हणून चांगल्या जोरात विकली गेली .मात्र त्या खोदकामाचा दरम्यान ,त्यामध्ये सोन्याची नाणी सापडली.दुर्गा मंदिर सापडलं .एक भुयार देखील सापडले. या भुयाराचे तोंड पुढे कुठे असेल ?याचा अंदाज येईना कारण की मधून एक रस्ता जात होता. पण गावातली लोक हा भुयारी मार्ग सुपारी हवेलीत जातो ,अशी चर्चा दबक्या आवाजात करू लागली. सुपारी हवेलीचा मालक स्मगलर होता ,अशा बातमी पासून, सुपारी हवेलीचा मालक गॅगस्टर होता ,पासून,सुपारी सरदारांनी खूप खून केले,अशा अफवा पसरल्या. सुपारी हवेलीचा मालक लपुन वावरत होता, पासून सरदाराने खूप पैसा कमावला जो या हवेलीत दडवला,भुयारी मार्ग काढलेला आहे अशी पण चर्चा मळगावात झाली.

मळगावात माझी कुचंबणा होऊ लागली. सुपारी हवेलीत सोन्याच्या वीटा आहेत आणि सोन्याचा गणपती असावा. एक कबाडी,चड्डी घालून सारखा यायचा.त्याचा मृतदेह खाणकाम करायचे वेळी ईथे,सापडणार,सांगाडा भेटणार आहे अशा देखील चर्चा होऊ लागल्या. मला माझ्या जीवाची भीती वाटू

लागली. भारतातील ही सुंदर हवेली ,हा देश सोडून जायचं मी ठरवलं होतं .हवेलीकडे मनसोक्त,शेवटचे बघतांना मनाचे आले

हे घर ,ही हवेली यातले माझे काही नाही .

रंग रुपवा असो गंधही यातील माझे काहीच नाही .

सर्व सोडून मी आता परदेशी जाणार होते .

माहेर सोडून सासरी आल्यावर रमले होते!

,मला तिन्हीसांजेला माहेरची आठवण येई.ती वाडी किलबिल करणारी पाखरं ,ती झाड ,ते वेडे वाकडे रस्ते, वळणावरची आंब्याची झाड ,झोका बांधलेल्या बागा,सर्वांची आठवण येई. गळयातल्या माळा ,घंटांचा आवाज करत जाणाऱ्या गायी म्हशी आठवत.मित्रमैत्रिणींना भेटावेसे वाटले, पण लग्न झाल्यावर आणि माहेर संपल्यावर मी कधीही त्या गावी जाऊ शकले नव्हते .आता परदेशात गेल्यावर इथे परतपरत कोण येणार? इथे काय येणार होते?

पुन्हा नाही येणे आता,तुझ्या अंगणात! अस मि त्या सुपारी हवेलीला म्हटलं.

निसर्गरम्य बंगल्याची माया मला होती, पण मला इथून लवकर बाहेर पडायचं होतं.

मी आता 65 वर्षाची झाले होते .आता या वयात मला सोन्याचे विटांचे काहीही देणंघेणं नव्हतं .उरलेले दिवस थाटात जगण्यासाठी मी परत जाणार.माझ्या जीवाला माझ्या मुलाच्या मनीषच्या जीवाला धोका होऊ नये

आणि भारतातून सुखरुप जाव.हे सगळे विकुन काढावे.या हेतुने मी घाई घाई करत होते.

दात होते तेव्हा चणे नव्हते

आता चणे आहेत तर दात नाहीत.

अशा परिस्थितीत मी होते. भारतातील सर्व विकून गुंडाळून जाण्यासाठी मी एक दलाल /मध्यस्थ घातला. दलालातर्फे भारी भारी मंत्री संत्र्यांची लोक ,हा बंगला विकत घेण्यासाठी मळगावला माझ्या घरी येऊ लागले.हवेली बंगला,मला (अबला)बघून चित्रपटाचा एक दिग्दर्शक देखील आम्हाला हा बंगला घ्यायचाच असं म्हणून मागे लागला. पण.... पण दैवाच्या मनात काहीतरी वेगळंच होतं

भाग 6

सुपारी शेठ आणि ड्रग केस क्लायंट के ,हे दोघंही बंगला विकत घ्यायचा म्हणून माझ्या मागे लागले .वादावादी होऊ लागली .आणि एक दिवस मी स्पष्ट सांगितलं ,"तुमच्याकडून तुम्ही दोघे ठरवा. कुणी घ्यायचं त्यांना घ्या .सुनिल घर सोडून गेल्यापासून ,एकटी असलेली मी खूप दुःखी झालेली होते .त्यामुळे मला आता वादात पडायचे नाही. तुम्ही दोघच ठरवा तुम्हाला काय निर्णय घ्यायचा ते घ्या. मला पैसे द्या .मी सही करून निघून जाईल."मी

"पामेला बाई हवेलीच्या जागेत खणाल  तर पन्नास तरी सांगाडे सापडतील." सुपारी सेठ ड्रग केस वाल्या के याला म्हणाला .ते त्यांना म्हणाले,

"एक्कावन नंबरवर तुझ नाव टाकू का ?"

तिथे त्या दोघांचा तो वाद बघून मला अतिशय भीती वाटली .

"तिथे फ्लॅट स्क्रीम बांधता येणार नाही. खोदकामात नको ते काहीतरी सापडेल .हाच बंगला जर नूतनीकरण करून वापरायचा असेल तरच तो आपल्या दोघांपैकी एकाला वापरता येईल "असं दोघांनी ठरवलं .गावातील कुणीतरी मध्यस्थाने त्यांना समजावलं .गावातील एका एकदम वयोवृद्ध नव्वदीच्या वर वय असलेल्या माणसाने मिरची शेठ ला सांगितले की,

" येथे पूर्वी एक दर्गा होता. (कित्येक वर्षांपूर्वी )त्यामुळे ही जागा मुस्लिमाला घेऊ दे .या पामेला बाई ताई हिंदू होत्या म्हणून यांना सगळा त्रास झाला. यांचा नवरा सुनिल लापता झाला. तरी ऐका ही जागा काही करुन मुस्लीम व्यक्ती कडे जाऊ दे"

हे ऐकून ड्रग केसवाले  के गप्प बसले. त्यानंतर ड्रग क्रे◌ेसवाले त्या के याने हा बंगला विकत घेण्यासाठी फारसा आटापीटाच केला नाही. मी सुपारी हवेली विकली. सुदैवाने पुण्याचा फ्लॅट के विक्रेत्याने विकत घेतला. भरपूर पैसे मिळाले .बँकांमधील सगळी इतर खाती बंद करून एकच खात ठेवला.35 कोटीला हवेली विकली..काम झाले. पण ...

आणि मी दोन दिवसांनी अमेरिकेला कायमची निघून जाणार होते.

सगळ्यांचा निरोप घेतला होता सुपारी शेठ चा मुलगा, नेहमीप्रमाणे मला परदेशी जातांना विमानतळावर सोडायला येतो ,तसा सोडायला आला.पण

सोबत सुपारी चा मित्र,अन्य पुत्र,मिरची  होता . विमानतळावर गाडी थांबून, मी सामान बाहेर काढले. बॅग घेऊन दारातुन आत जात असताना मला मिरचीचे चा मुलगा म्हणाला ,

“काकी ड्रग विक्रेते के काका मला असं सांगतात की ,मनीषचे बाबा सुनील चा खून झालाय .सुनील सरांचे प्रेत आणि त्यांचा पण सांगाडा या सुपारी हवेलीत सापडेल” मी चमकले.

“काहीतरीच काय बोलतो ? जास्त टीव्हीवर क्राइम पेट्रोल आणि गुन्ह्याच्या मालिका बघून मनात आलं का ?तुझ्या मनातुन ते काढुन टाक.असं काही नसेल. सुनिल कुठेतरी कुठे असेल .माझ्या मते तो हिमालयात वगैरे जाऊन साधू बनून राहिला असेल”मी उत्तर दिलं .

"हां"सुपारी पुत्र

ते विमान पकडून मी अमेरिकेला निघून आले.भारतातील फोन बंद झाले.मन सुखावणारा काळ होता.

भाग 7 अमेरिकेत

मनात वेगवेगळे विचार मला कायम येत असत.असे मनी तसे मनी वाटे.भारतात फोन पण केला, तरी भीती वाटत असे. आता मी भारतात परत कधी जाणार नव्हते. मी ईथे बैठे योगासनाचे क्लासेस घ्यायला सुरुवात केली .काही दिवस मुलासोबत मनीष सोबत राहिले. नंतर एक छोटीशी खोली भाड्याने घेऊन तिथे राहू लागले. शारीरिक दृष्ट्या थकले कि वृद्धाश्रमात जायचं

ठरवलं होतं. शनिवार रविवार मुलगा मनीष व त्याच्या कुटुंबा सोबत राहण्यासाठी मनीषच्या बंगल्यावर जात असे.त्यांचे पत्नीशी वाद नको म्हणून मी ते ठरवल.मनीष त्याची बायको परदेशी नागरिक आहेत.माझे काम ,पुजा,टीव्ही चालु आहे.

एके रविवारी मी तिथे अमेरिकेत असताना मनीषला भारतातून फोन आला. काही तरी,विचित्र कुणीतरी बोलले.फोन आला की अनामशी मला भीतीच वाटत असे. सुपारी हवेली ची काळी सावली जणु काही माझ्या मनावर कायम वावरत असे.मुलगा फोनवर हो हो करत होता. परत एके शनिवार रविवार मी जेव्हा मुलाकडे मनीषकडे गेले.(मी जाते तेव्हा खाऊ नेते.एकेक किलो सर्व सुका खाऊ,खजुर वगैरे )त्यादिवशी मुलाकडे टीव्ही बघत असताना, मला कळलं आमच्या सुपारी हवेली मध्ये खोदकाम नूतनीकरणाचे काम चालू असताना लाकडी फळयांच्या खाली, कमानीच्या जवळ विचित्र काही, सापडले. बंद खलबत खोलीत, मागे भिंतीतून उगवलेल्या झाडांच्या मुळांची स्वच्छता करत असताना ,एक सांगाडा सापडला. तो सांगाडा तीस वर्षे जुना होता. एका त्यावेळी चाळीशी वर्षे वयाच्या पुरुषाचा होता. प्रेताच्या सांगाड्याच्या जवळच्या कागदपत्रांनुसार सांगाडा एखाद्या गर्दुल्ल्यांचा असावा.कारण की या बंगल्यात मालकीणबाई पामेला बाई (मी)व मुलगा मनीष परदेशी असताना गर्दुल्ले आणि दारुड्यांनी ही हवेलीत अड्डा बनवली होती. हवेलीत भुरटे चोर मध्ये येत असत.मात्र या सहाशे वर्षे जुन्या हवेलीत सोन्याच्या विटा असल्याची, वदंता असल्यामुळे,सळया,फळया चोरून न्यायला या हवेलीत खूप जण,वाईट

हेतुने येत असत. त्यातील एखाद्या चोराचा हा सांगाडा असावा.आता सापडला असावा. हा चोर आत आला असताना,अचानकपणे  हवेलीची ,कपाटाची फळी,कपाट , एखादा भाग पडून,हा चोर  मृत पावला असावा .

हरवलेल्या माणसांच्या मिसिंग तक्रारी ,पोलीस बघत होते. कुणाचा तो सांगाडा असावा याचा शोध देखील घेत होते. त्या प्रेताची म्हणजे सांगाड्याची हाड चेपलेली होती. अंगावर चाकूचे वार केलेले होते.सोनेरी रंगाच्या पण सोन्याच्या नसलेल्या वीटा असलेली कबर तिथे सापडली होती. त्यावर सिमेंटची रबड पडली होती.पडकी मुर्ती,लाकडी फळय़ा पडल्या होत्या आणि खाली तो पूर्णपणे कुजलेल्या सांगाडा उरलेला होता.ते हाड मोडलेल्या सांगाडा,कंकाल रुपी प्रेत कुणाचे होतं ?पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल केला होता.

पूर्वी येथे गर्दुल्ल्यांचा वावर होता ही जागा खंडहर देखील होती. कित्येक वर्षे बंद होती. काही काही लोक येथे चित्रीकरणाला यायचे. बंगल्याचा मूळ खुप जुना मालक ,ती व्यक्ती सरदार होती. दारुडे लोक येथे येत. बेघर झालेली माणसं रात्री ते पथारी टाकून कारंज्याजवळ निजत असत.त्यातील कुणाचे असु शकते.या  खोलीत सापडलेले प्रेत हे अन्यत्र खून करून कुणी,ते त्या जागी आणून टाकलं कि त्या व्यक्तीला इथे मारलं गेल,पोलिसांनी शोध घ्यायला सुरुवात केली आहे.

हा खरच खून असेल का ?की भिंत पडून मृत्यू झाला असेल ?सरदारांच्या मुलांचा शोध घेतला, त्या वेळच्या हरवलेल्या लोकांच्या वर्णनावरुन प्रेत

सरदारच्या घराणेचे माणसाचे असावे .असे ठरवून सुपारीची बायको गायब झाली तीचे प्रेत असावे की काय? असाही विचार केला गेला.पण ते प्रेत कुणा पुरुषाच असाव.नक्की कुणाचे , यांचा काही फारसा अंदाज येत नव्हता.भावाचा फोन आला."तुमच्या हवेलीतील सांगाडा गाजतोय.घटनास्थळी एका व्यक्तीचा गाडी चालवण्याचे परवाना पत्र सापडलं होतं.त्या परवान्या पत्रावरील पत्त्यावरून त्या व्यक्तीचा शोध घेतला .तसे केले असता, त्या व्यक्तीची मुलं म्हणाली,"आमचे वडील विसराळु होते व्यसनी होते आणि श्रीमंत होते. पण विसराळु पणामुळे रस्त्यावर असेच फिरत असत.घराचा पत्ताच विसरून गेले होते.त्यामुळे ते कुठेही जाऊन निजत असत. आणि पडत असत .जिथे ते निजतात,पडतात तिथे,चुकूनही जर का कुणाला शोध लागला तर ती व्यक्ती आमच्या वडिलांना आमचे  घरी पोहोचून देत असते."

ती मुल म्हणाली,"हवेली,या जागी जर वडील गेले असतील तर त्यांना बाहेर येताना मार्ग सापडला नसेल. आणि तिथेच वृद्धापकाळामुळे वडिलांचा मृत्यू झाला असेल."असा अंदाज या मुलांनी केला. त्या मुलांची आणि त्या सांगाड्याची  डीएने टेस्ट करण्यात येणार आहे.हवेलीच्या मागील खोलीच्या पाठीमागे,जी जागा वॉचमनला सध्या  राहायला जागा दिली होती त्या खोलीच्या बाजूलाच शापीत घुमट होता.कित्येक वर्षांपूर्वी म्हणे कोणीतरी वेडा फकीर त्या घुमटात येऊन निजत असे.

पांघरशी जरी असला कपडा येशी उघडा जाशी उघडा ,अस एकतारीवर संगीत म्हणत ,अख्ख्या गावात फकीर फिरून भीक मागून पोट भरत असे.एक

दिवस तो फकीर अचानक गायब देखील झाला होता .हा सांगाडा त्या फकिराचा सुद्धा असू शकतो."भाऊ म्हणाला."बरे.कळवत जा"मी सापडलेल्या एका सांगाड्यावर्ती मीडियावाले, वर्तमानपत्र-वाले, टीव्ही वाले आणि गावातली लोक शंभर कथा जुळवत होते. होते.बेल्जियमच्याMannequin pee, लहान मूल जिथे सुसु सुरुसुर करतो, त्या कारंजाच्या सारख कारंज, हे मागच्या दारी होत. कारंजे आणि जाळीदार घुमट होता.बातम्यात सांगितलं "त्या घुमटाच्या आत एक शिळा होती. ज्याच्यावर इंग्रजीत काही गोष्टी लिहिल्या होत्या.आता नूतनीकरणाच्या वेळी शिळा सापडली ."मनीष

"आपण तर तिथे वीस वर्षे राहिलो.  मला कधी शिळा बघायला मिळाली नव्हती.काहीतरी गूढ मात्र त्या हवेलीत असावं असं मला नेहमी वाटत असे"मी

"आई म्हणे या शिळेवर इंग्रजीत जे लिहीले  होतं ते असं होतं.

I have regrets,I want to go back in life span.I want to rewind and corect old mistakes.Mistakes.i want to be with my parents and behave with maturity."मनीष.

अल केमिस्ट या कादंबरीची सुरुवात एका पडक्या हवेलीतून होते .अल्केमिस्ट चा नायक हा गुराखी असतो. त्याच्या मेंढ्या आजूबाजूला तिथे चरायला सोडून मोट्या खंडहर मध्ये झोपलेला असतो. त्यावेळी त्यावेळच्या छताच्या एकेक कमांनी तुटू लागतात. भिंती ढासळू लागतात.तशीच माझी जीवनाची सुरुवात या खंडहर मधून करणार आहे. असं मोडी लिपीत लिहिलेली

एक शिळा तिथे होती.आम्ही,मी सुनिल,मनीष तिथे राहत असताना यातील काहीही सापडले नव्हतं.हवेली खरेदी करणाऱ्या व्यक्तीने फोन केला.

"मी पूर्ण पैसे हवेलीसाठी घातलेत त्यामुळे आपण सांगाडा येथून घेऊन जावा .काम आणि मला नूतनीकरण करण्याची परवानगी द्यावी.असा अर्ज मी सरकार दरबारी केला होता.त्या अर्जाची वरती वरपर्यंत पोहोच असल्यामुळे आणि हॉटेलच्या भागीदारीत बऱ्याच श्रीमंतांचा हात असल्यामुळे त्आमचा हा अर्ज मान्य झाला."खरेदीदार.नंतर टीव्ही वर खास बातमी होती.पुरातत्व विभागाने हवेली नीट निरखून पाहिली.चौकशी केली  गेली. मात्र या प्रेता व्यतिरिक्त अन्य काहीही तिथे संशयास्पद सापडलं नाही.टीव्हीवर रिपोर्ट चालु होता."पूर्ण हवेलीच्या आजुबाजुची  बाग,आणी कारंजा देखील खणून काढा .सत्तर प्रेत सापडतील."

गावातील लोक पोलिसांना चढवत होते.मात्र पोलिस लक्ष देत नव्हते.मी सुनिल हरवला तक्रार नोंदवली,तेव्हा पोलिसांनी लक्ष दिले नव्हते.मात्र गावातील लोकांची अशी मागणी आहे की या सांगाड्याची डी एन ए टेस्ट करावी .हा सांगाडा कोणाचा आहे ,याचा शोध घ्यावा.रिपोर्ट चालु होता. मी बघत होते. अर्धी नवी हवेली ,टीव्ही वर विडिओ,फोटो सविस्तर दाखवली जात होती.”

"carcass found at the time of digging haveli” मुलाने मनीषने सुनेला सांगितले. तिला तेव्हा समजलं  .हवेलीचं नूतनीकरण चांगल्या प्रकारे होत होतं .पुढच्या सर्व खोल्या नव्या सारख्या शूटिंग साठी तयार असल्या

सारख्या दिसत होत्या. अगदी मागच्या बाजूची ,ही खलबत खोली होती.जी मी एकदा उघडली होती पण घाबरुन परत बंद केली होती.पामेला बाईने हवेली विकली आणि तिथे हा सांगाडा नव्या मालकाना सापडल्याचे ,वारंवार,टीव्हीवर अस दाखवलं जात होतं. लोक रघु गायब झाला,याचा संदर्भ लावत होते.बातमी खूपच रंजक करून दाखवली जात होती .मुलगा मनीष मला म्हणाला,"आई काय ग हे?बर झालं तू तिथे नाही. आपण विकुन मोकळे झालो.त्या घरात गडबड होती. मी नेहमीच म्हणे मला भीती वाटते.''मनीष

''मला देखील वाटे.पण आपण कुठे जाणार होतो?पैसा नव्हता.नातेवाईक आधार देत नाही.म्हणून मी घाबरले .खूप उशीरा विकली."पामेला."आई तरी तुला ते लोक कमीच राग दाखवत होते. सुपारी ,वॉचमन, के ,गावकरी तर असे वेडे होते.बाबा हरवले यावर भावकीने फक्त चर्चा केली. मदत केली नाही"मनीष"जाऊ दे.ते नष्टचर्य आता संपले.''मी पण मला थंडी भरली,मन बेचैन झाले. मानसिक ताणाने शहारले आणि थंडी वाजून ताप भरला .थंडीने हुडहुडी भरून मला ताप भरला.सुपारी हवेली ची त्या रातीची ,भितीची काळी सावली माझा पाठलाग करू लागली.अमेरिकेतील दुसरा दिवस उजाडला. मी मुलाकडुन ,परदेशीच्याच पण माझ्या स्वतंत्र घरात आले.ईतकी वर्षे कधीही सुनिलचा मृतदेह सापडला नाही .सुनिल जिवंत आहे असं लोकांना वाटावं म्हणून मी आत्तापर्यंत तरी मंगळसुत्र बांगड्या अशा सौभाग्य लक्षणांत,सुवासिनीची तयारी करून वावरत होते.सुनिल हिमालयात गेला असेल असा अंदाज लोकांसमोर मांडून ठेवी . सुनिल जिवंत आहे मी विवाहित

आहे ,सुनिल कधीतरी परत येऊ शकतो, असा भ्रम लोकांमध्ये जिवंत ठेवण्यात माझा फायदा होता .सांगाडा सापडला म्हटल्यावर मी अस्वस्थ झाले .ती खलबत खोली मी फक्त एकच दिवस उघडली होती.तो सांगाडा सुनिलचा आहे ,याची मला आता खात्री पटली होती .कधीतरी नंतर आता अशा प्रकारे सुनिलचा देह सापडेल आणि अशी काही तरी चौकशी पुढे होईल ,याची मला सुतराम कल्पना नव्हती .संधि मिळाली की ती हवेली विकली.परदेशी येऊन मी सर्व प्रश्नांमधून सुटले असं मी समजत होते . आता तसा हा सांगाडा म्हणजे काही पुरावा नव्हता. पण मनातल्या मनात मात्र मी थोडी हादरले होते .का घडले असे? मी देवघरात गेले."देवा ,तरीही अजुन माझे किती दिवस असे जगायचे उरले आहेत?उरलेले दिवस आनंदात जाऊ देत.कसे जातील?". मी देवासमोर बसले."देवा जशी बुद्धी तुच मला दिलीस,तशीच मी वागले ना!अजुन प्रेते,सांगाडे सापडले तर?"मीमी देवाचा जप केला.थोड्या वेळाने टीव्ही बघु लागले.दरवाजाची बेल वाजली.पाठोपाठ दारावर थाप पडली.कधी नव्हे ते मी भीतीने थरथरू लागले.पण दार उघडले ,तर मुलगा आणि सून जेवण घेवून खुशीत खुशाली विचारायला आले होते.मी ईथे खूष आहे.पण एक ईच्छा आहे.अजुन जुने सांगाडे बाहेर येवु नयेत.

**

# 7 चौकोन(चौकट)

मी अनु जो!माझे वय 68 वर्षे आहे.

तसे म्हणायच तर तसं माझ आयुष्य खूपच सुखाचं आणि आनंदी म्हणायचे. समाजात मान आहे.आदरणीय वृध्दांचे त माझे नाव येते.दोन मुलगे तेसुद्धा त्या काळात म्हणजे तर काय विचारता?

पांचों उंगलियां घी में और सिर कढ़ाई में!

खूप 'घरकी खुशी' होती .खूप वरचा पैसा मिळत होता.मी पाच घर ,खूप दागिने 2प्लॉट खरेदी करून पैसा राखून आहे.

दोन्ही मुलं मोठी झाली.हाताशी आली आणि मुलांना अमेरिकेत नोकऱ्या लागल्या .आम्हाला फारसा खर्चही नाही आला.मुल ती कशी,सो सो तरी बीकॉम शिकली होती. पण कुठल्यातरी खासगी बँकेत, दोघांनाही परदेशी नोकरी लागली आणि दोघेजण चांगल्या प्रकारे सेटल झाले. मोठ्या मुलाने तिथेच एका दुसऱ्या जातीच्या मुलीशी लग्न केलं. त्याला मुलगा झाला आणि सर्व सुरळीत सुरू झाले. दुसऱ्या मुलाचं सुद्धा लग्न ,त्याने तिथेच जवळच्या एखाद्या दुकानात मारवाडी मुलीशी जमवलं. मुलगी कॉलनी मध्ये (अमेरिकेत) लॉन्ड्री चालवायची. लोकांकडून कपडे धुवायला घेऊन यायची आणि इस्त्री

करून परत घेऊन यायची. तिथे तीच माझ्या मुलाबरोबर प्रेम जमलं आणि दोघांनी लग्न करायचं ठरवलं. लग्न मीच थाटात करून दिलं. मी खूष होते.

कारण मारवाडी पध्दती नुसार नव्या सुने कडचे सगळेजण मला खूप मस्का मारायचे. त्या काळात आजाराने, दरम्यान माझ्या पतीचा मृत्यू झाला

ज्या महिन्यात माझ्या पतीचा मृत्यू झाला, त्याच दरम्यान सून बाई गरोदर राहिली. आपल्या पतीचा आपल्या वरच्या प्रेमामुळे ,पति परत जन्म घेतोय, या आनंदाने मी सुनेचे खूप लाड केले. सुनेला मुलगा झाला. तिचं नाव ससाक असं ठेवलं. सगळं व्यवस्थित चाललं होतं .पण पतीच्या निधनामुळे मी इकडे भारतात एकटं कसं राहायचं? त्यामुळे बाळंतपणात कामा च्या निमित्ताने मला बोलावणे आले. परदेशातली बाळंतपण काही आपल्यासाठी त्रासदायक नसतात. त्यामुळे मी पण गेले.आत्ता मला काही फारसा त्रास झाला नाही आणि माझं सुनेवर खूप प्रेम असल्यामुळे मी खुश होते. सुनेला मुलगी झाली होती. त्याला ससाकला मी माझ्या पतीचे असे रूप समजून कोड कौतुक करत होते. सर्व खुशाल चालू होतं .भारतात पण माझी भरपूर जमीन ईस्टेट होती.दोन तीन बंगले, दोन फ्लॅट-तीन प्लॉट होते. हे बाकीचे सगळे प्रॉपर्टी विकून, माझे एक घर मोठ्या मुलाला आणि एक धाकट्या मुलाला द्यायचं आणि बाकी सगळे पैसे ,शेअर्स बाकीची सगळी प्रॉपर्टी ,पैसे वाटणी ठरवली.या मुलांना ,माझे नंतर अमेरिकेतून येऊन विकणे जमणार नाही म्हणून विकून पैसे दोघांना वाटून द्यायचे असं मी ठरवलं होतं. पण त्याच दरम्यान मी इकडे ससाक मध्ये चांगली रमले. अमेरिकेची रहन सहन ती

चमकधमक मला आवडली आणि मला भारतात परत जावं असं वाटेना. अर्थात मुलगा ग्रीन कार्ड होल्डर होता .मी मुलाला म्हटले,

“ हे तुझं घर तुझ्या नावावर आहे. तू माझ्या नावावर एक फ्लॅट घे. मी पैसे देते आणि मी तिथे स्वतंत्र राहते. म्हणजे माझे काही दुखलं-खुपलं तर, तुम्ही मुलं माझी देखरेख करू शकाल .पण तुझ्याशी पटलं नाही, तुझ्या सुनेशी पटलं नाही तर ही अडगळ आहे, असेही वाटायला, व्हायला नको. त्यावर मुलगा म्हणाला ,

“तुला असं का वाटतं कि ती असे वागेल.माझी बायको किती गोड आहे.”तो

“असे तुझ्या नजरेने असेल पण मी मात्र तिच्या भितीत,दबावातच वावरते आणि त्यामुळे मला एकत्र नको.आणि तुमच्या सोबत कायम परावलंबी होऊन राहिलं अस नको.”मी.

“का असे वाटतं?are you jealous of her ?”तो

“नाही.सकाळी उठून त्या मुलीला सांभाळावं लागतं .सुट्टी असली तरी तुम्ही दोघं कुठेतरी दूरवर फिरायला जाता आणि मुलगा माझ्या जवळ ठेवता.मला नेत नाही.माझ्या साठी कामाची यादी, ससाकला सांभाळायला घरी ठेवतात. मान्य, तो मुलगा नातवंडा ,ना,मोठी गोड आहेत आणि माझं तुझ्यावर खूप प्रेम आहे. पण तू असं नव्या जागेचे जमतं का बघ .”मी

मी भाड्याने घर घेऊन राहायला तयार होते. माणूस खलनायक अथवा नायक कसा स्पष्टपणे कधी नसतो. जीवनाची विभागणी अशी पांढरी काळी कधीच नसते. मध्ये मध्ये काही रेखांत राखाडी रंगाच्या छटा असतात. केवळ जेवण वेळेत मिळावी अशी अपेक्षा नव्हती.

“ मी माझे आयुष्य जगले.सांगितलं तर, तुम्ही माझ्यावर जळाल.”मी आम्हाला असे एकमेकावर जळायची,कटकटी करत राहायची काही कारणे/गरजच नव्हती. मी खूप छान आयुष्य जगले होते आणि अजूनही जगू शकत होते. मी एकत्र राहू शकत होते.नाती ही असुन अडचण नसून खोळंबा असतात.तसे आम्ही खूष असायचो. पण समोरासमोर दोन घर घेतली तर थोडं मला स्वातंत्र्य मिळून,तीलाही मिळेल.ठीक आहे,बरे आहे ,वाटतं ते आपली वादावादीत फ्रीक्षण कमी झालं तर मस्तच काय चांगले राहू शकलो असतो. माझी व सुनबाईची इच्छा होती (आहे) दोघांना एकमेकांचा त्रास न होता आम्ही कुटुंब सुख भोगावे.

तसे म्हणजे माणस एकटी जगत असतात. एकत्र राहिली की भांडतात आणि दूर गेले की आठवण काढतात. तसं होऊ नये म्हणून हा शॉर्टकट, मला चांगला वाटत होता.

मुलांनी फ्लॅट ,वीसा नियम चौकशी केली .मी माझ्या बहिणीचा भावांचा सल्ला घेतला. बहीण म्हणाली ,

“राहा अमेरिकेत!काही हरकत नाही .इथे तरी तुझं काही झालं दुखलं-खुपलं तर तुला कोण बघणार आहे? त्याच्यापेक्षा त्या मुलाच्या जवळच एखादं

छोटं घर घे आणि राहा. इथलं भारतातील एक घरकुल तुझ्यासाठी राहू दे.अगदीच काही अनपेक्षित प्रसंग आला तर असावे, म्हणून शिल्लक ठेव''

त्याच दरम्यान माझ्या आईचा मृत्यू झाला. आई वारल्यामुळे, तशी मी थोडी नाराज झाले होते. केवळ आई वारल्यामुळे मला भारतात परत यावे लागले. नाही तर मुलगा आता तुझं भारतात काय काम आहे? इथेच राहा ,इथेच राहा ,असे करत होता. सुनबाई पण मला राहा म्हणत होती कारण की मी घरी असले की मुलांना पाळणाघरात ठेवावं लागायचं नाही. घर बोलते असे आणि एक मनुष्यबळ असायचं.पण मलाच त्या दहशतवादी वातावरणात राहायला नको वाटतं होते. Nonveg मिळाले नाही तर तिथे पुढे, तर माझा श्वासच गुदमरु लागला  होता. आपल्या भारतातील, बाहेर खाणं,नोकर, आपली रहन सहन, वाटेल त्या व्यक्तीशी गप्पा मारणे, बोलणं ,खूप फिरणं हे मला आवडायचं.

" आई तू इथे फिरू शकते"लेक

"अरे मी इथे काय फिरणार? मला काही रस्ता कळत नाही. इथे उबेरने जाणे,मैत्रीणीकडे राहण्याची सोय नसते. तुमच्यावर अवलंबून राहावे लागते. मी मॉल मध्ये सुद्धा जाऊ शकत नाही .स्वतःहून काही सामान आणू शकत नाही.''मी

"घरी राहा.ससाक सोबत मजा कर.''लेक

"शिवाय मी स्वयंपाक खोलीत काही केलं, की तुम्ही म्हणता ओटा खराब झाला .ते काही खाऊ करायचे म्हटले कि सून रागावते. ओटा खराब झाला

म्हणून. हळदीच काही करायचं म्हटलं तर टॉवेलला हळद लागली तर चिडते .अंगाला तेल लावलं तरी तुम्हाला तुमचा कार्पेट खराब होईल अशी भीती वाटते. त्यामुळे मला बाबा तू जाऊ दे .मी येईल एक सहा महिने झाले की येईन"मी..

मी भारतात आले .आईचा मृत्यू झाला होता हे कारण मिळाले.आईचा मुंबईत 1000 स्क्वेअर फुट चा ,जवळ जवळ पंधरा कोटी किंमत असेल ,असा फ्लॅट होता. आम्ही दोघी बहिणी आणि दोघ भाऊ ,घर पैसा,दागिने वाटणी ही प्रत्येकाची झाली. सध्या तरी भाऊ तिथे त्या घरी राहत होता. पण आईने मृत्यू पत्रानुसार समान वाटणी करण्यासाठी वील केले होते.आई खूप आधुनिक आणि मुलामुलींवर समान मानून मुली मुलांनी सारखेच प्रेम करणारी होती. त्यामुळे आईने वील नुसार  सांगितलं की हा फ्लॅट विकून पैसे वाटून घ्यावेत किंवा या फ्लॅटच्या बाजार भावाच्या किमतीनुसार जी रक्कम समप्रमाणात वाटून सगळयांनी घ्यावी. त्या वीलवर वादावादी आणि भांडण करणार नाही, अशा आमच्या स्टॅम पेपर वर आधीच सह्या घेण्यात आल्या. चार वकील होते. सोसायटी सेक्रेटरी होता .आईचे खुप शेअर्स होते. शेअर्स रोकड सगळे मिळून जवळजवळ मला तीन कोटींपर्यंत रक्कम मिळणार होती. तीन कोटी मध्ये मला परदेशात घर नक्कीच शक्य झालं असतं. मुलाच्या नावावर एक घर होतं. माझ्या नावावर मी हे तीन कोटी देवुन नवा फ्लॅट सगळे येणार होते. आणि मग मी परदेशी पण राहू शकते. ते माझं स्वातंत्र्य मी जपून  पण अमेरिकेत राहू शकत होते आणि मुलांच्या जवळ पण राहू शकत होते. दोघं मुलं अमेरिकेत होती

आणि जेमतेम दीड तासाच्या अंतरावर दोघांची घरे होती .मोठ्या मुलाकडे नातवाला सांभाळायला, धाकट्या मुलीकडे मुलाकडे नातीला सांभाळायला असं मी रहात असे. दोघांनाही भरभरून पैसा मिळाला होता. पण न जाणो का माझ्या मनात यायचं की 'यांची नजर माझ्या पैशावर आहे' मी मुलाला म्हटलं की ,

"इतके तीन कोटी मला मिळाले, तू एक घर बघ ."

त्यावर मुलांनी मला असं सांगितलं की ,

"आई तुला ग्रीनकार्ड नाही त्यामुळे हे घर माझ्या किंवा सुनबाई च्या नावावर घ्यावे लागेल."

माझं मनच धपापलं .वेगवेगळे हिंदी सिनेमे, मित्र-मैत्रिणींचे भलेबुरे अनुभव आठवून, मी म्हटलं ,

"तुला जर आपण सगळे पैसे देऊन,मी तिथे घर घेतलं आणि ते घर ***!बरे!"

घर त्या मुलगा आणि सून यांच्या नावावर राहणार .त्यांनी मला हाकलून दिले, तर किंवा ही तर खूप दूरची गोष्ट माझं पटलं नाही आणि मला त्यांना सोडून यावं असं वाटलं तर काय करणार?

त्याच दरम्यान भारतात मला एक मित्र मिळाला होता. मी तर मस्त त्याच्यासोबत आनंदात राहत होते.सहली बाहेर खाणं आणि त्यानंतर जणू काय आमची स्वप्नं पूर्ण झाली. त्यानंतर मी एक वर्ष काढले. माझ्या बहिण भाऊ

आमचे सगळयांचे आई वारल्यावर पैसे वाटून वगैरे, बरोबरीने घेतल्यामुळे, कटुता कमी झाल्यामुळे आम्ही खूष होतो. पण नंतर माझ्याशी भाऊ भांडला.त्याचा स्वभाव चिडका होता. माझी बहिण थोडी विचित्र स्वार्थी होती .पैशाची हपापलेली होती. त्यामुळे आमच्यात वादावादी सुरू झाली. मला तर परमेश्वराने चांगल्या तब्येतीचं वरदानच दिलं होतं .त्यामुळे मला चिंता नव्हती.मुलगा अमेरिकेत ये म्हणायचा.मी जायचे ठरवले.

दोघे बोलावत पण धाकटा मुलगा नेहमी म्हणायचा,आई आता ठीक आहे पण नंतर तुला गरज लागेल. मोठ्या मुलाला माझी काही गरज नव्हती ,कारण मोठ्या मुलाच्या बायकोला माहेरचा भरपूर मान,आधार मिळणार होता. त्यामुळे तो माझ्या पैशाचा गरजवंत नव्हता. पण धाकट्या मुलाची बायको जी अगदी मारवाडी होती .त्यांच्या त्या गावी अमदाबाद च्या जवळ कुठेतरी स्थान मध्ये एकदम घाणेरडे झोपडीवजा भाड्याचं घर होतं आणि तिचे आई-वडील मुलाकडे, मुलाकडे असे आलटून-पालटून राहत होते.गरिबीचे कारण होते की काय? त्यांनी ते गाव सोडून दिलं होतं. अशा रीतीने दिवस जात होते आणि त्यामुळे किंवा पैसे मी देत असल्यामुळे त्याने त्याच्या नावावर अमेरिकेत एक दुसर घर घेतलं. घरावर सोय करून दिली त्या घरावर माझा हक्क होता कारण मी माझे भारतातले आईकडून वारसाने आलेले सगळे पैसे लावले.बाकीचे पैसे, माझी ही दोन मुख्य घरं सोडून बाकीचे घर विकून मिळालेले पैसे त्या अमेरिकेतल्या फ्लॅटवर लावले होते. अर्थात तो फ्लॅट मुलाच्या बंगल्याच्या जवळ होता. तरी भरवस्तीत होता. तिथे मोठी बाग होती .मराठी लोक खूप

होती.बोलकी होती आणि ती लोक दर रविवारी त्या बागेमध्ये काहीतरी गेट-टुगेदर वाढदिवस वगैरे असा कार्यक्रम करून मजा करायचे .मी तिथे जाऊन राहिले. रमले .खूष झाले .नातवाला सांभाळले तर सांभाळले ,नाही तर मी सुनेला सांगायची की तू नातीला पाळणाघरात ठेव. पण हळूहळू माझा सुनेशी विसंवाद सुरू झाला. माझी स्वतंत्र वृत्ती ,माझे पैसे खर्च करणे आणि माझे आरामात राहणं माझ्या सुनेला चुपुन लागले.

"किती तुम्ही नॉनव्हेज खाता,शी मला किळस येते ."माझी सून म्हणाली.

" अग माझा आहार तसा आहे. आम्ही आयुष्यभर चांगलं तुम्हाला काय मिळते ईतके खाल्ले."मी

"म्हणून काय झालं, चार हजाराचे तर महिन्याला तुम्ही ड्राय फ्रुटस खाऊन घेता." सून म्हणाली. मला खूप राग आला. माझ्याकडे पैसे आलेले त्याचे खाते आणि हीच पोर ससाकला सांभाळते. त्यांनी ते पाळणाघराची एवढे पैसे वाचतात. वारंवार मी स्वयंपाक करते .बरीच मदत करते. त्याला काहीच किंमत नाही. माझे ड्रायफ्रूट काढते.नॉनव्हेज खाणे काढावे. मुला जवळ तक्रार केली. मुलगा आता जवळजवळ बायकोचा बैल झाला होता.माझी सासु असं म्हणायची की, माझा नवरा तिचा लेक माझा, बायकोचा बैल झालाय.मला तसंच वाटत होतं. पण मुलगा सुनेच्या आधीन झाला होता आणि मला आता ते सहन होईना.बर चालू होतं. माझा फ्लॅट थोड्या अंतरावर होता .माझी मी थाटात होते पण कटुता आली होती. तरी मी माझं रुटीन आयुष्य तिथे तसंच चालू ठेवलं. रविवारी पार्क मध्ये बसायचं .मित्रमैत्रिणींशी गप्पा मारायच्या. देव

देव करायचा काहीतरी देवाचं वाचायचं, उद्यान उत्सवी  करायचं वगैरे आणि तिथे रविवारी सगळे जण एकेक पदार्थ घेऊन यायचे आणि पार्टि करायचे. आयुष्य छान चाललं होतं पण सुनेला चांगली भारी नोकरी लागली. तिला या नोकरीत पेन्शन आणि मुलाच्या तिप्पट पगार मिळणार होता. फक्त तिला अधिक कष्ट करावे लागणार होते आणि त्या ठिकाणी 3 महीने तीला नातवाला ससाकला नेता येणार नव्हते. झाली कामावर हजर झाली. तीन महिन्याच्या ट्रेनिंगला गेली.तीन महिने माझा पार पिट्टया पडला. पुरतिच वैतागून गेले .जणु काय मी या मुलीची नानी आणि यांच्या घरातील सर्वंट झाले होते. अशीच परिस्थिती झाली. मी मुलाला म्हटलं.

" मी भारतात जाते.तिकडे ह्या दोन्ही फ्लॅटची थोडी काय ती सोय लावायची ति लावते.वील रजिस्टर करते आणि मग नंतर येते."

मुलगा म्हणाला , "आई तू जाणारच आहेस तर  अमेरिकेतला फ्लॅट माझ्या तर नावावर आहे. तिचे(सुनेचे) आई-वडील काही दिवस घेऊन राहू दे कि ! तिथे काही दिवस राहतील ते! तू भारतातून आली की जातील.ती भारतात आहेस तेवढे दिवस व्याही कुटुंबाला इथे राहु दे."

"का ग? तुझ्या आई वडिलांना राहायला त्या फ्लॅटवर होईल?"मी सुनेवर अतिशय संतापाने ओरडले.राग आला आणि हे लोकं नंतर निघाले नाही तर ?त्या नवरा बायकोसह आणि मला राहायला लागेल.आम्हाला तिघांना उतरत्या वेळी तोंड करून एकमेकांच्या सहवासात राहावे लागेल. मी आधी बोलवायला नाही म्हटलं.

“ नाही नाही असं कसं चालेल?त्या फ्लॅटमध्ये ते दोघे घाणेरडे राहतील. तो माणूस गुटका खातो ती बाई पण विचित्र अस्वच्छ भुताटकीचे सारखी वाटते. त्यांना नाही माझ्या फ्लॅटमध्ये राहू द्यायचं.”मी

सुनेने खूप वाद वाढविला.कल्ला केला. खूप भांडण झालं .पण त्या मुळे मन विटले.त्या कारणाने मी भारतात आले .भारतात येतांना सून म्हणाली

“माझं चुकलं मी तुमचं खाण काढायला नको होते.तुम्हाला लागल असेल. माझ्या आई-वडिलांना तिथे राहू द्यायचं तर द्या,नाहीतर आम्ही भाड्याने घेऊ .एवढं काय नाही म्हणता? तुम्ही नव्हता. तिथे जागा रिकामी ठेवून घाण होईल.आपोआप राखली जपली जाईल म्हणून मी माझे आई-वडील तिथे राहतील असं म्हटलं. गैरसमज करून घेऊ नका.” अशा प्रकारे सुनेने समजूत घातली मी पण तशी चतुर आहे. मी पण सुनेला

“ हो ग हो तू माझ्या मुलीसारखीच आहेस. मायलेकींची सुद्धा भांडण होतात.मग भांडणं सासू-सुनेची झाली यात नवल काय ?तू काळजी करू नको.राहु दे तुझे आई वडिलांना! मी भारतात काम उरकते.ते घर विक्री किंवा वील करणे टॅक्स वगैरे चे काम केलं की लगेच हजर होईन. तुझ्या आईला सांभाळ. मला ससाकची फार आठवण येईल.” वगैरे असं मी तिला सांगितले.

मी ठरवले की भारतात आले कि मला आता परत परदेशी जायचं नव्हत. त्या घरी सुनेची आणि मुलाची सत्ता होती. तिची आई वर आली होती. माझा मुलगा तरी शांत होता. पण ससाक फार चिडका होता आणि त्याची आवड पण विचित्र होती .त्यामुळे मी भारतात येताना ठरवलं आपण परत जायचं नाही. मी

भारतात आले मुलांशी मी वर वर गोड,वर वर मायेत बोलत होते. असेही विदेशी वीसा मुळे मला ते सहा महिने तरी इथेच भारतात राहायचं होतं. मी सहा महिने भारतात राहिले मला या दरम्यान एक नवीन मित्र मिळाला.आनंद आला. मी सुनबाईला म्हटलं,

“ मला मित्र मिळाला” सुनबाई म्हणाली

“अहो एखादा मुलगा दत्तक घ्या. वाटल्यास ,त्या बालकाला वाढवा शाळेत घाला .तो घरची तुमची काम करेल. तुमच्या गॅलरीत निजेल. मित्र मित्र करायचं वय आहे का तुमचं ?तुम्ही असे वागाल तर उद्या आमच्या मुलाच्या लग्नाला प्रश्न येईल.” मी ठीक हो तस करते ,बर बर केलं. पण ठरवलं आपल्याला आपल्या मित्रासोबत राहण्याचा आनंद मिळतो ना ,आपण आपल्या मित्रासोबत रहायचं .मात्र दोनही मुलांना सांगायचं नाही .परदेशात राहायला असुन देखील ते फार बुरसटलेल्या विचारांचे आहेत. म्हणायलाच परदेशात राहतात बाकी बुद्धी तर त्यांची गावठाणाची आहे.लबाड आहेत.जायचे नाही अस मनाशी ठरवले.

"परदेशात मी येणार आहे हो "असे म्हणून मी हो हो करून त्यांना न सांगता मित्रा सोबत राहू लागले .मुलगा दत्तक घ्यावा असं माझी बहीणीने पण मला सुचवले.पण कष्टाची सवय नसायची .

“दत्तक म्हणायचं, दत्तक नाही घ्यायचं, गॅलरीत पडेल अर्धा गडी करायचं. त्याला पण राबव.त्याला मृत्यू पत्र करून तुला हे घर देईल, तु माझी सेवा कर ,तू माझी सेवा कर सांगितलं कि बास."

भारतात आल्यावर अर्थात ही कल्पनासुद्धा मला माझ्या मुलाने दिली होती .मोठ्या मुलाची कुणाची कटकट नसायची ते आमच्या भानगडीत पडायचे नाही. आमच्या अर्थव्यवहारात पडायचे नाही .माझ्या पैशाची हाव लहान मुलाला सुटली होती आणि मी मित्राबरोबर राहिले तर पैसे खर्च होतील .काही रक्कम भेट,किंमती डाग ,दागिने किंवा मी काही पैसे या मित्राला देईन आणि सुना मुले त्यांनाही माझ्या मृत्यु नंतर जे डबोल मिळणार आहे ते कमी होईल ,याची त्याला भीती वाटत होती .अमेरिकेतला फ्लॅट तर मी पैसे दिले असले तरी त्या लहान मुलाचे नावावर होता. त्यामुळे त्याला त्या फ्लॅट ची चिंता नव्हती. त्यामुळे भारतातले दोन पैकी एक फ्लॅट विकून टाकावा ,पैसे द्यावे ,अशी त्या मोठ्या मुलाने किरकिर सुरू केली. पण मी मात्र एका मुलाला एक आणि दुसऱ्या मुलाला एक असे दोघांना दोन फ्लॅट किंवा पैसे देणार होते .अर्थात लहान मुलानी माझ्यावर हळूहळू असं मनात पक्क उद्योगाला सुरुवात केली की 'मोठ्या मुलाला त्याच्या बायकोचे भरपूर प्रॉपर्टी मिळणार आहे त्यामुळे मोठ्या ला देऊ नको. तू काय जे द्यायचं ते मलाच दे' या सर्व वातावरणात मी गोंधळून गेले होते. अर्थात मित्राबरोबर माझे दिवस स्वर्ग सुखात जात होते. एके दिवशी मोठा मुलगा फोनवर बोलत.

''काही कारणाने भारतात यायचं ठरवलं''म्हणाला. हा जर भारतात आला तर त्याला मी मित्राबरोबर राहते हे कळलं असतं. धाकट्या मुलाला मी फोन करताना, व्हिडिओ कॉल वगैरे करताना या मित्राला आतल्या खोलीत जायला सांगायची.किंवा तो मित्र हिम्मतीने ,त्याचा तोच शर्ट घालून बाहेर निघून

जायचा.कधी बागेत खुर्चीवर जाऊन बसत असे. त्यामुळे तस आता या दोघांनाही माझं हे मित्राबरोबर राहणं माहिती नव्हतं. पसंत होतं की नाही हा तर प्रश्नच नव्हता कारण या मुलांना हे पसंत पडणे शक्यच नव्हतं .

‘मोठा भारतात येणार’मी वैतागून गेले.येणार अस मोठा मुलगा म्हटल्यावर मला भीती वाटायला लागली .अर्थात लहान लेक त्याला ही भीती वाटायला लागली की आई,एक फ्लॅट मोठ्या मुलाला नावावर करुन द्यायच एई म्हणतीये. कागदपत्र केली आणि ते पैसे काढून दुसरीकडे फ्लॅट घेऊन मोठा स्वतःच्या नावावर घेईल आणि त्याचा घराची कागदपत्र सुयोग्य टायटल क्लिअर करून घेईल.’ दोघा मुलांना भीती वाटायला लागली. दोघांचा जीव प्रॉपर्टीवर तर होता. माझ्या मित्रा बरोबरमित्राबरोबर राहून संसार करण्याला पूर्ण विरोध या दोघांनी चालवला होता.लोक तरुण माणसांना का विरोध करतात ,?कारण कि तरुण वयात माणूस लग्नाचे साठी, प्रेमाने वेडा होतो. वेडं व्हायचं तर कुठल्याही वयात माणूस प्रेमाने वेडा होऊ शकतो .मी ह्या मित्राच्या खुप अधीन झाले होते आणि मला कसंही करून त्याच्याबरोबर राहायचे आहे. मला चांगली भरपूर राखीव पुंजी माझ्याकडे होती. ती ,उरलेले फ्लॅट विकून आणि आईचा आलेला पैसा घेऊन मी अमेरिकेतला फ्लॅट घेतला होता. तरीही दोन फ्लॅट आणि त्या व्यतिरिक्त सुद्धा राखीव कोट्यावधी रुपयांची रक्कम माझ्याकडे होती.रक्कम माझी येत राहिली .तर अशी फारशी खर्च मी करत नव्हते. कुणाला द्यायला माझा हात सोडून कधीच नसतो. कोणाला द्यायचं की मी घरातल्याच प्रेझेंट आलेल्या वस्तूंमधील पडलेल्या वस्तू द्यायची आणि पैसे वाचवायचे. त्यामुळे

रोकडा रक्कम माझ्याकडे भरपूर होती .गेल्या सात-आठ वर्षांपासून त्यांत मी पसारा आवरत घेण्याच्या दृष्टीने लग्नात कार्यात घरात असलेली चांदीची भांडी पॉलिश करून देई. घरात असलेल्या डिनर सेट गिफ्ट दे ,वस्तू दे असे प्रकार सुरू केले होते. त्यामुळे घरातला पसारा पण कमी होत होता. आणि माझे पैसे पण वाचत होते. असे माझ्याकडे भरपूर पैसे सध्या जमलेले असताना मी माझ्या मित्राला म्हणाले,

“ आपण पूर्णपणे अज्ञात अशा गावी जाऊन राहूया.एका खेडेगावात विकत किंवा भाड्याने घर घ्यायचं. सांगायचं तब्येत बरी नसते .डॉक्टरांनी हवापालट सांगितली”मी

“भाड्याने बर”मित्र

म्हणून आम्ही इथे आलो. सुंदर बंगला घेऊन राहायला आलो. आजूबाजूला भग भग असलेल्या मुंबईत नको. काही दिवस काही संबंध नको .

“नाथ.ह्या दोन्ही मुलांची कटकट नको. घरी पैसे द्या मुद्दे, गुद्दे काहीच कटकट नको. माझ्याकडे पैसे आहेत आपण तेव्हा खर्च करू .व्यवस्थित राहू.”मी.

“तुला भीती नाही वाटत ,मी पण तुझ्या पैशाकडे बघून बदलेन” माझा मित्र म्हणाला.

“ हे बघ,तू माझ्यापेक्षा इमानदार आहेस आणि या वयात तुला पैसे घेऊन काय करायचं ?”मी

“माझा मुलगा आणि सून आहेत .मी त्यांना पैसे देऊ शकतो.”मित्र “तुझी एवढी हिम्मत नाही .आपण जीवन आनंदी जगणे पुरतच एकत्र आलो आहोत. आपण या गावी जीव लाऊन राहु”मी

“माझ्या परिचित एका व्यक्तीचा मडगावच्या एका खेड्यात मातिचा बंगला आहे. तरुण असताना घेतला होता आणि आता विकायला काढले. तर जेमतेम पंचवीस लाख रुपयात तो विकत सुद्धा देईल”मी

“विकत घ्यायला पाहिजे का? त्याच्यापेक्षा भाड्याने घेऊन ,काही दिवस राहिले ,नंतर सामान उचललं निघालं .”मित्र

“कल्पना चांगली आहे”मी.

आम्ही त्या मडगाव ला एक बंगला भाड्याने घेतला. खूप सुंदर आयुष्य जगलो जणू काही मी माझ्या आयुष्याची एक बकेट लिस्ट बनवली होती.

सर्व मजा केली.

जे जसे मला काय काय शहरात करायला मिळालं नव्हतं ,जमले नव्हते ते मी तिथे सुरू केलं .

घरी एक पेटी शिकवायला गुरुजी लावले ते घरी येऊन पेटी शिकवत. तिथल्या मंदिरात मी महिन्यातून एक प्रवचन करत असे. सगळे लोक मला माझं खरं नाव माहीत नाही तरी, माई म्हणून माझं कौतुक करत असत. तिथे आम्ही आमचं स्वतःचं नाव खरं सांगितलं नव्हतं. आणि कुक्कडगाव असल्यामुळे भाडे करारनामा नोंदणीकृत करणे वगैरे काही प्रकार नव्हता. भाड दिलं की झालं.

डिपॉझिट आणि दहा महिन्याचे भाडे देऊन आम्ही या घरात राहत होतो. जीवनाचा खरा आनंद आम्ही इथे घेतला.एकदा बहिणीचा फोन आला बहिण म्हणाली

“ कुठे आहेस?”

मी सांगितलं तिला,

“ मी वृद्धाश्रमात राहायला आलेली आहे.मैत्रीण पण एक तिथे राहते.” मुलं विचारतात ,

“कुठे आहेस?” मी सांगितले

“ हो आहे मी वृद्धाश्रमात एकटीच राहायला आलेय.” प्रत्यक्षात मी आणि माझा मित्र आम्ही हे जीवनाचा आनंद घेत होतो. मुलगा सुचवतो,

“ आई एखादा मुलगा दत्तक सारखा घे .दत्तक म्हणजे काय ग पंखाखाली घ्यायचं .किरकोळ मदत करायची. तोंडाने गोड गोड बोलायचं आणि त्याला म्हणायचं तू माझ्या मुलासारखा .दोन मुलांना असं दिलं तसं तिसरा भाग तुला देईन .तुला दागिने देईन .तुझं लग्न करून देईन आणि त्याची सेवा घे”

“ अच्छा तसं करीन.”मी

“ वृद्धाश्रमात काय राहायचं ?तुला इतके स्वातंत्र्य ची सवय झालीय. वृद्धाश्रमातील एका खोलीत तू कशी राहशील? राहते, तडजोड करत, माझ्या वयाच्या बायका सोबत येतात. त्यांच्याशी गप्पाटप्पा होतात. वातावरण चांगले

निसर्गरम्य मिळते राहते.” असं मी मुलाला सांगितले. दोन्ही मुलांना माझ्या वागण्याचा संशय येत नाही.

“ये आणि परत यायचे का आई?” असं धाकटा मुलगा विचारे. अर्थात त्याच्या इतक्या विचारण्यात आग्रह नव्हता. मी आलीच पाहिजे असं काही त्याचं म्हणणं नव्हतं. तीन वर्ष झाले मी या मित्राबरोबर खुश होते.पण हा कंजूस मित्र एक मिठाई, बिस्किटे ,भेट आणत नसे.संबंधात तोच तो पणा आला.तसे आमचं चांगलं सहजीवन चाललं होतं पण मला बदल हवा होता.एकदा भांडण झाल.

“माझी बायको देवी होती”तो.

“मी मैत्रीण आहे”मी

“स्त्री अशी असते?”तो.

“का?मजेचा हक्क काय पुरुषांना फक्त आहे का?”मी

“मी तसा नाही”तो

“घरी सुनेची आई सोबत आहे ना!”मी

“माझा काही संबंध नाही.ती घरात राहते”तो

“राहू दे.सोडा.मी रागात बोलले”मी

पण तो खूप नाही ,पण काहीसा गप्प झाला. नंतर तरी पण मला त्या मित्राचा कंटाळा आला. मी परदेशी मजा बदल हवा म्हणून जायचं ठरवले.बरे झाले ह्या मित्रानेच दिलेला सल्ला मानला, की ‘भाड्याने घेऊया म्हणजे कटकट

राहत नाही’. तो सुकाळ संपला.मी निर्णय घेतला.जायचे.व्हिसा तिकिट मिळाले. गाषा गुंडाळून भाड्याचं घर सोडून आम्ही मुंबईला आमच्या घरी आलो.

मी त्या मोठ्या मुलाला फोन केला.त्या मुलाला म्हटलं

“काही काळ मी तुमच्याबरोबर राहीन. तुझी मुलांना सांभाळण्याची सोय होईल. तुझ्याकडून धाकट्या कडे जाईन. मी सहा महिन्यासाठी येते आहे.”तो म्हणाला “ईथे नको येवु”

धाकटा फोन करताच म्हणाला

“आई अग त्या दुसऱ्या फ्लॅटमध्ये हीचे आई वडील राहतात .”

“राहू दे मी तुमच्या सोबत राहील एवढं मोठं घर तुमचं ,मी वरच्या खोलीत राहीन.”मी

आता मला बदल हवा होता.मित्र मी बदलले होते .आता मला माझ्या माझ्या आनंदाची सुखाची चव लागली होती आणि काय एखाद्या वर्षी राहुन ,मजा करुन गिफ्ट,ट्रीप काढून परत मी भारतात येईन.येऊन परत या मित्राबरोबर पण राहू शकत होते .मला जीवनाची एक वेगळी नस सापडली होती.त्याच त्याच चौकोनात वावरण्यापेक्षा मला आनंददायी वेगळा कोन हाती लागला होता.तर मी परदेशी जाणार म्हणून माझा मित्र हवालदिल झाला.असं दाखवत होता. बावळट आहे. मागच्या वेळी पण मी परदेशात गेल्यावर त्याला फोनवर ब्लॉक करून टाकलं होतं आणि भारतात आल्याबरोबर परत परत त्याला ‘ आय मिस यु, मिस यु’ केले.मध दिसल्याबरोबर बावळट कुत्र्याने धावत याव,शेपूट हलवतो

तसं माझ्या जवळ आला होता. आता पण मी अमेरिकेत तिथे गेल्यावर याच्याशी संबंध ठेवणार नाही .कारण देईन,माझ्या मुलांना ते आवडत नाही .मात्र परदेशातून मी अधिकच आनंदी होऊन येते .सुदैवाने मला तब्येतीचा काहीही प्रॉब्लेम नाही .तसा माझ्या मित्राला पण नाही .आम्ही जुनी खोड मजबूतच आहोत. नखात रोग नाही त्यामुळे आम्ही जीवनाचा आनंद अधिक चांगला घेऊ शकतो. आमच्या मानाने तर आमची मुलं रडकी आहेत. त्यांच्या तब्येतीचे अधिकच प्रश्न आहेत.मी आनंदी,परदेशी होऊन येते.मी तरुण आहे.लोक म्हणतात माझे वय दिसत नाही .सुदैवाने मला तब्येतीचा वयाचा काहीही प्रॉब्लेम नाही. तसा माझ्या मित्राला पण नाही. आम्ही जुनी खोड मजबूत आहोत. नखात रोग नाही त्यामुळे आम्ही जीवनाचा आनंद अधिक चांगला घेऊ शकतो. आमच्या मनाने मुलंच रडकी आहेत. त्यांच्या तब्येतीचे 17 प्रॉब्लेम आहे .परदेशातून परत आल्यावर परत मी या मित्रा जवळ राहीन.

दूर, चांगले निसर्गरम्य ठिकाण आणि सिमला मनालीलाच भाड्याने खोली घेऊन राहणार आहे. पैशाचा कुठे प्रश्न आहे? जगायचा आनंद घ्यायचा.जुन्या पिढीतली सुद्धा आधुनिक विचारांची आम्ही काही जुनी खोड आहोत.मजा हेच औषध असते.घर पाहत ‘मेरा घर मेरे बच्चे’,रडकी आई ‘माझी मुलं माझ्यासाठी’असे मी म्हणत नाही. एवढा त्याग करावे अस मला वाटल नाही. मी नवनायिका आहे.आधुनिक आहे.रडकी मी वागले नाही.मुलात मी गुंतले नाही. आम्ही आमच स्वतंत्र आयुष्य थाटात जगतोय. ही आमची वेगळी मुक्त वर्तुळ आहेत.नवी मुक्त व्यवस्था आहे.कटु वाटु शकते पण सत्य आहे .

आज त्या जुन्या  पान्या चौकटीतून हे वृद्ध सुद्धा कधीच मोकळे झाले आहेत.चारही कोन ,योग्य अंतरावर खूष आहेत.

मी आधुनिक वृध्दा पण मनाने तरुण आहे.

*********

# खजिना विहीर

एक रहस्य ,प्रत्येक गोष्टीत असतं .मला अशा शक्तीचा त्रास झाला आहे का?हो स्वतः ला अनुभव आला .पूर्वी वाचले आणि नंतर एका चित्रपटात पण मी तो बघितले की एका बागेतील ,सफरचंद किंवा फळ खाल्ल्यावर काहीतरी विचित्रच वाटायचं.फळ अतिशय सुमधुर होती .पण काहीतरी काळा दोष असावा .मला पण खजिनाविहीरी जवळपास एकदमच भावना ,विचित्र कल्पना येऊन घाबरवु लागल्या.आपण वेडे झाले की काय ?

या जिल्ह्यात दोन खजिना विहीरी आहेत.

एक काडे आजीचे बागेत आहे.दुसरी मी ज्या शाळेत शिक्षण पूर्ण केले होते तिथे आहे.

तर काडे आजीचे वाडी धम्म कुमारीचे शिबीर भरवले गेले होते.तिथले झुकिनी असे फळ खाल्ल्या नंतर मी स्वतःला खोलीत कोंडून घेतले. शिबिराला आलेले 95 टक्के लोकांना तसा त्रास झाला.त्यां खजिना विहीर वाडीत ,बागेमध्ये थोडं फार आकर्षण वाटाव अस काय होते?

असतं .त्यामुळे तिथल्या त्या बागेतील खजिना विहीरीबद्दल एक प्रकारचा उत्सुक भाव होता.त्या जागी राहायला मिळाले तर मजा येईल अशा भावनेने शिबिराला लोक जमले होते.या आमराईत एका घरात आजी राहत होत्या.फक्त चहा व बिस्किट विकत.आजी बद्दल कल्याणकारी भावना होती, म्हणून लोक

येत होते. आजी कित्येक वर्षापासून एकट्याच राहिल्या .मोठी आमराई होती .नारळाची झाडे होती .लहान मुलांना रमण्यासाठी बऱ्याच गोष्टी होत्या .पेरूची पण झाड बहरली होती.

टोकिओ मधल्या एका चहा वाल्याची गोष्ट आजी नेहमी सांगायची.त्याचं टोकियो त मिड नाईट डिनर रेस्टॉरंट होतं. तिथे तोच शेफ म्हणून काम करायचा. खरं तर तोच मालक होता, पण तो कुक सुध्दा होता . माणसं तिथे यायची ते काहीतरी खायची आणि पुढे जायची  पण  त्याचे हॉटेलचे   जेवण झाल्यावर गप्पा मारत बसत, पुन्हा परत येत.

Tokyo midnight dinner वाला डोक्यानेअजून काहीतरी सटकला आहे .असं देखील लोक म्हणायचे.

आजी बद्दल पण अस लोक म्हणतात. कारण की आजी गाय बाहेर लावत नसत .गोठ्यात लावत नसत. घरात या गाईला सोबत घेऊन झोपत असत. त्या गाईला आजी आपली मुलगी मानत.हॉटेलातया गाईचे दुधाची चहा मिळे.

नवर्या सोबत बरेच वर्षांचा आजीनी संसार केला होता  .त्यामुळे त्या काळात यांच्या काही अनुभव सुद्धा सांगायच्या. "मालक चांगले होते पण एकदा,माझ्या आईबद्दल काहीतरी विचित्र बोलले.मी चिडले आणि मालक माझ्या मनातून साफ उतरले . मग मी माझे या मालकांना असलेले आशीर्वाद काढून घेतले . मला असं वाटलं हा माझा नवरा आहे, पण हा मला त्रास देतात .अशा त्रास देणाऱ्या व्यक्तींचं भलं होण्यापेक्षा मला माझं भल करणे आवश्यक

आहे .माझे आशीर्वाद मी मग त्यांच्यावर फुकट घालवणे सोडले.तेव्हापासून मी रोज देवाला म्हणायला लागले.

"देवा,नवरा भांडण करतो. तेव्हा माझं काय भले तुला करायचं ते कर "आजी ही गोष्ट फिदीफिदी हसत सांगत असत.मला वाटले मी एकटी मजेत जगावे .पण नवरा वारल्यावर मला एकट वाटु लागले.गाय होती.कुत्रा पाळला.देवळात पूजा करते.

धम्मकुमारी शिबिराला होतात.खजिना विहीर बघायला लोक येतात.वेळ जातो"

आजीच्या बोलण्यात बऱ्याच मैत्रिणीचे उल्लेख असे.त्यात सुखमणी, आनंद ,मंगला, मैत्री अशा नावाच्या मैत्रिणी त्यांना खरंच होत्या की त्या काल्पनिक होत्या मला काही ते कळायचं नाही . त्याचवेळी आम्हाला एक वेगळं प्रोजेक्टचं काम आलं होतं .ते काम मला झेपेल की नाही ते मला समजत नव्हतं .आम्ही एका शाळेच्या माजी विद्यार्थिनी होतो . त्या शाळेतून पास होवून शाळा सोडून सुद्धा आता पुष्कळ वर्षे झाली होती .पण त्या शाळेत देखील काहीतरी काम सुरु असायचं. शाळेला शंभर वर्ष झाली होती शंभर वर्षापूर्वी ही शाळा बांधली ती ,तिथे तुरुंग होता म्हणे.बागेत जिल्ह्यातील दुसरी खजिना विहीर आहे .

एकूण त्या गावातच काहीतरी होतं की गूढ वाटायचं . काही जागी आनंदी वाटतं काही जागी वाटतय तिथून पटकन निघून जावं .तसं या काडे आजींच्या बागेत खूप खुश वाटत असे. तरीदेखील काहीशा त्या वास्तू मधून मिळणाऱ्या

विचित्र लहरी पण मला अस्वस्थ करत असत. पण तरीही कुठलीही ओढ आम्हाला काडे आजींच्या बागेत बोलवून नेत असे.

आजीचे चहा शॉप मधून, चहा बिस्किटे खाणं-पिणं इथे गोष्टी संपत नव्हत्या. माणसं तिथून काहीतरी वेगळी भावना पण घेऊन जायचे. या नवल कारी देवळाच ,भयगोष्टी सारखं बागेत सुद्धा काहीतरी आहे असं मला नेहमी वाटत असे.

उभी मारुती मूर्ती होती. काडे आजी वेगवेगळी पुस्तकं वाटायच्या.त्या आम्ही ज्या शाळेत शिकलो तिथे शिकलेल्या होत्या. तसेच सुशिक्षित होत्या.

"रसिक हो ऐका.सांगते आहे मराठी मनांना जोडणारा पूल बांधला, त्या पु ल देशपांडे यांच्या कथा मला सांगायच्या आहेत."अस बोलत.

एकदम बकवास वैतागेल असं कधीही बोलायच्या नाही. काडेआजी गोड गोड गाणी पण म्हणून दाखवायची. त्या आजीचं गाणं मला काही आठवतं.

आजी तुझा किती ग छान छान स्वयंपाक !बाबांच्या हातचा स्वयंपाक भयानक!

कधी कधी जेवण लूई भारी पण लागते.

नंतर कळते,ते जेवण हॉटेलातून येतं.

तर या दोन खजिना विहीरी बद्दल काम करायचे काम शाळेतील माजी शिक्षिका गद्रे मॅडमनी दिले.इच्छा नव्हती पण टाळू शकलो नाही.

.प्रत्येक गोष्टीत काही ना काही प्रमाणात धोका असतो. कधी दिसणारा कधी न दिसणारा ! माणूस हा नेहमी परिस्थितीचा बळी ठरत असतो. प्राप्त परिस्थितीत सर्कमस्टन्स वरून आपण निर्णय घेतो. तो निर्णय बरोबर असतोच असे नाही. त्याप्रमाणे सर्व प्रकारच्या धोक्यांचा विश्लेषण करून आम्ही त्या शाळा कम जेल जवळ जायचे ठरवले.

आजी भटकत एकदा गाव पण तिथल्या साईबाबाच्या मंदिरात गेलो. श्री साई महाराज नेहमी असं म्हणत

कि माझ्यासाठी इथे कोण येतो?

परंतु जो माझ्यासाठी इथे येतो,

त्यावर माझे तेवढेच प्रेम आहे

कि जो स्वतःसाठी पण येतो.

पण खूप अंधारी जागा होती.मला भिती वाटत होती. कोरोना महामारी चे दिवस आहेत.

फांद्या जर राहिल्या तर पानेही येतील.

हे दिवस वाईट आहेत

म्हणून काय झालं...

चांगले ही दिवस येतील..!

stay home - stay safe

आईचे *नात*

कोणतही नात हे वरवरच्या संभाषणावरुन किंवा प्रसंगानुरुप होणाऱ्या संवादावरुन कसे आहे हे कधीच ठरवू नये. कारण माझे बाबा नेहमी म्हणायचे की देवाने सासू-सून, नंदण-भावजय हे नाते कसे बनवले आहे?कसे हेच कळत नाही. मला ही त्यावेळी वाटायचे की बाबा आता फिलाँसाँफी झाडतात. मग मी पण एक कानाने ऐकायचे व दुसऱ्या कानाने सोडून द्यायचे.

हळूहळू जीवनात काही नात्यांचा अभ्यास करु लागले आणि बाबांना त्यावेळी काय सांगायचे होते याचा अंदाज येऊ लागला.

"अध्यात्म म्हणजे आधी स्वतःला पृथ्वी तत्वाची जोडा." मॅडम आम्हा चार मैत्रिणींशी व्हिडिओ कॉल वर बोलल्या. काम करायला ,आम्हाला सांगायचं हे जणुत्यांनी मनात पक्कं ठरवलेलं होतं .

काही झाले कि काय तर मी धावत या आजीचे घरी,या जागी जाई.मी खजिना विहीर ने एकदम भारलेली गेले होते .आणि हो मी या शाळेत कामाला आले तरी सुद्धा मी आजीला फोनवर सांगायला धावत तिकडे जात असे .

एक उभा मारुती त्या आजीच्या बागेत होता. आणि तिथे या तिरळ्या डोळयांची आजी बसलेल्या असायच्या. हे शाळेत म्हणजे तिथल्या तुरुंगातील चौकशीच काम तेव्हा मला मिळाला तेव्हा मला कसे तरीच वाटायचं.

मी आजीला म्हणायचे ,"आजी अहो आम्ही वृद्ध आहोत .तरुण मुलींना त्यांनी हे काम द्यावं"मी आजीजवळ म्हणाले.

" अगं तरुण मुली नोकरी करतात, त्यांना रजा लागते .तुम्ही रिकामे आहात तुम्ही करा ."

आजी आम्हाला म्हणाल्या.

"आजी झेपत नाही. तब्येत बघा .करोनाच भय, बघा" मी म्हणायचे .

आजी म्हणायची

" मॅडम नी सांगितल आहे. तुम्हाला तर सुरुवात करा .प्रयत्न करा"

मी घरी सांगितलं .नवरा म्हणाला.

" फुकट हमाली कशाला करते? काम नाही काय?"

मुलाला विचारले तर, मुलगा म्हणाला

" आई काही जागा पण खंडहर आहेत. तुझं वय काय ?आता तू काय करते?risk बरे वाटते का?"मुलगा मला म्हणाला. तरीही मी बॅग भरली.

"काम लावायचा काय होतं ?एवढं आम्हाला झेपेल का मॅडम?" मी परत सांगून तिथे जाणे टाळले .

"अगं मास्क लावायचा सॅनिटायझर वापरायचं अंतर सुरक्षित ठेवायचं.मग काही होत नाही "मॅडम म्हणाल्या

" तरीपण कोरोना पसरला ना "माझा मुलगा मॅडम शी वाद घालत म्हणाले.

" मी माझ्या आईला पाठवणार नाही. मी येणार नसेल तर आपलं टळले.म्हणून बाकीच्या मैत्रिणी ही खूष झाल्या. मात्र अचानक काय झाल माहिती नाही. मुलगा म्हणाला

"मला असं वाटतं तू उद्या जाऊ शकतेस. तुझी इच्छा ,तुला जायचं असेल तर जा आई !काही काम करायला परमेश्वरच काही व्यक्तींना निवडतो तसं कदाचित तुला हे काम करायचे साठी देवाने निवडले असेल. तू जाऊ शकते." माझा मुलगा मला म्हणाला.

" ठीक आहे. जाउ या" असे मी म्हणाले . कन्या आई,पुत्र माता यांचं नातं वेगळ असतं.

थोडा वाद असला तरी प्रेम असल्यामुळे असेल काहीतरी नाळ एकमेकांची जोडलेली असते . या जुळलेल्या नाळे मुळे एकमेकांचे धोके कळत असले, तरीही अतिंद्रिय शक्ती कडून येणारे संदेश सुद्धा समजत असतात. तर मुलगा हो म्हणाला आणि आम्ही जायला निघालो .माझ्या आणि माझ्या आईचं पण खुप प्रेम होतं उदा. द्यायचे तर...

माझी आजी व आई दोघीही स्वभावाने एकदम भिन्न. माझी आजी शिकलेली नव्हती परंतु एकदम प्रॅक्टिकल होती. कोणती ही छोट्यातल्या छोटी गोष्ट का घडते याच वैज्ञानिक, सामाजिक, व्यावहारिक तर्कशुध्द ज्ञान होते. आई शिकलेली, बाहेरच्या जगात वावरणारी, टिपिकल दहा ते सहा नोकरी करणारी मध्यमवर्गीय विचारांची होती.

दोघीं आपआपल्या विश्वात तरबेज परंतू कधी दोघींच भांडण झालेल, मी कधी ऐकल नाहि की पाहिले नाहि. दोघांचंदोघींचं एकमेकांवरएकमेकींवर प्रेम पण आणि विश्वास पण आणि आदर पण होता.

आई कामावरुन घरी यायच्या आधी आजी माझ्याकडून जी मी कामे करु शकते ती करुन घ्यायची. तसेच स्वःता गहू साफ करुन दळण काढणे, तांदूळ फाखडून ठेवणे, भाज्या साफ करणे इत्यादी कामे करुन ठेवत असे. तीने घरात काम करावे अशी कोणती जबरदस्ती नव्हती परंतु आपली सून कामावर जाते. सकाळची घाई घाईत कशी निघते. दिवसभराने घरात येते, याच पक्क ज्ञान तीच्याकडे होत.

आजीला घड्याळ वगैरे कळत नव्हते. परंतू तीने घड्याळ्याचे काटे कोणत्या ठिकाणी आले की आई कामावरुन घरी परत येते याची खूणगाठ बांधून ठेवलेली होती. घड्याळाचा काटा पंधरा-वीस मिनिटे (तिच्या अंदाजाने काट्याची पोझिशन बदलणे). पुढे गेला की मागच्या रुम पासून आमच्या गँलरी पर्यंत फेऱ्या मारत बसायची. सारखी बाहेरच्या गेटवर (बोगदा) लक्ष देऊन राहायची. आजू इला नाय ता...असे वाक्य बडबडायची.

आई दादरला गेली तर तिला यायला उशीर व्हायचा. त्यावेळी संपर्काचे साधन काहीच नव्हते. चाळी बाहेरील वाण्याकडे काळा फोन होता तोच एक काय तो सर्व चाळीचा संपर्क बिंदू होता. आणि वाणी थोडाच १९० खोल्यातील लोकांचे निरोप देत बसणार होता. फक्त कोणाचे काहि अघडीत घडले तरच वाणी आपल्या नोकराला घरी पाठवून निरोप द्यायचा. त्यामुळे एखाद्याची वाट

बघत बसणे, सुध्दा एक प्रेमाच प्रतीक होत. (मोबाईलमुळे आताच्या पिढीला याचा अनुभव मिळणार नाही) .

आई ही कामावरुन घरी येताना नेहमी खाऊ आणायची. गाजरवडी, श्रीखंडवडी, दूधीवडी, फळे, बिस्कीट इ...नेहमी खाऊ असायचेच. आई आली की, खाऊ आजी जवळ द्यायची आणि आजी तो खाऊ दहा ते बारा जणांना समप्रमाणात वाटून घ्यायची त्यात आम्ही सातजण, मामा-मामी पाचजण.

परंतू आजी व आई मध्ये एक आतंरीक प्रेम मी अनुभवलेले आहे. दोघीही कधी कोणत्या गोष्टीवर चर्चा, वाद-विवाद करताना पाहिले नाहि. परंतू दोघी एकमेकींना न काही बोलता समजून घेत एकत्र वावरत होत्या, ते आजमिती पर्यंत मी कोणत्याही सासू-सूनांबद्दल पाहिलेले नाहि. दोघी कधी एकमेकींना किंवा एकमेकांच्या गुण-दोष विषयी बोलत नव्हता. दोघी एकमेकांच्या गरजा ओळखून एकमेकांना सांभाळून घेताना मी तरी बघितले आहे.

आता तशी परिस्थिती राहावी हीच माझी अपेक्षा.

नंतर नंतर माझ्या आजीला ऐकू पण येत नव्हत की, ती काय बोलते किंवा करते याचेही भान नव्हते. आणि आजीला व्हरटी- गोचा प्रॉब्लेम झाला तर ती सतत झोपून असायची. परंतू माझी आजी कधीच खाली जमीनीवर झोपली नाहि. त्यासाठी आईने सिंगल बेड आणला. त्यावेळी खोली पण दहा बाय दहाची आणि त्यात घरात ऐवढी माणसे तरी तो बेड आतल्या खोलीत म्हणजे किचन मध्ये होता. विचार करण्यासारखी गोष्ट आहे की, खोल्या एवढ्या लहान होत्या परंतू घरातील प्रत्येकाचे स्थान हे अबाधित होते. आता जेवढी मोठी घर

परंतू घरातील वृध्दांनचे स्थान नसते. त्यात चाळीतील छोट्या घरात, माणसे एकमेकांना जपत राहत होती.

बागेत पाचुकवडा,नीलपंखी चास,चिमण्या होत्या.पक्षी रंगीत तर आवाज सामान्य उदा.मोर,

पक्शी साधा पिसारा वाला,गवय्या.भेटता आले नाही तर बोलुन संपर्क साधतात.सर्वांना आपापले जगु द्या.अनुकुल परिस्थितीचे शोधात जाऊ द्या.

आपापले जीवन जगायचे.

परंतु एवढे असताना आजी कधीच आईला उलट बोलली नाही की आई तिच्यावर कधी रागवलेली मी पाहिले नाही.

आता मुलांना भानच नसते की मी कोणाला काय बोलतो ते. ज्या मुली ट्रेनमधून नोकरी साठी जातात, त्या जश्या त्या ट्रेनमध्ये सर्व वयोमानाच्या स्त्रिया बरोबर वागतात तश्याच त्या घरी वावरतात. पूर्वी आम्हाला घरच्या वडिलधारांन बरोबर बोलताना जरा जरी उध्दट आवाज वाटला तर सरळ मुस्काट फोडले जायचे. आईचा सहभाग मोठ्या प्रमाणात असायचा त्यामुळे प्रत्येकाच्या गालावर आईच्या हाताची नक्षी यायचीच.

ठीक आहे काळ बदला आहे. काळ बदला तर मी किती व कशी बदली पाहिजे हे प्रत्येकाच्या हातात आहे. नात टिकवले तर टिकते .परंतू दोन्हि बाजूने नीट व्यवस्थित साद-प्रतिसाद आला पाहिजे.आई नुकतेच वारली.

मॅडम परत एकदा व्हिडिओ कॉल वर आमच्याशी बोलल्या आणि त्यांनी सांगितलं की

"आमच्या सोबत या कार्यशाळेत आशिश पण हजर झाला आहे. आशिश चे आई वडील वारले होते. त्याच्या सर्व बहिणींनी लग्न केली होती. तुम्ही बायका बायका जाणार आहात तर तुमच्या सोबत मी आशिशला पाठवला. आशिष चे लग्न केलेलं नाहीये .तो एकटाच आहे. त्यांनी आपलं जीवन धम्म कुमारीला वाहून घेतलेले आहे .तो तुमच्या मूळ केंद्रावर डोंगरावरील त्या कुमारीच्या ठिकाणी जाऊन राहि.तिथली सेवा देई."

आशिष आठवत होता. तो देखील ज्या शाळेत आम्ही शिकलो त्या शाळेचा विद्यार्थी होता.

नव गावात आशिष राहायचा . किराणा दुकान चालवायचा.शिबिराला पोचलो.

आशिश भेटला .दिसायला तुलनेने तरुण आणि देखणा होता अशा मुलाचं लग्न का झालं असावं असा विचार माझ्या मनात आला.

" आपण पोटापाण्यासाठी काय काम करता?" मी त्या आशिषला विचारलं

"किराणा दुकानात सामान भरायचे .बरेच कुटुंब किती उधारी घ्यायचे.ही सेवा देऊ लागलो .ज्येष्ठ नागरिकांना घरपोच पदार्थ देऊ लागलो .अपत्य विचारत नाहीत त्या कुटुंबांना मी जवळ केलं. कारण मला स्वतःला कुटुंब नव्हते. कुटुंब बहीण व. होते. स्वकुटुंब नव्हत."

"हे  जग कुटुंब आणि माझे कुटुंब The best translator is the one who can translate silence.

Instead of focusing on what's going wrong in your life, take a moment to acknowledge what's going right. This shift in perspective will give you the power you need in order to attract more of what you desire to feel."आशिश

"Laziness is nothing more than the habit of resting before you get tired" नव्या शिबिराला जमलेल्या मॅडम म्हणाल्या.

"One morning she woke up differently. Done with trying to figure out who was with her, against her, or walking down the middle because they didn't have the guts to pick a side. She was done with anything that didn't bring her peace. She realized that opinions were a dime a dozen, validation was for parking, and loyalty wasn't a word but a lifestyle. It was this day that her life changed. And not because of a man or a job but because she realized that life in a way too short to leave the key to your happiness in someone else's pocket."मी ईंग्रजी त वार्तालाप केला.

"येत्या दहा-पंधरा दिवसांमध्ये एक आधीची पिढी हे जग सोडणार आहे. कटू असलं तरी हे सत्य आहे, कारण हे जग कोणी थांबवू शकत नाही. या पिढीतले लोक थोडे वेगळे आहेत !"मैत्रीण

"सकाळी लवकर उठणारे, रात्री वेळेवर झोपणारे, पाणी वाया न घालवता झाडाला घालणारे, फुलं देवासाठी तोडणारे, रोज पूजा करणारे, मंदिरात एखादी फेरी मारणारे, रस्त्यातून भेटणाऱ्याची आस्थेने चौकशी करणारे, दोन्ही हात छातीशी नेऊन नमस्कार करणारे, अन्न- धान्य वाया जाऊ नये म्हणून बेतानेच स्वयंपाक करणारे ; आणि तरीही उरलं तर गरीबाला देणारे किंवा दुसऱ्या दिवशी त्याला नटवून मिटक्या मारत खाणारे! पाहुणे-रावळ्याची स्वतःची गैरसोय असूनही पाहुणचार करणे, आपापले सण धांगडधिंगा न करता साधेपणाने साजरे करणारे, व्यसन करताना लाजणारे आणि समाजाच्या नजरेची भीड बाळगणारे, जुना झालेला चष्मा तुटला तर चिकटवून, जुनी चप्पल फाटली तर शिवून आणि जुना बनियन गलितगात्र होईपर्यंत वापरणारे, उन्हाळ्यात पापड वाळवणे, हात दुखेपर्यंत कुटून मसाला घरी बनवणारे, फक्त बाहेर घालायच्या कपड्यांना इस्त्री करणारे, खिशातला पैसा जपून वापरावे आणि शक्यतो घरीच जेवणारे !असे लोकं आता हळूहळू हे जग सोडून चालले आहेत! "आशिश

"ते जातील तेव्हा एक महत्वाची शिकवण त्यांचेबरोबरच जाईल!समाधानी, साधे, अर्थपूर्ण , दुसऱ्यांना प्रेरणा देणारं आणि समोरच्याची काळजी करणारं जीवन जगायचं असतं ही शिकवण ह्या जगातून कायमचीच नाहीशी होईल!"शिबिराचे शिक्षक.

"त्यानंतर राहील फक्त स्वार्थ, अविश्वास, चैन,वखवख, असंवेदनशील मन, भकास कोडगेपणा आणि मोबाईलवर कृत्रिम अगत्य,असं सारं आभासी तथाकथित जीवन!!आज आयुष्यात अवास्तव आहे.अपेक्शा,चंद्र धनुष्य आकाश प्रिया अशी स्वप्न पाहुन मानव दुखी होतो.हेच सत्य आहे!"नवीन मॅडम

विनोद सांगा.

"आपण कशाला प्रयत्न करायचा*,

त्याला करू दे बे,वो बिलकुल पागल है. "एक

"मी ज्योतिषी आहे.ते एक शास्त्र आहे.

असे,डॉंक्टर... तपासणारा तोच.. रोग काय झालं सांगणारा तोच

औषधही देणार तोच.तसा ज्योतीषी तोच उपाय सांगतो तो तोच ,हा पण धंदा नाही का ?लोक जातातच ना ?"ती.

मी वाचनालयात वाचत बसले.

SOCIETY HISTORY & CULTURE

HISTORY & CULTURE

A house of history in Thoothukudi.

आमची आजी होती. वय वर्षे 82 वर्षे. ती खूप प्रेमळ होती. सर्वांचे

लाड करी.टी.व्ही.चे खूप वेड होते. सिरीयल तिला आवडत.घरात तिचा सर्वांना तिचा आधार वाटे.

ती सर्वांची काळजी करी.  तिच्या कॉटखाली एक जुनी पेटी होती. त्या पेटीला ती कोणाला हातलाऊ देत नसे.कोणासमोर उघडत नसे.तिला तिने कुलूप लावून ठेवले होते. एकटी रात्री दार लावून पेटी उघडून बसे.

आम्हाला त्या पेटीची खूप उत्सुकता होती. काय असेल तिच्या पेटीत?सर्वांना वाटे पेटीत दागदागिने व पैसे? काय असावेत.पण ती कोणाला काही दाद लागू देत नसे.

कालांतराने ती अल्पशा आजाराने गेली. ती गेल्यावर आम्ही तिची पेटी उघडली. काय होते त्या पेटीत?

त्या पेटीत तिचा शालू ,डबीत मंगळसूत्र व अंगठी होती. एका बाॅक्समध्ये आजोबांचा चष्मा,कवळी,घड्याळ व इनहेलर या वस्तू होत्या. आजोबांच्या चपला होत्या लग्नातील फोटो होते. आजोबांनी तिला लिहिलेली पत्रे होती. ह्या सर्व गोष्टी तिने जपून ठेवल्या होत्या.

रविवारी सुट्टीत शहरातून पत्रक आणायला गेलो.कार बिघडली.

बंद पडलेली कार रस्त्यावर लावून, मी बस मधे चढले तर खरं. पण आतली गर्दी बघून जीव घाबरला. बसायला जागा नव्हती. तेवढ्यात एक सीट रिकामी झाली .पुढचा एक जण  सहज तेथे बसू शकत होता ....पण त्याने ती सीट मला दिली.

पुढच्या stop. वर पुन्हा तेच घडले. पुन्हा आपली सीट त्याने दुसऱ्याला दिली. आमच्या पूर्ण बस प्रवासात हा प्रकार चारदा घडला.बर हा माणूस अगदी सामान्य दिसत होता, म्हणजे कुठे तरी मजदूरी करून घरी परत जात असावा ,आता शेवटच्या stop. वर आम्ही सर्व उतरलो.

तेंव्हा उत्सुकता म्हणून मी त्याच्याशी बोललो. विचारले की

" प्रत्त्येक वेळी तुम्ही तुमची सीट दुसऱ्या ला का देत होता ??" तेंव्हा त्याने दिलेले उत्तर हे असे

"मी शिकलेला नाही हो. अशिक्षित आहे मी .एके ठिकाणी कमी पैशावर काम करतो . आणि ,पण माझ्या जवळ कोणाला द्यायला काहीच नाही. ज्ञान नाही , पैसा नाही.तेंव्हा मी हे अस रोजच करतो. हेच मी सहज करू शकतो.

दिवसभर काम केल्यानंतर अजून थोड्या वेळ उभं राहणं मला जमत.मी तुम्हाला माझी जागा दिली. तुम्ही मला धन्यवाद म्हणाला . त्यात मला खूप समाधान मिळाले मी कोणाच्या तरी कामी आलो ना त्याचे .कोणाला कायतरी दिल्याच. असं मी रोज करतो .माझा नियमच झाला आहे आणि रोज मी आनंदाने घरी जातो."उत्तर ऐकून मी थक्क झालो. त्यांचे विचार. व समज बघून याला

अशिक्षित म्हणायचे का?

काय समजायचे ?कोणाकरिता काही तरी करायची त्याची इच्छा ,ती पण स्वतः ची परिस्थिती अशी असताना .मी कशा रीतीने समाजाला मदत करू शकते??

त्याने शोधलेला उपाय बघून देव सुध्दा आपल्या या निर्मीती वर खुष असेल

.माझ्या सर्वोत्तम कलाकृती पैकी ही एक कलाकृती . असं दिमाखात सांगेन.

त्याने मला खूप गोष्टी शिकवल्या स्वतः ला हुषार शिक्षित समजणारी मी त्याच्या समोर खाली मान घालून स्वतः चे परिक्षण करू लागले. किती सहज त्याने त्याच्या समाधानाची व्याख्या सांगितली. देव त्याला नक्की पावला असणार..

मदत ही खूप महाग गोष्ट आहे कारण मनाने श्रीमंत असणारे खूप कमी लोक असतात .

सुंदर कपडे ,हातात पर्स , मोबाईल , डोळयांवर गॉगल, चार इंग्लिश चे शब्द येणे म्हणजे सुशिक्षित का ? हीच माणसाची खरी ओळख का ?

मोठं घर ,मोठी कार , म्हणजे मिळालेले समाधान का ??

कोण तुम्हाला केंव्हा काय शिकवून जाईल????? व तुमची धुंदी उतरवेलं सांगता येत नाही

या माणसाच्या संगतीने माझे विचार स्वच्छ झाले. म्हणतात ना " कर्म से पहचान होती है इंसानों की वरना महंगे कपडे तो पुतले भी पहनते हैं दुकानों में

आई बाबांची माया कुणालाही कळली ,
बाळाच्या रक्षणा सदा झटे माय माऊली//

अन्नासाठी ,पोटासाठी आई फिरते वन वन ,
बाळ जेवता पोटभर हर्षे तिच तनमन //

पोटाला चिमटा घेवून मुलाला साहेब बनवते,
सर्व सुखे लेकरां पायी ती बहाल करते //

मुलांना वाढवितात लाडाकोडात फार ,
मनी आशा असते वृध्दपणी होतील आधार //

स्वत:च मन मारुन मुलांवर करती प्रेम अपार ,
मोठी झाल्यावर मुलं मात्र समजती त्यांना भार//

आई-बाबाच्या कष्टाची राहिली नाही जाणीव ,
कोण भरून काढेल त्यांच्या प्रेमाची उणीव //

आई-बाबाच्या जीवावर हे झाले राजे ,
आता मात्र त्यांना वाटू लागले ते ओझे //

संपत्ती घेऊन संगनमताने घालतात घाट ,
आई-बाबांना दाखवतात वृद्धाश्रमाची वाट //

कधीतरी आले असेल का त्यांच्या ध्यानीमनी ,
म्हातारपणी बाळ वृध्दाश्रमात येईल सोडूनी //

ज्येष्ठांनो करा आता भविष्याचा विचार ,
स्वत:साठी जगा थोडं नका करू अविचार//

वृद्धाश्रमातील आईची काय सांगावी हो कथा ,
घरदार सोडल्यावर काय होतं असेल व्यथा //

आशिश आज थोडा नाराज होता.रात्री त्याची कथा मला सांगितली.

" किराणा घ्यायला आमच्या इथे गाडे कुटुंब यायची. कायम उधार सामान घ्यायचे .मात्र उधारी फेडायचे. बुडवायचे नाही. मुलगा भांडून वेगळा झाला होता. ते राहात असलेले घर पडलं होतं .मी त्यांना भाड्याने घर घेऊन दिलं .नंतर मग अशी ही लाटच समाजात आली. मुलांनी पालकांना घरा बाहेर काढायची

किंवा आई वडिलांना त्रास द्यायची .म्हणून मी सगळ्यांना मदत करत राहिलो .लोक माझ्या कौतुक करीत असतात.मी त्यांचं काम करत असे. हे मोठेपण मिळते म्हणून मी राबत राहिलो .धम्म कुमारी संस्थेत दर गुरुवारी जाऊ लागलो .प्रार्थना करू लागलो.माझे लग्नासाठी कोणी प्रयत्न केला नाही.

वडील असेही लहानपणीच वारले होते आई म्हणाली

"छान असाच अविवाहित राहा. ब्रह्मचर्य हेच जीवन!". मावशी आईला रागावली "काय बोलतेस? तुला मुलगा काय ब्रह्मचर्याचे झाला?ब्रह्मचर्य हेच जीवन सांगु नको.आशिशचे आयुष्य चांगलं होऊ द्या. "

जीवन हेच पुस्तक होतं आई वारली .मावशी वारली आम्ही तिघी मुलं खोलीत राहत होतो.बहिणीचे लग्न केले. मी एकटाच राहिलो .पर्याय तरी कुठे होता ?मुली सांगून द्यायचं बंद झाले. जीवन हेच पुस्तक म्हणून मी जीवनाकडे चांगुलपणाने बघत राहिलो"आशिश

"आशिश तुझं खरोखर कौतुक आहे ज्येष्ठ नागरिकांची तू सेवा करतो हे पण योग्यच आहे. पण अजूनही जर तुला इच्छा असेल की आपल्याला कोणीतरी सहचरी मिळावी तर तू तो प्रयत्न करू शकतो"मी "किती फडतूस कथा आपल्या समाजात असतात. एकटा पुरुष म्हणजे मजा करत असेल. असे मूर्ख समज समाजात असतात. हे सगळे एकट पुरुष पोरी फिरवतील, मजा करतील, मुलींच्यावर नजर टाकतील ह्या गैरसमजामूळे मला बहिणी सोबत असलेल्या चाळीतल्या घरातच राहावं लागत होतं. स्वतःचे घर कोणी मला भाड्याने सुद्धा देत नव्हतं. पडकी चाळीतील खोली, कसाबसा मी तिथे दिवस काढतो.अशा

ग्रुपमध्ये रमत होतो .थोडा बदल म्हणून मी धम्मक मारीत जातो.मुलींच्या बाबत आयुष्यात मी कधीही काही लफड केले नाही. सडा पुरुष हा भानगडीवाला असतो .समाजात आपल्या,हा गैरसमज आहे."आशिष

" हो बाई नाजूक,पुरुष हळवा नसतो ही अजून एक मूर्ख संकल्पनादेखील आहे ."मी

"तुम्ही हवे आहात?" मी आशिष ला विचारलं .

"हो ,ताई मी फार हळवा आहे .मलाही घर हवं आहे .मला ही माणसं हवी .नाती हवी आहेत. पण एकटा माणूस म्हणून मला सगळ्यांनी दूर ठेवलं ."

जेवण झाल्यावर आम्ही वर्गात गेलो जीवनरेखा या विषयावर भाषण होतं 'पर्पज ऑफ लाइफ' आशिश आज अभ्यास करुन  भाषण देणार होता. आशिश ला ते सगळं बरोबर समजत होतं,शिकवता येत होते.

ही आमच्या माजी ,एक्स शाळेच्या जवळ, शाळेच्या परिसरातच या रम्य ठिकाणी कार्यशाळा होती. तो हॉल आमच्या काही काळ असलेल्या एका हेडमिस्त्रेस च्या स्मरणार्थ ,त्यांच्या मुलांनी बांधून दिला होता.धम्म कुमारी परिवार तर्फे मेंटेन गेला होता .चिंचेची झाड पुष्कळ होती एका चिंचेच्या झाडा मागे ती जिल्ह्यातील दुसरी खजिना विहीर होती .

"या विहिरीत गंगे ची मूर्ती आहे .ती शोधा. मूर्ती यापूर्वी कोणी शोधली नाही."गद्रे बाई म्हणाल्या.

"एकाने शोधले पण सापडत नाही. तुम्ही कलेक्टरला भेटा. तुमच्या स्वयंसेवी संस्थेतर्फे अर्ज करा म्हणजे परवानगी मिळाली की या विहीरीतून गंगे ची मूर्ती काढता येईल." एक शिबिराला आलेली पत्रकार मैत्रीण म्हणाली .

या शाळेत कार्यशाळेच्या दरम्यान अनन्या नावाचे मुख्याध्यापिका आल्या होत्या. त्या आमच्याशी विचित्र वागत .आमच्यावर लक्ष ठेवायला, जणूकाही त्यांनी आजूबाजूला अनेक जासूस ठेवले होते .ह्या खजिना विहिरीच्या बाजूला अनेक पिंजरे होते .त्या पिंजऱ्यामध्ये पक्षी आणि प्राणी ठेवले होते.

" विद्यार्थ्यांना पक्षी, प्राणी ,निसर्ग या सहजीवनाचे ज्ञान व्हावे म्हणून असं आहे" असे अनन्या मुख्याध्यापिका म्हणाल्या.

मौन पाळा म्हणून शिबिरात,सकाळ पासून सर्वत्र सांगितलं जाई. मात्र रात्री झोपतांना हळूहळू आम्ही मैत्रिणी काही बोलायचो किंवा जेवतांना वेळ मिळाला कि मी आणि आशिश थोडाफार काही गप्पा मारत असायचो.

विद्यार्थ्यांना उपयोगी होवुन ज्ञान वाढत होतो की नाही माहिती नाही .पण निसर्ग फार सुंदर होता. एक काळजीवाहू वॉचमन त्याच परिसरात मागच्या एका झोपडीवजा खोलीत राहत होता .त्यालादेखील आमचे विहिरीजवळ रेंगाळणे आवडत नसे. तुम्हाला

"तिथून इथून दूर जा .दूर जा,आत डोकावशील तर विषारी वायु बाधेल.कान सुजतील,किडे येतील ,सर्दी होईल! दमा होईल!" अशी कारणे

सांगून दूर हाकलून देत असे. एक मात्र खरं होतो की या पक्षाचा आणि पिंजऱ्याच्या मधून घाण वास येई व खरच काही किडे येत असतात.

काही तरी गूढ प्रकार त्या खजिना विहिरीत होता .एवढं मात्र निश्चित! याबाबत आम्हाला दोघांनाही अंदाज आला होता. हे आशिश ला सुद्धा मॅडम नी आमच्या कामासाठी म्हणजे खजिना विहिरीतील गंगेची मूर्ती शोधणं आणि त्या तुरुंगातल्या अन्य काही गोष्टींची माहिती काढणं हेच काम दिलं होतं. मात्र आशिश कधी त्या गोष्टींनी घाबरत नसे. कदाचित त्याला त्याच्या अध्यात्मिक बैठकीचा फायदा झाला असावा. एका रात्री आशिष म्हणाले.

" आज रात्री आपण त्या खजिना विहिरीत उतरु या .कारण दिवसभर तो केअरटेकर माणूस आपल्या आसपास असतो आणि अध्यात्माची भाषण असतात.दहा वाजता आपण जाऊ या .बूट मोजे घाला.टोर्च सर्व दोऱ्या वगैरे सर्व सामान घेऊन आम्ही विहिरीपाशी गेलो. आशिशने आम्हाला दुर बाहेरच उभं केलं. आणि आशिश तरीही काही दगाफटका झाला म्हणून त्यांनी दोर टॉर्च ठेवला होता.खजिना विहीर वाटली त्यापेक्षा अधिक खोल होती त्यामुळे सुरक्षेसाठी पोटाला आशिषने आम्ही आलेला दोरखंड बांधला होता. तो बाहेर खांबाला बांधण्यात आला होता .कशीबशी मी विहिरीच्या काठावर उभी होते.

आशिष विहिरीत उतरला. बराच वेळ झाला पण आशिश वर येईना .मला भीती वाटू लागली .मैत्रीण रडायला लागली.

"आशिष बुडला तर,कोणी पाहिले तर आपली किती बदनामी होईल?गद्रे मॅडमनी आपल्याला या कुठल्या संकटात टाकल"म्हणून मी देवाचा धावा करू

लागले. तोच त्या दोरीला ओढ बसल्यासारख झाल. मी परत विहिरीत डोकावून पाहिलं.मला पडायची भीती वाटत होती. तरीही डोकावून पाहिलं. "आशिष आशिष वर ये"अशी दबक्या आवाजात हाक मारली.

आशिष म्हणाले

" हो हो मीच आहे .मला वर ओढा. कारण की आतल्या अशुद्ध हवेमुळे मला श्वास घ्यायला त्रास होत आहे .कृपया मला दोरखंड खेचून वर ओढून घ्या.ओरडू नका.वर  घ्या. आम्ही तिघींनी जिवाच्या आकांताने दोरी ओढत आशिषला वरती काढल. आशिष खूप जड जाणवत होता .कदाचित पाणी अंगात शिरल असेल .असा मला वाटलं .आशिश ला मी वर काढून, काठावरून बाजूला घेऊन जमिनीवर निजवलं .आशिश जड झाला नव्हता .आशिषने गंगेची मूर्ती पोटाला बांधली होती.दोरी सोडून बांधलेली गंगे ची मूर्ती पोटावरून सोडून आशिश जमिनीवर आडवा पडला .थोड्यावेळाने त्याला जरा शुद्धशुध्द बरे वाटले,तो उठून बसला.उमज पडल्यावर उभा राहिला. ती मूर्ती घेऊन तो त्याच्या खोलीत गेला .आणि आम्ही तिघीजणी आपल्या आमच्या खोलीत आलो .रात्रभर माझी छाती धडधडत होती .आता यापुढे हा कोर्स न करता परत जावं ,असं वाटत होतं .पण अजून तीन दिवस बाकी होते.आम्ही ते तीन दिवस कसेबसे काढले. कोर्स पूर्ण झाला .कोर्स पूर्ण व्हायच्या दिवशी आमच्या गद्रे मॅडम आम्हाला घ्यायला आल्या होत्या.नवल म्हणजे मॅडम सोबत काडे आजीसुद्धा होत्या .गाडीत बसल्यावर आजी म्हणाल्या

"अगं आमची खजिना विहीर आणि ही खजिना विहीर दोन्हींच बांधकाम, बाजीराव पेशवे यांनी केल.कोळी लोकांनी शोध लावला होता .आमच्या विहिरीत नवनागाची शिळा होती आणि या विहिरीत गणपतीची मूर्ती होती .तुम्हाला काही सापडले का?"

" गंगा, गंगा नदीची मूर्ती अस पुस्तकात लिहिले आहे."गद्रे

" गंगा अस वाचल. गणपती नाही "आशिश. मूर्ती सापडली अस देखील आशिश काही बोलला नाही .आमच्या घरापाशी आम्हाला गाडीने सोडून, तिघं,आशिश आजी आणि गद्रेमॅडम पुढे गेल्या. ती मूर्ती आशिशने आजी आणि गंगा मॅडमला दिली असावी .त्यानंतर आशिश आम्हाला कधीही भेटला नाही .आम्ही त्याला कधी फोन केला की तो फोन देखील घेत नाही. केवळ गंगेची मूर्ती ,खजिना विहिरीतून काढण्यापूरते मॅडम नी आणि मला जवळ केलं होतं का?मला काडे आजीचे घराची ओढ अजूनही वाटते .आजींच्या घरी त्या उभ्या मारुतीजवळ,खजिना विहीरीजवळ जाऊन आम्ही अजूनही गप्पा मारतो .गंगेच्या मूर्तीचे पुढे काय झालं? हा प्रश्न उरलाय.मूर्ती कुठे आहे हे आशिश सांगू शकतो. फक्त विहिरीतून खोलवरून मूर्ती काढताना आशिश पकडला गेला तर सुरक्षितता म्हणून आम्हाला खोवलेला असावं.

त्या तिघांनी आपल्या अन्य इमेज वर नाव येऊ नये ,आम्ही म्हाताऱ्या बायका काहीतरी सहज गंमत करत होतो, असं सांगता याव,कारण सहज वाटावं म्हणून आमची मदत घेतली गेली होती.

गंगे ची मूर्ती काढणे हा काडे आजी ,गद्रे मॅडम आणि आशिश या तिघांचा प्लॅन असावा .असं मला वाटते.

अजुन काय वाटतं आपल्या चांगुलपणाचा फायदा घेऊन, फायदा काढून आपल्याला परत न दिसणाऱ्या अनेक जणांमध्ये तिघे जमा झाले.

विचार करून थकते.अनुभवात ,ज्याना ओळखता आले नाही त्यात तीन नाव जमा झाली हे मी मनाला समजावते आणि गप्प बसते .

अध्यात्मविद्या ,प्रमाणित ,धम्म कुमारी आशिश यातला कुठलाही विषय गद्रे मॅडम किंवा आजी आता काढत नाहीत.

***

9 कथा

# विकेंड होम: शुभांगी पासेबंद

तीस वर्षापूर्वी ही कथा सुरू झाली. त्या वेळी आमचे हातात पैसा खुळखुळत होता .सेकंड होम घ्यायची फॅशन आली होती

सहल कंपन्यांचा तर सुळसुळाट सुरु झाला होता. सहलीला कुठेतरी जाऊन तीन चार दिवस राहायचं.मग त्याच्यापेक्षा आपले स्वतःचे निसर्गरम्य ठिकाणी घर घ्यावं ,अशी इच्छा आम्हा दोघांच्या मनात ,नवरा बायकोच्या मनात, निर्माण झाली आणि आम्ही हे वीकेण्ड होम घेतलं .

सॉफ्ट सर्विस नावाच्या व्यक्तीने तळीगाव जवळील ,एका देवीच्या मंदिराच्या बाजूला ,नदीकिनारी हे प्लॉट्स बनवले होते. शेतकी जमीन होती.बिनशेती करायचे काम चालू होते. आणि तरी तो ते विकत होता. स्वस्तात मिळाला म्हणून तो प्लॉट घेतला ,पण त्यानंतर बिगर शेती करण्याचा खर्च करून ,नंतर त्याचा रखरखाव आताचा खर्च, बाजूला भिंत बांधली त्याचा खर्च, बांधकामाचा खर्च, असं करून त्या बिल्डरने आमच्याकडून भरपूर पैसे काढले. अर्थात बंगला इतका शहरापासून लांब होता की गाडी शिवाय तिथे पोचता यायचं नाही .पण एक होतं की त्या मैना सोसायटीचे क्लब हाऊस होते.आम्ही तिथे पैसे भरुन जाऊ शकत होतो.जंक आणि तिथे कायम खादाडीचे पदार्थ

मिळत असायचे .त्यामुळे मुंबईहून आम्ही सकाळी निघालो की तिथे नाश्त्याला, ब्रंच ला पोचायचो.खावुन फिरायला,हवा खायला जायचे. खाऊन पिऊन आजूबाजूला फिरायचं .दोन वाजता, जवळपासच्या कुठल्या तरी हॉटेलात जेवायला जायचे, शनिवारी रात्री तिथेच राहायचो.तो वार आणि रविवारी पण दिवसभर तिथे वेळ काढून रविवारी संध्याकाळी परत यायचं.या मैना सोसायटीत त्या बिल्डरने भरपूर बंगले ,प्लॉट असे कोणाला विकले होते. त्या ऐशी प्लॉट मधले आमच्यासारख्या पाच सहा जणांनी ते बंगले बांधले होते. बाकीचे अजुन प्लॉट रिकामे होते. कुणाची भिंत बांधली होती .काही जणांचे किंमती वाढल्या कि विकू म्हणून असेच पडले होते.तो काळ एकदमच बिल्डर लोकांच्या भरभराटीचा होता. इंच इंच लढवू ,करून प्लॉट बनवून काही बांधून त्यांनी ते विकले होते. अर्थात त्या वेळी पाच हजार रुपयाला घेतलेल्या प्लॉटची सध्याची किंमत,2021 साली 30 एक लाख तरी असेल.

तर असा आमचा हा तळगावचा सुंदर सुंदर बंगला तयार झाला होता.साल 1988. कधीतरी शनिवार रविवार जायचं न्यू इयर ची पार्टी, वर्षभरातला एखादा सहलीचा कार्यक्रम ,याच्या व्यतिरिक्त त्या तळीगावच्या बंगल्यावर आम्ही कधीही राहिलीराहिलो नाही. सुरुवातीचा काळ मैना सोसायटीचे नाव होते.आमचा बंगला नवा होता. तेव्हा महत्वाचे दोन-तीन वर्ष उन्हाळयाच्या सुट्टीत राहायचं ठरवलं होतं कारण की आजूबाजूला हिरवीगार झाडे होती. आमचं सेकंड होम खूप सुंदर आहे आणि त्याची आम्हाला चांगली किंमत/ परतावा मिळेल व विकायचे काढल्यावर रांग लागेल, हे अहंकार सुखावणारे

वाक्य हृदयाशी धरून आम्ही काही दिवस काढले. लोक म्हणत असत “ वा वा डबल इंजिन ना !दोघं नोकरी करतात त्यामुळे दोन-दोन घर झाली” आणि आमचा आनंद वाढे. आम्ही अधिकच खूष होत असू .पण काळ हा नेहमी बदलत असतो .माझ्या मुलाला त्या बंगल्यावर गेलो की त्याचं बालपण आठवायचं. एका प्रोजेक्टवर ते लहानपणी राहिले होते. लहानशी टमटम बस त्यांना शाळेत घेऊन जाई. तशी मिनी टमटम बस ईथे होती.खेड्यातल्या वातावरणाने, डाळिंबाच्या बागा आणि सुरूच बन म्हणावं अशी एक सुरुची झाडे लावलेली बाग त्या गावात होती. त्यामुळे माझा नवरा खूश असायचा dreams कम true असं सगळ्यांना आम्हाला वाटायचं. आमचे एक नातेवाईक होते ते मात्र मला म्हणाले होते .

“ताई आम्ही ऐकले आजी म्हणे, बाबांच्या आजोबांनी धुळयाला बंगला बांधला होता, की निवृत्तीनंतर सगळयांनी तिथे राहायचं.आजी आणि आजोबा नोकरी निमित्त गावाबाहेर अन्य ठिकाणी बदली च्या जागी राहिले.आजोबा वापरले. त्यांच्या मृत्यूनंतर ते घर विकायला इतका त्रास झाला की ते घर बांधण्याला जेवढे पैसे लागले होते त्याच्याहून ही कमी पैशात ते घर विकले .बहिणीने सह्या न दिल्याने गिर्हाईक कमी पैशात मागायला लागले .कसंतरी करून, काहीतरी करून ज्या व्यक्तीला विकलं ती व्यक्ती माझ्या पुतण्याच्या दवाखान्यात जाऊन “आम्हाला पैसे परत द्या तुमचा तुमचा प्लॉट परत घ्या.” अस भांडण करी.

“ मी विकत घेऊन फसलो .तो बंगला परत विकत घ्या” अशी कुणकुण करे. त्यामुळे तर पुतण्याला खूप वैताग येत असे. त्याचे पेशंटमध्ये त्याचे इम्प्रेशन खराब होते म्हणून तो आजोबांच्या नावाने खडे फोडत असे.ताई ऐका, त्यामुळे राहणार असाल तरच घर घ्या.”काका

“ जास्ती प्रॉपर्टी करू नका. जास्त प्रॉपर्टी केली की मुलांमध्ये जास्ती भांडणं होतात .कुठलीही व्यक्ती आपण आता मरू म्हणून मृत्युपत्र करत नसते .प्रत्येकालाच वाटत असते,ईतर जण मरतील,पण ते शंभर वर्षे जगणार आहेत.त्यामुळे शंभरीच्या आधी कधीही मृत्यू आला तरीही त्या प्रॉपर्टी वरून नातेवाईकांचे मध्ये भांडण लागतात. भावा भावा मध्ये भांडणे लागतात. प्रॉपर्टी हे भांडणांचे मूळ असतं.”काका2

“ तुमच्या बाबतीत असं घडलं असेल काका ,आमच्या बाबतीत असं घडणार नाही.” मी ठासून सांगितलं .पण काही काळाने मला जाणवायला लागलं की प्रॉपर्टी हा त्रासदायक विषय आजच्या काळात सुद्धा आहे आणि प्रत्येकाच्याच बाबतीत आहे. फक्त परिस्थिती बदलायचा अवकाश, ग्रहांचा फेरा बदलायचा अवकाश, प्रॉपर्टी वरून होणारा त्रास सुरू होतो .घर भाड्याने देऊन पैसा कमवू हे सहज नसते.सुख मिळताच असे नाही. घरे भाड्याने दिल्यावर सुद्धा शंभर प्रकारे त्रास काढावा लागतो .स्वच्छता,, रिपेअर, तसेच भाडेकरूचा छळ ,पंखे ई. चोरून नेलेल्या वस्तू सगळे मिळून भरपूर मानसिक त्रास असतो.

मैना सहली वरुन ,दरवेळी परत येताना गावठी चवदार भाजी म्हणून भाजी आणायची. कुठेतरी त्या बार अँड रेस्टॉरंट मध्ये किंवा ढाब्यावर खायचं आणि परत यायचं अशी पद्धत झाली. पण त्या बार अँड रेस्टॉरंट मध्ये पुढे पुढे वावरणारी आणि येणारी माणसं बघून आम्हाला त्या बार अँड रेस्टॉरंट मध्ये जेवायची पण भीती वाटू लागली .त्यामुळे आमचं तिथे जवळजवळ बंद झालं . आतल्या छोट्या रस्त्याला दिवे नसायचे. अंधार खुडुक असायचा. चोरांची, बलात्कार करणाऱ्यांची ,गावगुंडांची भीती वाटू लागली. तिन्हीसांज झाली की तिथे वावरायला भुताटकी सारखं वाटायला लागलं .रस्त्यावर पण चिटपाखरू नसायच. आणि बार अँड रेस्टॉरंट मध्ये विचित्र माणसांची मध्यंतरी वर्दळ असे.मध्यंतरीच्या काळात व्यसन वगैरे प्रकार खूप वाढल्यामुळे असुरक्षित वाटू लागलं.

गारवा देणारी झाडे।पण पुढे पुढे ती झाडे तोडली गेली .तिथल्या आसपासच्या एका बंगल्यात खून झाल्याच्या बातम्या वर्तमानपत्र भर गाजल्या. कुठल्यातरी प्लॉटचे जमिनीत खणल्यावर सांगाडा सापडला ,या गोष्टी पण घडल्या.मैना आणि परिसरात प्रेत गाडली आहे,अशा बातम्या आल्या.आम्हाला त्या मैनाचे जागी जायला भीती वाटू लागली. ‘काय होते?चला’अस कोणी म्हटलं आणि गेलो कधी, तरीही त्याचा आनंद संपला होता. मला पण आठवडाभर ऑफिस मध्ये काम केल्यानंतर, विकेंडला तिथे जाऊन स्वयंपाक पाणी करणे झेपेना.अन आम्हाला खिचडी करण्याचा सुद्धा कंटाळा येऊ लागला. तिथे गॅस फ्रीज सगळं होतं .पण मध्ये मध्ये लाईट जात.

त्यामुळे फ्रिजचा काही उपयोग नव्हता. त्यामुळे जाताना दुधाच्या पिशव्या,चहा साखर मीठ पीठ घेऊन जायचं आणि गेल्यावर तिथे करायचं. स्वच्छता करायची. यामुळे माझाच पिट्ट्या पडू लागला. त्यामुळे मला त्या मैना सोसायटीतील बंगल्यात जायची इच्छा संपून गेली. त्या मैना बिल्डरची त्या काळात खूपच चलती होती .आमच्या पेक्षा वयाने थोडा मोठा होता.

,कंटाळून काम करत,नोकरांचा त्रास सोसे.मैत्रिणी आणि सोबत नाही,दोघेच काय जायच?नंतर मुलांची शाळा सुरू झाली. शिवाय ते गावाबाहेर खूप अंतरावर असल्यामुळे, मुलगा आजारी पडला तर आम्हाला तिथे जवळपास काहीच मिळायचं नाही. पुढे पुढे आम्हाला दोन दिवस सुट्टी मिळते, तिथे जाऊन खाण्यापिण्याचं करण्याचा स्वच्छता करण्याचा कंटाळा येऊ लागला आणि आम्ही त्या प्लॉटवरिल बंगल्याच्या जागी जाणे सोडून दिले .

त्या दरम्यान आमच्या ऑफिसमध्ये एक ,सामान्य बाई दूरच्या कुठल्यातरी खेड्या वरून बदली होऊन आली होती. दहा भावंड,तांडा,काका वगैरे होते. तिच्या कुटुंबात नोकरी न करणारी ती पहिलीच होती आणि तिचे राहणीमान बोलणं आणि दिसलो यामुळे तिला कोणी भाड्याने घर द्यायला तयार नव्हतं. खूप लहान लहान शेंबडी रडकी केसांच्या झिपऱ्या झालेली पोर होती त्या तांड्याला कोणी जागा भाड्याने देत नव्हते आणि तिला मिळालेली नोकरीची संधी तिला सोडायची नव्हती तिची राहायची सोय होत नव्हती त्यामुळे ती मला म्हणाली

“मला त्या तुमच्या बंगल्यात राहू द्या.”

“ का बरं आणि तुला ते लांब नाही का पडणार? ऑफिसला यायला दूर आहे”मी

“दूर नाही .मला चालेल ताई आडनाव आणि आमच्याकडे बघून आम्हाला कोणी खोल्या भाड्याने देत नाही शहरात घर भाड्याने द्यायला जात विचारतात.पैसे नाहीत .मैना मध्ये पण मला राहू द्या.”मी फसले. इथे आमच्या बंगल्यात साहित्य ईतके पडून होत कि ही राहील तर तिथे मनुष्याची वस्ती राहील ,वावर असेल असे मला वाटले.कारण एरवी कोणी नसलं तर मुंगी आणि झुरळ आणि उंदीर यांची राज्य असे.हितकारी म्हणून मी तिला तिथे राहायची परवानगी दिली. त्या घरात आम्ही जेमतेम पाच-सहा वेळा ,एखादा दिवस दोन दिवस राहिले असून बाकी ठिकाणी फिरणे नवर्‍याला आवडत असे.एका जागी तळीगाव ला वारंवार जाण्याचा ,कुणालाही रस नव्हता.

एवढं मोठं जग आहे कुठे जाऊन फिरता येत, मजा करता येते .त्याच त्याच ठिकाणी परत जाण्याचा आमचा आनंद संपला. त्यानंतर मग वीस वर्ष ही बाई तिथे राहत होती.तिची भावंड चांगली दांडगट झाली होती.काही लक्षणीय करत नव्हती.एका जुन्या जीप मधून,खेडोपड्यातून देशी औषध विकत. तिने आमच्या ऑफिसमधल्या दुसऱ्या एका तिच्या जातीचे माणसाशी लग्न केलं.तो तांडा,ती दोघे तिथे राहत होती .लग्न करून थोडे स्थिरस्थावर झाल्यावर तिला मी म्हटल , “आता तू शहरात घर घे. ईथे दूर आमच्या घरी कायम कस राहणार?” त्यावेळी तिने मला सांगितलं

“तळीगाव लोकल मिळते”मग नमुन्या दाखल काही तरी थोडेफार भाडं ,तिने द्यायला सुरुवात केली. त्या भाड्यात मला काही माझ्या इतर गावी जाण्याच्या सहलीचा खर्चसुद्धा भरून निघत नसे. याउलट रिपेअर च्या निमित्ताने, ती माझी नोकरीतील परिचित सहकारी असून देखील वर पैसे मागत होती.काही तरी सांगून माझ्याकडून ती पैसा काढत असे. कधीकधी मी त्यांना त्यांना म्हणे

“ काय चाललेय आपल्या बंगल्यात,मैना सोसायटी त तळीगावला एकदा जाऊन बघू या तरी!”

हे म्हणत,”घर घाण केलय त्या लोकांनी,जावस वाटत नाही.”

मी म्हणत असे,”मी मैत्रिणी सोबत एकदा जाते” .

मैत्रिणींचे सोबत मजा येई पण ढाई मिल चले मगर 9 दिन मे अशा गती पद्धतीने तिच्या कडे गेल्यावर चहा सुद्धा मिळायचा नाही .ड्रायव्हर शोधा. पैसे खर्च करा व तिच्यात शेंबड्या पोरांना खाऊ घेऊन जा .वर बोअर व्हा.या सगळ्याचा मला अतिशय कंटाळा आल्यावर मला चादर यासारखं होत असे. पण पुढे पुढे त्या मैत्रिणींचा तिकडे जाण्यातला इंटरेस्ट संपला.किती तरी वेगवेगळे गड किल्ले ,पर्यटन यांची व्हरायटी समोर असताना ,त्या तळीगाव ठिकाणी परत जाणे संपला. मग तो काळ व्हाट्सअपचा नव्हता. त्यामुळे काय ग बंगला कसा आहे विचारले की theek.thok आहे असेच ती आम्हाला सांगत असे आणि आम्ही ते वीकेंड होम ठीक आहे,पुढे निवांत जाऊ.यात आनंद मानत असू.

त्यामुळे तीस वर्षांनी आज जेव्हा मी तो बंगला विकायला काढला तेव्हा बिल्डरच्या राज्यात,मैना बिल्डर यांच्या मुलाचं राज्य होतं.

मैना हा म्हातारा झाल्यामुळे हा कशातच लक्ष घालत नव्हता. आणि मुलाला मैना बार अँड रेस्टॉरंट मध्ये भरपूर पैसे मिळत होते आणि प्लॉट जातील विकले तेव्हा जातील, असे वाटे. बापाने माल करून ठेवला होता.मैना बिल्डर आमच्या पेक्षा वयाने थोडा मोठा होता आणि त्यामुळे तीस वर्षांनी आज जेव्हा मी ती जागा विकायला काढली तेव्हा राज्य त्याच्या मुलाचं होतं. म्हातारा झाल्यामुळे हा कशातच लक्ष घालत नव्हता .जातील विकले तेव्हा जातील असे बापाने करून ठेवलेलं होतं.त्यामुळे त्याला आमचा प्लॉट विकून देणे त्यात रस नव्हता. मैना त्याची इस्टेट एजंटची काम जोरात चालली होती. अजून एका ठिकाणी त्याने फ्लॅट बुक केल्यास, हेलिकॉप्टर राईड मिळेल, एका नटी बरोबर,एक तास फिरायला मिळेल वगैरे जाहिराती करून नव्या ठिकाणी घेतलेल्या जागेवर प्लॉट विकायला सुरुवात केली होती.दूरवर आणि नवे ते प्रोजेक्ट त्याचं चालू होतं.नव्या प्रोजेक्ट मध्ये  तो मुलगा रमला होता.

म्हातारा वयोमानाने झालेल्या आजारांमुळे बिजनेस मध्ये लक्ष देत नव्हता आणि आम्ही मात्र पैसे गुंतून पडल्यामुळे वैतागलो होतो . “दहा वर्षात इथून हायवे जाईल. तिथे चार पदरी रस्ता होईल .तुम्हाला करोडो रुपये मिळतील.” असं आमिष दाखवून आम्हाला पैसे इन्व्हेस्ट करायला सांगितले होते. प्रत्यक्षात आता त्यातून काहीच प्रगती झाली नाही.दहा वर्षात इथून हायवे जाईल तिथे चार पदरी रस्ता होईल तुम्हाला करोडो रुपये मिळतील असं आमिष दाखवून

आम्हाला पैसे इन्व्हेस्ट करायला सांगितले होते. प्रत्यक्षात आता त्यात काहीच परतावा मिळेना.आता मध्यंतरी म्हणजे तीस वर्षानंतर जेव्हा आमच्या मनात आलं की आपलं वय भरपूर झाले आहे.तर आपण दोघे निवृत्त झालो आहोत आणि अशा निवृत्त वयात शरीर साथ देत नाही .आता इतके आजार अंगी लागले आहेत की त्या  तळगाव ला जाऊन आपण राहू शकत नाही. तेव्हा मी पतीना म्हटलं “आपली मुलंसुद्धा परदेशी आहेत. आपल्याला त्या घराची विक्री आत्ताच करणं बरं पडेल .कारण आपली मुलं परदेशातून पंधरा दिवस येतील. आपल्या माघारी ते  बंगला कधी विकतील आणि पैसा काय हातात पडणार आहे? त्यांना तो मग दलाल फसवेल .त्यांना पडेल किंमत देईल .त्यांना सांगेल कि या भागात हाच भाव आहे .त्यापेक्षा आपण तो बंगला विकून टाकू या.” नवरा म्हणाला ,

“ठीक आहे सांग एखाद्या एजंटला किंवा त्या बिल्डर ला सांग.”

त्या बिल्डरला आणि एजंटला आम्ही हे सांगायला सुरुवात केली. त्या दरम्यान 2020 साल होतं. 2020 सालचा करोना महामारी चा आजार सर्वत्र पसरला होता.बिल्डर म्हणाला,

“अहो मार्केट मंदी आहे.बरीच घर शिल्लक आहेत.एकूण दीडशे प्लॉट मधले हे पाच बंगले बांधले तुम्ही बाकीचे 145 लोक प्लॉट विकायचा म्हणत आहेत.रॉ आणि न बांधलेले त्यांचे प्लॉट विकायचे पडलेले असताना तुमचा बांधकाम केलेल्या कोण विकत घेणार आहे?”

मी म्हटले, “ हो बांधकाम केले आहे .म्हणून कदाचित विकला जाईल .बघा काही गिऱ्हाईक मिळतं का ?दलाली देईन.”

मी एजंट, बिल्डर दोघांच्या मागे मागे लागले. शिवाय जी नोकरीतील परिचित सहकारी माझी त्या बंगल्यात राहत होती तिला म्हटलं

“तूच विकत घेऊन टाक .गृहकर्जाची सोय आहे आणि तो बंगला तुमच्या नावावर होईल. तुला पण आवडला. तुम्ही विकत घ्या इतकी वर्ष तुम्ही तिथे राहिला आहेत तर तुम्हाला तो आवडतो.”मी. पण त्यावर ती माझी नोकरीतील परिचित सहकारी म्हणाली “ अहो तीस वर्ष जुना झालाय .भिंती उंदरांनी पोखरून काढल्या आहेत. असा बंगला आम्हाला विकत घ्यायचा, तर मी तुमचा जुना आतला पडलेला बंगला कशाला घेऊन येऊ? कितीतरी नव्या नव्या प्रकारची बांधकाम असतात. स्पार्टेक्स च्या टाइल्स असतात. स्लाइडिंग विंडो सोयी होत असतात.”ती

“ छोट्या गावात ,शहरापासून दूर हवा चांगली असते किंवा ...”मी

“मला काही तुमचा बंगला नको. कितीपर्यंत देणार आहात? नव्या एवढी किंमत इथे कुठे आहे ?”तिने वगैरे वगैरे केलं. मग सुट्टीच्या दिवशी असल्या घर विकणे चे कामा मध्ये वेळ जाऊ लागला. प्रवास करून करून आणि त्या घाणेरड्या रस्त्याने जाऊन कंबर धरू लागली.

भाग 2

एकदा वीकेंड होमची हौस फिटली.मग मी ह्यांना म्हटलं

“पडेल किमतीत का होईना प्लॉट विकून मोकळे होऊन जाऊ या.” आपण याच काळात जर तुम्ही विकायचो प्रयत्न केला नाही तर कसे होईल.आता तो विकला जात नाही तर आपल्या मुलांना तर सगळे हातोहात फसवतील. ही माझी नोकरीतील परिचित सहकारी तिथून जाणार नाही आणि त्या मुलांना वाटेला लावेल आणि आयुष्यभर प्लॉट बळकावून बसले.”मी

आता नवरा म्हणाला

“खरे आहे .तुझ्या मैत्रिणीचा असल्या अनुभवा बद्दल मला नवल नाही.बंगल्याच्या बद्दल माहिती मॅजिकचा ब्रिक्स वर टाकू” .

“माझी नोकरी तील परिचित सहकारी मला असं फसवु शकते.जे व्हायचे ते होणार. आता काय करायचं ?”मी

“आता आपण निदान कुणाला तरी अजून दोन-तीन एजंट लावु या.”नवरा.

ते केले. पण तो प्लॉट काही (बंगला) काही विकला जाईना. बिल्डर च्या मागे लागलो, तर बिल्डर सुद्धा नाही म्हणायचा. आम्ही तो घेतला केवढ्या किंमतीला ,तेवढ्या किमतीत व्याजासह सुद्धा विकले जाईना. वर्षाला 500 रुपये मेंटेनन्स होतं आणि लाईट बिलाचे काहीतरी पैसे होते .पण इतके विचित्र लोक त्या मैना सोसायटीत होते की लोक तेही पैसे देत नव्हते .त्यामुळे पुढे पुढे तर ती जागा खंडहर वाटू लागली होती. क्लब हाऊस मध्ये बिल्डरने मैना बार अँड रेस्टॉरंट बनवलं होतं .ते बरे होते .अन्न चांगले होते आणि ते तसंच रस्त्याच्या बाजूला होत.तिथे स्विमिंग पूल होता. त्यामुळे हॉटेल या दृष्टीने हायवेवर

असल्याने ते जोरात चालू लागलं. त्याचा धंदा भरपूर चालत होता. त्यामुळे प्लॉटची विक्री जरी थांबली तरी बार अँड रेस्टॉरंट मुळे त्याची प्रगती होत होती. तो काही आमचा बंगला विकत घेईना. आमचा बंगला त्या बार अँड रेस्टॉरंट पासून लांब सुद्धा होता .शेवटी एक दिवस एक गिऱ्हाईक पडेल किमतीत विकत घ्यायला तयार झालं .त्याच्याशी आम्ही बोलणी सुद्धा केली. मात्र ते म्हणाले म्हणाले की

" त्या भाडेकरूंना काढा आणि आम्हाला एमटी पझेशन द्या"बुगडे काही तरी प्रकारे कुठून तरी खेड्यातूनच काही तरी करून ईथे आला होता .बुगडे नाव होतं त्याचं तो तिथे राहणार होता .कधी कधी तर मला तो अस्सल गुन्हेगार पण वाटत असे. पण मला त्याच्याशी देणंघेणं नव्हतं. मला तो प्लॉट विकायचा होता. तो बंगला विकायचा आणि रोकड घेऊन गप्प बसायचं होतं.

माणसाचं मन अथांग असतं .अनेक प्रकारचे विचार त्याच्या मनात येत असतात. माझ्या नवऱ्याला त्या बंगल्यावर गेलो की त्याचं बालपण आठवायचं .माणसाचं मन अथांग असतं अनेक प्रकारचे विचार त्याच्या मनात येत असतात .अर्थात काळ बदलून जातो. दीर्घकाळानंतर माणसांचा रस संपतो आज जे वर आहे ते काही काळाने खाली येतं. आज आवडणार घर दोन-तीन वर्षात जुन मळकट वाटू लागतं .पंधरा वर्षांनी जुने वाटू लागतं आणि तीस वर्षांनी खंडहर वाटू लागतं .शिवाय बांधकामाची जाहिरात असते. या देशात सोम्याने पुण्याला सेकंड होम घेतला ,गोम्याने नाशिक ला सेकंड होम घेतलं. अमक्याने लोणावळयाला कुठेतरी वीकेंड फ्लॅट घेतला, हे ऐकून ऐकून प्रत्येक जण हे

सेकंड होम घेत सुटले. पण या सेकंड होम मध्ये आनंद मिळणे अवघड होऊन गेलं. निदान आम्हाला तरी जमले नाही. इतरांच्या माहितीने त्यांच्याकडे खूप नोकर-चाकर असतात किंवा ज्यांना अतिप्रमाणात नातेवाईक असतात तेथे वारंवार जाऊन आपल्या हातचे जेवण करून ,राहून खाऊ शकतील त्यांना ठीक आहे. पण ज्यांच्या घरी नोकरदार माणूस आहे त्यांना ते सगळे अवघड होऊन गेलं. मला तरी झाले आणि मला वाटतं माझ्याच सारख इतरांना पण झालेलं असावं. मोठी कमान होती.पणण पाच-सात बंगले बांधले होते आणि त्यांचं खंडहर बनलं होतं. एक जण भेटला ,त्याचे आईचा प्लॉट शिकवायचा होता,असे अनेक प्लॉट रिकामे होते. .प्रवेशद्वारापाशी कमान केली होती. ही मोठी कमान मैना सोसायटीच्या प्रवेशद्वारापाशी बांधली होती .एक पुतळा लावला होता आणि बिल्डरचे उच्च दिवस असल्यामुळे त्याने आईच्या नावाने तिचे मंदिर सुद्धा बांधलेलं होतं. त्यावेळी तरी ते सर्व खूप आकर्षक वाटत होतं .माझ्या सोबत अजून दोन तीन जणांनी पण तिथे प्लॉट घेतले अर्थात त्यानंतर मला मनातल्या मनात शिव्या पण देत असतील, की या बाईच्या नादी लागून आमचेही पैसे बुडाले.

वॉचमन नाही. इतकी वाईट परिस्थिती सुरक्षिततेबाबत झाली की नंतर लोकांनी  घराची खिडकी चोरून नेली.नळ चोरून नेले. महिन्यात एक दिवस जाऊन आम्ही त्या गोष्टीची काहीही व्यवस्था लावू शकणार नव्हतो. बिल्डरने आम्हाला सुचवलं की तो बंगला लेडीज किंवा जेन्ट्स विद्यार्थ्यांसाठी, नोकरदार लोकांसाठी होस्टेल बनवा  छान चालेल. पण माझ्या नेहमीच्या मराठमोळ्या

आणि भित्र्या स्वभावामुळे इथे काही भानगडी झाल्या ,तर मोठा प्रॉब्लेम येईल आणि आपल्यावर आरोप येईल या भीतीने मी त्याला सुद्धा नाही म्हणाले.The end of dream.

“गिर्हाईक एमटी पझेशन मागत आहे. आम्हाला चांगलं गिऱ्हाईक आलय .”असं मी त्या माझ्या मैत्रिणीला सांगितलं. त्यावर ती म्हणाली,

“ आम्ही नाही खाली करणार आणि कुठे जाऊ आता? आता आम्हाला ईथली इतकी सवय झाली.”ती. मी म्हटलं ,

“मग तू विकत घे.”तर ती म्हणे “मला एवढं परवडत नाही.एवढे कोण देणार.कोर्टात जा.आम्ही सोडणार नाही.”

मध्यस्थ ठेवले.त्या भाडेकरूला समजावले.

“पैसे कमी करत असाल तर मी विकत घेईल.”ती

अशा वादावादी नंतर पडेल किमतीत तिने तो बंगला विकत घेतला. त्यातले पण पाच लाख सध्या पैसे नाही नंतर देते म्हणून तिने सांगितलं. ब्लॅक मधले 500000/बाकी ठेवल्यामुळे ते पैसे तिने नंतर बुडवले, तरीही आम्ही काहीही करू शकलो नव्हतो. बर मला पण एवढी अक्कल नव्हती .ती ईतकी तरबेज की पाच लाखाचा चेक तिच्या कडून घेतला तरी तो वठेना.

दुसरे पाच लाखाचा व्हाईट बद्दलच्या चेक घेतला होता तो सुद्धा परत आला. कोर्टकचेऱ्या करायला मला आता त्राण नव्हते की जोर नव्हता. त्यामुळे व्हाईट मधले पाच लाख आणि ब्लॅक मधले पाच लाख बुडवून आम्ही तो

बंगला विकून टाकला आणि मोकळे झालो. त्या दिवशी सहजच मिळालेल्या पैशाचा हिशोब लावताना मला जाणवलं की ,त्या घराने सेकंड होम ने विकेंड होमने आम्हाला आनंद दिला नाही आणि इन्वेस्टमेंट म्हणून जे घर घेतलं होतं त्या घरामध्ये आम्हाला काहीही रिटन्स मिळाले नाही. उलट बँकेत ठेवले असते तरी साडेआठ टक्के व्याजाने सुद्धा या रकमेपेक्षा अधिक रक्कम आमच्या पदरात पडली असती.वीकेंड होम्स उपयोगी पडतात का? भारतात ही पद्धत परदेशी लोकांकडुन,काय होऊन कशी काय आली मला कळत नाही .‘खेड्यामधले घर कौलारू’ सारखा सुंदर बंगला असावा या भावनेने बर्याच माणसांनी वीकेंड होम सेकंड होम्स घेतली. पण लाभली का?

वीक इन्वेस्टमेंट ठरली.

**

# 10 मी अशी का?गुलाम?

ही अर्धसत्य कथा ,ही विचित्र कथा दुर्गापूर येथील दुर्गाबाई आणि टिकोजीराव या जेष्ठ दांपत्याची आहे. आम्ही जेव्हा दुर्गापुर गावाला एक महिन्यासाठी इस्पितळात असलेल्या, रोगाचे साथीचे कामासाठी आलो, तेव्हा लॉकडाऊन सुरू झालं होतं .कुणी फार एकमेकांत मिसळून वागत नव्हते.पण तरीही गावातला इकडच्या तिकडच्या बातम्या मधून आणि कॉलनीतल्या लोकांच्या गप्पांमधून समजत झालं की टिकोजीराव आणि दुर्गाबाई यांना मागच्या वर्षी आदर्श जोडपं असा पुरस्कार मिळाला होता. दुर्गाबाई खूप सुधारलेली आणि सु गृहिणी होत्या. त्यांचा मुलगा गावात दुसरीकडे भाड्याने घर घेऊन आणि मुलगी जी 15 किलोमीटरवरील दुसऱ्या गावी राहत होती.

“No  doggy no honey eat now ,you are bad dog.”असे दुर्गाबाई त्या कुत्र्याला बोलत असायच्या. एक दिवस तो कुत्रा चौकात मरून पडला. आता कुत्रा मेल्यापासून दुर्गाबाई खूप नाराज असायच्या. हॉस्पिटलला जाता-येता मी कधीमधी दुर्गाबाईंना बागेत पाणी घालताना बघायचे.

पती-पत्नी दोघेही समजूतदार होते. दुर्गाबाई सु गृहिणी होत्या.  आशियाना नावाच्या एका टुमदार बंगल्यात  दोघ जण राहत होते.

**भाग 1**

**दुर्गाबाई:**

आज खरंतर सकाळपासून खूप कंटाळाच आला होता. लाडका डॉगी कुत्रा वारला.तेव्हा पासून तर मला हल्ली उदास असंच वाटतं. लोक म्हणतील, ‘ पाळलेला कुत्रा मरण्याचं या बाईला काय एवढे दुःख झालं? जगात करोनामुळे किती माणसांची, किती जवळची माणसं, मरत आहेत.वृद्धा आणि हीच कौतुक बघा.’ त्यामुळे मी माझं दुःख व्यक्त सुद्धा केलं नाही. आता खरं तर साठी नंतर मुलांजवळ राहणे म्हणजे सुनांच्या हातच बसून खाण्याचे दिवस आहेत.नातवंड सांभाळायचे दिवस आहेत.पण हल्लीच्या मुलांना स्वतंत्र राजा-राणीचा संसार हवा असतो. मुलगा आणि सून गावात दुसरीकडे राहतात. लेक मात्र सासुरवाशीण एकत्र कुटुंबात राहते. त्यामुळे चार दिवस तिच्याकडे जाऊन राहावं म्हटलं तर तेही जमत नाही. तिला म्हटलं,ये  तर ती त्या,ईथे येण्याला तयार नसते.

माझ्या घरात,मी, माझा नवरा,टिकोजीराव आहे .दांडगट आहे पण त्यांना कानाने ऐकू येत नाही. त्यामुळे आपण काही बोललो काय, आक्रोश केला काय ,काहीही केलं तरी कानावर काहीही पडणार नाही. अर्थात म्हणून ते मुकाट बसून राहतील असं नाही. दिवसभर जोरजोरात त्यांना ऐकू येत नसल्यामुळे,मोठ्या आवाजात टीव्ही चालू असतो. पाकक्रियांची चॅनेल सुद्धा सोडत नाही आणि मग हा पदार्थ कर,तो पदार्थ कर म्हणून कुरकुर करतात.

26/3/21.

देशात एक वर्ष होत आले होते. या लॉक बंदी /लॉकडाऊन मुळे जीव हैराण झाला आहे .काय करावं कळत नाही .वय जास्त असल्यामुळे मोलकरणींना घरात येऊ देता येत नाही. मुलगा वेगळा राहतो .त्याला मला सांगायला काय जाते की करोनात अजिबात मोलकरणीला घरात येऊ देऊ नका आणि जेवणाचे डबे पण लावू नका आणि बाहेरचा खाऊ नका. आम्ही काय भोगतो ते आम्हालाच माहिती आहे.घरी मला वर्षानुवर्षं गृहीत धरलेले आहे.नवरा भटकंती करी. त्यामुळे बाहेर खायची सवय होती .त्यानुसार घरी हे बनवून दे म्हणतात. अर्थात हे पदार्थ घरी बनवून त्यांना कसलीही चव, येत नाही.वडे समोसे,भजी,मटन हवे,म्हणून बनवते.पण काय बाहेरच्या पदार्थांना भैया चे हाताची चव असते किंवा त्यांची वर्षानुवर्ष हात बसलेली असतात.तशी चव येत नाही. भाजी आणायला सुद्धा माझा गुडघा दुखत असतो तरीही मी तशी कोपऱ्यापर्यंत जाऊन घेवून येते. कारण टिकोजी राव नवरा त्यांना ऐकू येत नाही. कुण्या गाडीनं ठोकलं तरी या करोना चे त्रासाच्या काळात काय करणार?मी जाते.करोना त सगळयात जास्त कुणाला झाला असेल तर ज्येष्ठ नागरिकांना झाला. आम्ही दोन्ही लसीची मात्रा घेतल्या. मला दोन्ही लसिना त्रास झाला ,पण नवऱ्याला काडीचा त्रास झाला नाही .त्यामुळे त्याने माझ्यावर नेहमीच वाक्य टाकले की "तू नाटक करते. तुझं नेहमीच काहीतरी दुःखते"

घरात एवढी काम ,एवढा ताण आणि असा हा बहिरा नवरा असल्यावर, बाईवर ताण तर येणारच ना! पण बाईला कधी कोणी समजून घेतलं का? बहिरा नवरा असल्यावर,तर बाईवर ताण तर जास्त येणारच ना !पण मला कधी मुलांनी

समजून घेतलं नाही. त्यात मुलगा सून नवरा सासर चे सगळे असे कामा पुरते येणारे ना ! मला कोणी बोलावून सहजच पण विश्रांती साठी ठेवून घेतलं नाही. त्यात मुलगा सून नवरा सासरचे सगळे टर उडवतात .चेष्टा करतात .येता-जाता माझी खिल्ली उडवतात. मी आपली ऐकून घेते .पिंजर्यातल्या वाघाला येणारे-जाणारे फालतू लोकसुद्धा दगड मारत असतात.

खरंतर मी खूप हुशार होते पण वयोमानाने थकवा येतो. बुद्धी ,शरीर पूर्वी एवढे चालत नाही .आता पूर्वीसारखी गती नाही .नाही तर घरी एवढे पाहुणे यायचे, मी सगळयांचा स्वयंपाक पाणी नीट करायचे .भाचे पुतणे सासरची माणसं सर्वजण यायचे आणि राहायचे. माझ्याकडे मी सगळयांचं माझ्या परीने तरी व्यवस्थित करत होते. ते पण संपल.आता मला काही झेपत नाही. काल पासून तर त्या बीड जिल्ह्यातल्या बातम्या मुंबईच्या बातम्या, उत्तर प्रदेश मधली परिस्थिती ,सगळं बघून मनातील नैराश्य आलं. अच्छे दिन अच्छे दिन म्हणून मोठी स्वप्न पाहिली होती. पंचवीस लाख खात्यात जमा झाल्यावर आपण दागिने करायचे जी आपण हा बंगला बांधताना मोडले ते दागिने घडवले असते असं ठरवलं होतं.बंगला दुमजली होता. वरच्या मजल्यावर नवरा त्याच्या खोलीत टीव्ही बघत असायचा .खालच्या तीन खोल्यांमध्ये हॉल किचन आणि एका खोलीत मी निजायचे. पलंग होता पण झोपायच्या खोलीत टीव्ही नव्हता .हॉलमध्ये टीव्ही होता हॉलमध्ये पलंग नव्हता.हॉल छोटा असल्यामुळे जेमतेम खुर्ची टीव्ही टेबल मावत होतं. हॉलमध्ये टीव्ही बघत बसायचे .मी कधी कधी निजे.पण हल्ली हल्ली मला सगळयाचाच कंटाळा आला. त्याच त्याच

मालिका नको.मालिकांमध्ये तरी काय दाखवतात दुष्टांचा विजय! आयुष्य असच असतं. का? खरंच आयुष्यात नेहमी दुष्टांचा विजय होत असतो ?का ?देशात घडणाऱ्या घटना बघून तर काय करावं तेच कळत नाही .ऑक्सिजन हवा म्हणून आरडाओरड केली तर म्हणे पोलीस स्टेशनवर जाऊन तक्रार घेऊन या माणसाची संपत्ती हडप करणार. असे आज यांनी सांगितलं .काय बोलायचं ?निवृत्ती प्रवृत्ती प्रकृती काही आहे की नाही? सत्तेसाठी चाललेली भांडणे बघून असं वाटतं की ही माणसं सुद्धा तर म्हातारीच तर आहेत .आपल्या वयाची आहेत. या वयात त्यांना देह प्रश्न त्रास देत नाही? आपल्याला मात्र या सगळ्या मानसिक खच्चीकरणाचा त्रास होतो. यामुळे किंवा वर्षानुवर्ष काम करून,माया, बाळंतपणामुळे बाई खचते की काय? असा प्रश्न मला पडतो .तसा विचार केला तर सोसायटीत अनेक अनेक बंगले आहेत. बऱ्याच घरी डबा येतो. काही घरी नवरे रस्त्यापर्यंत जाऊन,येताना भाजीपाला दूध,फळ,वडे घेऊन येतात. आमच्याकडे दूध घरी येते त्यामुळे तो प्रश्न नाही .पण दूध वाल्याला काही काम सांगितलं तर दूधवाला म्हणतो मी 100 घरी दूध टाकतो. सगळ्यांची खरेदी करत बसलो तर मला वेळ मिळणार नाही. कालपासून मला खूप नैराश्य आले. जुन्या सोडून गेलेल्या माणसांची आठवण येते. मी काल बहिणीला फोन केला आणि म्हटलं ये चार दिवस माझ्याकडे राहायला.

“दुर्गा ग वेडी का? करोना च्या काळात कोणी कोणाकडे जात नाही. चार दिवस कुठला बोलावते?”

“मग निदान एक दिवस गप्पा मारायला तरी ये सकाळी ये संध्याकाळी परत जा. संध्याकाळी घरी गेल्यावर आंघोळ कर .वाफ घे. वाटल्यास माझ्याकडे आल्यावर पण अंघोळ कर.जेवायला ये बरे.भेटणे बरे असते”मी.

ती बरं म्हणाली. आली. दिवस भर आम्ही खूप रमलो. तिच्यासाठी मी पुरणपोळया केल्या .भरली सवाष्ण म्हणून आम्ही दोघी जणी नवीन लग्न होऊन एकाच वेळी सासरी गेलो होतो. तशी ती पण माझ्यासारखीच सुखी अन् दुःखी आहे. म्हणजे समदुःखी ,अतिसुखी असे नाही.दोघी संसारात होतो.ती.घरी परत गेली.

वरवर ओके असते.यावर लोक असे म्हणतात की यांना सुख टोचत होतं .मुलं-बाळं संसार नवरा परदेशी प्रवास ही तर सगळेच करतात .सुखाचे मापदंड हेच आहेत का ?एका फोरेन टुरला जाऊन आली की एक वर्षभर माणसं स्वर्गात तरंगत असतात. एक वर्षाने दुसऱ्या टूर ची तयारी करतात .आता कोरोना काळात म्हणा त्यामुळे बाहेर फिरणे बंद झाल्यामुळे 24 तास मी आणि माझा नवरा डोक्याला डोकं लावून बसलेला असतो. कुणाला आपली दुःख काय सांगायची? सांगता येणारी दुःख ,न सांगता येणारी दुःख ,दिसणारी दुःख ,न दिसणारी दुःख ,त्यापेक्षा गुडघे दुखतात, कंबर दुखते ,डोकं दुखतंय ही कारण सोपी असतात .त्यात दुनियाभर करोनाच भय आहे.काही झालं तर त्या हॉस्पिटल मध्ये पडून रहावे लागेल .अपंगत्व येईल सगळं नकोसं वाटतं .दोन दिवस झाले घसा खवखवतो आहे.कुणाला सांगणार सांगितलं तर नवरा म्हणेल चला टेस्ट करायला जाऊ या !जणु काही ती पण शिक्षाच आहे आणि टेस्ट

करण्याचे पण भय सगळीकडे पसरवले होते. काय करावं कळेना .रात्री बराच वेळ झोप आली नाही .ताई काल येऊन गेल्यामुळे तशी मी ताजीतवानी झाले होते .पूर्वीचे दिवस असते तर दोघी भटकलो असतो एखाद्या देवळात जाऊन बसलो असतो. बांगड्या भरल्या असत्या .देवीची ओटी भरली असती.गडावर जाऊन आलो असतो. पण कोरोनाने सगळे बंद केले आहे .सगळे अंतर सामाजिक अंतर ठेवा सांगितलं असं म्हणाल तर मनांमध्ये पण एक प्रकारे अंतर आली आहेत.तर ताईची भेट झाली. तरी पण आम्ही दोघी खूप आनंदात होतो.

नंतर दोन-तीन दिवस त्या आनंदात त्या आठवणीत माहेरच्या आठवणी काढण्यात गेले. झालेले सर्व अन्याय पण वारंवार आठवत राहिले .तरी नवऱ्याला तर कशाचाच काही पत्ता नव्हता .त्याला कधी माझ्या मनाचा तळ उलगडला नाही .त्याचे जोरजोरात टीव्ही लावणे,फोन जोरात चालू होता. त्यात मी एकदा जोरात किंचाळली कारण अंगावर पाल उडी मारून आली. पण त्याला त्याचा आवाज ऐकू पण आला नाही. कुठलाही आक्रोश ऐकू येईल या पलीकडे पती-पत्नीचं नातं पोचलं का? इतका एकमेकांना गृहीत धरलेले असते का? बोट कापलं भाजला तरीही हा तुझा नवरा म्हणतो,धांदरट! त्यामुळे त्याला सांगायला नको की माझे बोट कापलं गेलं. इतक्या न्युट्रल नातेसंबंधांवर आपण आलो आहोत.

आज सकाळी नवरा नेहमीप्रमाणे वरती चहा-नाश्ता खाऊन परत टीव्ही लावून बसला होता. मी खाली बागेत येऊन बसले .मोगऱ्याचा गंध पसरला होता. शेजारीपाजारी बंगले होते सगळे गप्प झाले होते.पूर्वी घरावर गाण्याचा

बोलण्याचा गप्पांचा मुलांच्या खेळण्यात आवाज यायचा .आता सारं काही गप्प गप्प झालेय. कोणी जोरात गाणी लावली तरी लोक म्हणतात काय माणूस आहे? देशात मृत्यूचं तांडव चालू आहे आणि ह्यांना गाणी सुचत आहेत. तरी माझ्या नवऱ्याला ऐकु येत नाही त्यामुळे माझ्या घरातील आवाज येणं हे लोकांनी समजून घेतले आहे.सकाळ झाली मी बागेत बसले .मोगऱ्याचा मस्त सुगंध पसरला होता. पण वाटत होते दूरवरुन कुठूनतरी मुल पाण्यात पोहोण्याचा आवाज आला.थोड बरं वाटलं मला आठवलं पंतप्रतिनिधी यांनी बांधलेली ही सोसायटी तील मोठी विहीर तिथे मुलं जमून खेळत असतात. पाण्यात पोहत असतात. मला आठवलं बालपणी मला डबा लावून द्यायचे, आम्ही सगळी मुले मोठ्या विहिरीत पोहायचो. खूप छान वाटे.नाकातोंडात पाणी जायला लागलं कि न शिकवता सुद्धा पोहण्याची कला जमायची. आई-वडिलांनी वाढवलं,बर वाढवलं पण खूप प्रेम खूप लाड माहेरी पण झाले नाही .एक प्रकारे मुलगी ही नकोशी असते असेच भाव माहेरी आणि सासरी दोन्हीकडे असायचे. लग्न होऊन सासरी आल्यावर सासुबाई नेहमी शेजार्यांना इतकी छान सुन मिळाली. ती अमकी ती गोरी आहे. अमुक नोकरी करते. अमक्याना दिवाळीत अंगठी कपडे वस्तू या दिल्या. बहिणीच्या लग्नात सूट दिला. मोटरसायकल दिली असं कौतुक सांगायच्या. त्यावरून त्यांना काहीतरी अपेक्षा आहे हे कळत होतं. पण मी पण दुर्लक्ष केलं .कारण माझ्या आई-वडीलांनी कडून काहीही सुटलं नसते.हे मला माहिती होत.

मुलं काय खेळतात मजा करतात ते बघावं तरी ,अस म्हणून मी विहिरीच्या दिशेने आले. विहिरीवर गेल्यावर बघते तर मुले पाण्यात खेळत होती .बालपणात तर आयुष्य किती सुंदर असते.निसर्गरम्य असा निसर्ग हिरवाई सुंदर बंगला वर करणीत सगळं छानच होतं आणि बूट हा कुठे चावतो हे बूट घालणार्यालाच कळतं. तसं झाले आणि या करोना काळामध्ये आलेल्या नैराश्यामुळे अजून भीती वाटते कसं होईल आपलं? हे बाळ पोटातून दुनियेत येते,रडते. जग सोडून जाताना पण खरंच इतक वाईट वाटत असेल का? माझ्या एका जाऊ बहिणी तेविसाव्या वर्षी आत्महत्या केली होती. कसे झाले असेल तिला? असं वाटलं या पाण्यात उतरून पोहाव. तशी लहान पण पोहणारी पोरं म्हणाली,

“ आजी आज कसं काय, तुम्ही बहिर्या ची सेवा करायची सोडून इथे आला?”मला राग आला.

“ का रे पोरांनो काही आई-वडिलांनी वळण लावले की नाही? असं बोलता का?घरी जा आणि सकाळी सकाळी विहीरी वरती पोहाव.उन पडायला लागले की कुठे पोहत बसला?”

मी

“ जातो.खोबरा वडी आणता का?मजा येईल.”पोर.

पण पोर काही जायला तयार होईना. मी परत आले. घरी स्वयंपाकघरात कामाला लागले आणि नेहमी प्रमाणे सारे केले. नेहमीप्रमाणे नवऱ्याने,

“ हे असं हवं होतं ते तसं तुला काही येतच नाही.कपडे बघ तुझे!अग मजा करायची आणि उद्यापासून हे असं वेगळ्या पद्धतीने कर.”वगैरे वगैरे कुरकुर केली .मी काहीच बोलले नाही .अर्थात माझ्या गप्प बसण्याचे हे निषेध करणे,पण तरी सुद्धा त्यांना काही फरक पडत नाही .अशा परिस्थितीत आम्ही मी आणि तेही आले आहोत. आणि मी थकून गेले आहे. शेवटी मी परत बागेत येऊन बसले. जेवण केलेलं भांडी तशीच सिंकमध्ये टाकली.काम माझी, म्हणून सकाळी काय रात्री काय आज काय करायची आहेत. म्हणून मी बागेत घेऊन बसले. मोगरा थोडा मलूल म्हणून झाला होता .पण त्याचा सुगंध कुठेतरी रेंगाळत होता. विहिरीवरून अजूनही मुलांच्या खेळण्याचा आवाज येत होता. काय हे आई वडील पोरांना इतका वेळ त्या विहीरीत खेळायला सोडलं. एक वाजता चालत चालत या पंत प्रतिनिधींच्या विहिरीपर्यंत मी आले.पोर खेळत होती पण मला बघून एक जण म्हणाले ,

“आता मी जेवायला जातोय.आम्हाला तुम्ही तुमच्या हातचे आंबा खोबर्याच्या वड्या आणा.”

“ आणि उद्या आणिन. उद्या करते.” असं मी त्या पोरांना म्हणाले .पोरं हसत-हसत घराकडे गेली. विहीर शांत झाली .डुबक्या मारणारे पोरांचा आवाज कमी झाला. पाण्यावर उठलेले तरंग शांत झाले. कान्या कपारीतून जलचर वगैरे सर्व आतील ठिकाणी असतील ती पण शांत झाली. दुपारी निवांत सुस्तपणा सगळ्यांवर पसरताना वाटले काय निसर्ग सुद्धा नाश्ता/जेवण करून दुपारची वामकुक्षी घेत होता. मला एकदम नैराश्य दाटून आलं .करोनाच नैराश्य

,आजूबाजूच्या परिस्थितीचे नैराश्य, माणसं मरत असताना स्वतःचे जीवन उपभोगणारे इतर नट वगैरे लोकांचं नैराश्य ,परदेशात राहून भारताच्या राजकारणात लुडबुड करणाऱ्यांचे उपदेश आठवले.फक्त लोकांना आणि करोनाने मरणाऱ्या माणसांची चिंता आहे ,तरीही राजकारण?पैशासाठी? मरणाऱ्या लोकांचे खूप उदासीन नैराश्य पोटात भरून आल्यावर मी पाण्यात उडी मारली .मला पोहता येत होतं पण मला पोहायचं नव्हते. हे सगळं आता माझ्या साध्याश्या सहनशक्तीच्या पलीकडे गेलं होतं. नाकातोंडात पाणी जाऊ लागलं एकदा वाटलं वर याव .मी पट्टीचे पोहणारी होते. पण मलाच वर यायचं नव्हतं. मी त्या पाण्याच्या स्वाधीन स्वतःला करून दिलं.

**भाग 2**

मी टिकोजी राव.मी दुर्गाबाईंनी नवरा आहे.दुपारी साडेतीन वाजता बायको न चुकता मला चहा आणि बिस्कीट चा पुडा घेऊन वरती येते. आज कशी आली नाही? म्हणून मी खाली बघायला गेलो. मला वाटलं ,रिकामी बाई ,शेजारी गप्पा मारायला बसायला गेली असेल. थोडा वेळ वाट पाहिली. बाथरूम बागे मध्ये पाहिलं. पण कुठे जाग नव्हती.चहा तयारी झालेली नव्हती. टीव्ही बंद होता. शेजारी विचारलं तर म्हणाला,

“ नाही आज मला त्या दिसल्याच नाहीत.” मुलं खेळत होती त्यांना विचारलं, ती म्हणाली,

“ विहिरी वर आल्या होत्या.दुर्गा आजी आम्हाला म्हणाल्या, आंब्या खोबर्याच्या वड्या करून तुम्हाला खायला घालेन. बनवल्या का?”

“आजी हरवली आहे”मी .

गुलाम बायको,कोणाला आवडत नाही ?विजय तेंडुलकरांच्या एका नाटकात वाक्य आहे ना, माझ्या घरी मी राजा आहे. माझ्या हाताखाली एक गुलाम म्हणून बायको असली बस झालं. बाकी आयुष्यात सुख म्हणजे नक्की काय असतं ?मधुबाला आणि अप्सरा पत्नी बनून जर त्या आपली आज्ञा त्या ऐकत नसतील तर काय उपयोग? हाताखाली घरगडी हे स्वर्गसुख असतं. तशी बायको माझी गुलाम आहे. थोडी बावरी आहे पण आयुष्यभर किती कष्ट ती करते .हे मला जाणवलं .पाच वाजले चहा करून घ्यायला पाहिजे होता. मला

त्याचा सुद्धा कंटाळा आला आहे.आज ती नाही मला चहा करायचा कंटाळा आला. शेजारच्या बाईने चहा आणून हातात दिला. त्यात बिस्किटे खाल्ली .ही बया गेली कुठे ?शिक्षा म्हणून आल्यावर तिला खाडकन थोबाडीत मारायचं ठरवलं होतं.कोरोना म्हणजे परगावी कुठे जाणार नाही .मुलाकडे पण मी दहा वाजता फोन केला. तिकडे गेली नव्हती. बहिणीकडे गेली नव्हती. शेजारी बसायला गेली नव्हती परत मला खाव खाव झाली. संध्याकाळी यायला पाहिजे होत.स्वयंपाक करावा लागेल .ते संध्याकाळचे जेवण बनवायला तरी दुर्गा यायला पाहिजे. बावळट बाई 17 देवळांमध्ये फिरते अशी कुठली देवळे पावतात का? इतके देव देव केलं तरी माझ्या सारखा नवरा मिळाला.बहिरा आहे पण काम करु शकतो पण कामचोर आहे.मी गोरा आहे म्हणून ती खुश आहे .बाकी घरी महिलांची स्थिती पाहता तिची स्थिती काही फारशी चांगली नाही हे मला जाणवलं. साडे सहा सात झाले थोडासा अंधार पडायला लागला. विहीरीवर पोहणारी मुलं परत आली आणि ती म्हणाली “आजोबा विहिरीवर मोबाईल आणि काढलेल्या चपला दुर्गा आजीच्या तिथे आहेत.”

“ आजी इथे चपला, मोबाईल विसरून कुठे गेली का? तुमचं काही भांडण झालं होतं का?” शेजारणीने विचारलं.

“ नाही तसं काहीच झालं नाही.”मी “अहो ते काय तिला त्रास देणार? बहिरा माणूस त्याला काही ऐकू येत नाही.”एक

“ऐकू येत नाही, पण तोंड वाजवता येतं.”एक अन्य शेजारी म्हणाला. मी एकदम गप्प झालो.विहीरीवर काय आहे ते तिकडे बघावे म्हणून चप्पल घालून

विहिरीच्या दिशेने चालू लागलो .झपाट्याने चालत गेलो तिथे बघितलं तर मोबाईल आणि तिच्या चपला तिथं होत्या पण दुर्गा नव्हती .सगळीकडे दुर्गा आजी हरवली ही बातमी पसरली.लोक इकडे तिकडे शोधायला लागले. आजारी होत्या.

"गुडघ्या दुखायचा कुठेतरी भाजी आणायला गेली तिथे चक्कर येऊन पडली का? असतील किंवा करोनाने बेशुद्ध वगैरे पण पडु शकतात."एक "माणूस कोरोना झाला की मरेल एवढी मोठी साथ आहे."विहीण. लोकसुद्धा अंतर राखूनच शोधाशोध करत होते.माझी बायको दुर्गा कुठे सापडली नाही. रात्रीच्या वेळी नगरसेवक आले.

" काय झालं पत्नी हरवली कळलं. पोलीस कंप्लेंट केली का ?"

मी नाही असं म्हणालो. नगरसेवकाने सांगितलं

"रात्रभर वाट पहा नाहीतर आपण सकाळी पोलीस कम्प्लेंट करू.सापडतील" असा दिलासा दिला. मुलगा-मुलगी बहिणीचा फोन आला.त्यांनी फोनवर चौकशी केली कारण कोरोनाच्या भीतीमुळे कोण कोणात मिसळत नाही आणि कुणाला कुणाची पडली नाही.

सकाळी नगरसेवक आला. "सीसीटीव्ही बघूया!. आजी कुठे गेली कळेल."अस म्हणून सीसीटीव्ही बघितला. सीसीटीव्ही बघितला तर त्यात लाल साडी घालून दुर्गा विहिरीच्या दिशेने जाताना दिसते आहे असंच सीसीटीव्हीत बघून त्या नगरसेवकाने सांगितले. आम्ही पोलीस स्टेशनला

जाऊन पत्नी हरवल्याची तक्रार केली. सीसीटीव्ही तिकडे जाताना दिसली असे सांगितलं विहिरीत उडी मारून तिने तिचा गुलामीचा अंक संपवला होता का? या वयात मला कोणी दुसरा गुलाम देणार आहे ?मुलांना मी नको होतो.तिथेच राहा म्हणाले.आता माझ कुठलं लग्न होईल? त्यामुळे आता घरची काम मलाच करायला हवी. मी चहा बनवला मला जेमतेम खिचडी बनवता येत होती. खिचडी बनली. मुलगा-मुलगी कुणीही मला आमच्या घरी राहायला या म्हणाले नाही .विहिरीच्या आत दोन दिवसांनी प्रेत सापडेल, हत्या आत्महत्या अपघात काय असावा अशी चर्चा गावभर होईल.

"पण आजी विहिरीवर गेले असतील पूजा करायला कारण त्या फार धार्मिक होत्या आणि पाय घसरून पडल्या असतील"

असं शेजार म्हणाले. त्यामुळे अपघात मिळून तो प्रश्न मिटेल.पण प्रेत सापडले नाही.

मला तरीही मदत करण्याची इच्छा नसल्यामुळे, दिवस घालायला कशाला कशाला कुणीही आले नाही. परत मुलं-मुली बहीण-भाऊ कुणीही आलं नाही माझे नातेवाईक सुद्धा आले नाही आणि त्यांच्या बद्दल काय बोलायचं? माझ्या बद्दल त्यांच्या मनात काय आदर होता तो त्यांनी त्यांच्या वागणुकीने दाखवून दिला.

याच घरात घरकाम मला होईना बायकोने डबा लावु नये म्हणणारा मी ती गेली लगेच मी डबा लावून घेतला. परिस्थिती बदलली की माणसांचे निर्णय

बदलतात. माणसांशी  माणसांचे फारसे ओढीची नाती नसतात .पण तरीही आता माझ्या गुलामीचा अंक सुरू झाला.

एक गोष्ट असते. असं म्हणतात आणि गाढव एकत्र राहतात आणि घोडा आयुष्यभर भरपूर शक्ती असते तरी तो स्वतःचा अर्धवट काम करतो.एक दिवस गाढव अति कामाने मरून जातो .मालकाला काय पडलेले असते ?तो मालक असतो. मालक गाढव मेल्यावर गाढवाला फेकून देतो आणि काम घोड्यावर लादतो.गाढव किती काम करायचं आणि आपल्या शरीरात शक्ती असून आपण सक्षम असूनही गाढवावर किती लादत होतो ते कळत. पत्नीला गाढव म्हणायची माझी इच्छा नाही .हो मी घोड्यासारखा सक्षम शारीरिक दृष्ट्या गुटगुटीत होतो. पत्नीचे अवघड बाळंतपण झाले होते .वेळप्रसंगी ती दमली हताश झाली होती. तरीही मी तिच्यावर वारंवार काम लादत आलो. तिला मी गुलाम समजत राहिलो .सर्व कामांची अपेक्षा मी तिच्याकडूनच केली .आखूड शिंगी बहुदुधी अशी गाय हवी. ती लाल कपिला गाय हवी. तिने भरपूर दूध द्यायला हवे. अशा सर्व अपेक्षा मी पत्नीकडून केल्या. मी राम नव्हतो पण अपेक्षा केली ती सीता व्हावी. मी राजा नव्हतो आणि वाटले तिने माझ्या पायाखालची दासी रहावं. या अपेक्षा संपली.ती गेली. माझ्या गुलामीचा काळ सुरू झाला आहे.

## भाग तीन

## दुर्गाबाई

मी दुर्गाबाई !मी पाण्यात उडी मारली. गार पाण्याने चित्त वृत्ती उल्हसित झाल्या. मी पाण्यात उडी मारताच काही पण मासे वळवळ करू लागले. कासव सुद्धा अस्वस्थ झालं .विहिरीतल्या मोठ्या मोठ्या उगवलेल्या झाडांवरती बसलेले सुगरण पक्षी कुरकुर आवाज करत माझ्या येण्याबद्दल निषेध व्यक्त करू लागले. पण मला त्या पाण्यात खूप छान वाटलं. थोडावेळ पाण्यात डुंबली या नंतर मी बाहेर आले. माझ्या चित्तवृत्ती उल्हसित झाल्या होत्या .मोबाईल आणि चपला मी तिथेच सोडल्या आणि सरळ रेल्वे स्टेशनच्या दिशेने चालू लागले. रेल्वे स्टेशनवर पोहोचले जी गाडी मिळाली ती गाडी पकडून मी त्या गाडीत बसले. माझ्याजवळ पैसे पण नव्हते पण सुदैवाने काहीच अडचण आली नाही आणि मी हैदराबाद स्टेशनवर उतरले .हैदराबाद स्टेशनवर उतरल्यावर बाहेर पडल्यावर मला भीती वाटू लागली. भारतात आता बलात्काराची भीती वाटणे एवढं तरूण वय नव्हतं, तरीही बलात्काराची भीती स्त्रीला प्रत्येक वयात असते. मी सरळ स्टेशन जवळच्या एका माणसाला मोडक्यातोडक्या हिंदीत इथे वृद्धाश्रम कुठे आहे ?ते विचारलं. त्यांनी मला एक वृद्धाश्रमाचा पत्ता सांगितला .माझ्याकडे बघून तो म्हणाला

“माई जाणार कसं ?पैसे आहेत का तुमच्याकडे?”

मी म्हटलं

“नाहीये! मला सोडतो का ?”तो ठीक आहे असं म्हणाला. त्याने मला वृद्धाश्रमाच्या दारात सोडले. वृद्धाश्रम साधाच होता. मी आत गेले . बाईंना म्हटलं,

“ माझ्याकडे पैसे नाहीत .पण मी तुमच्याकडे स्वयंपाकाचं काम करेन. काही ठराविक वेळेत तरी निदान मी सकाळची काही तास 2/4 तास वगैरे असं काम करेन. पण मला तुमच्या वृद्धाश्रमात ठेवून घ्या.”मी

बाईंनी माझ्याकडे निरखून पाहिलं आणि त्या म्हणाल्या.

“ ठीक आहे आता सध्या तर आत या. आंघोळ करा. स्वच्छ कपडे घाला कालच एका दानशूर बाईने इथे राहणाऱ्या स्त्रियांसाठी गाऊन दान केले आहेत. तुम्हाला चालणार असेल तर गाऊन घाला .साडी मात्र नाही.”

“ ठीक आहे”असं म्हणून मी तो गाऊन घातला. अगदी झुळझुळीत आणि मोकळा होता.स्वच्छ वाटलं.एका काकींनी मला बोलावलं त्यांच्या खोलीत एक पलंग टाकून माझी त्या खोलीतची राहायची सोय करण्यात आली. सकाळी तीन तास मी स्वयंपाकाच्या खूप काम करते. त्या बदल्यात मला इथे राहायला मिळतं .कष्ट इथे आहेत, कष्ट तिथे केले.परिस्थिती बदलून गेली आहे. पण समदुखी स्त्रियांबरोबर गप्पा मारायला मिळते. स्वतःचा ही काही खास वेळ मिळतो. आणि मुख्य म्हणजे एक बदल मला मिळाला आहे .माणूस परिस्थितीचा गुलाम असतो .

कदाचित माझा शोध घेत नंतर माझा नवरा मुलं वगैरे मला घेऊन जातील पण आज तरी मला मिळालेला हा बदल ,स्वातंत्र्य,सुखावह वाटत आहे.वाटते,स्त्रीने गुलामगिरीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न तरी करून बघावा, यश मिळणे न मिळणे देवाच्या हातात असते.

काही दिवस तरी बंडखोरी करुन पहावी.

आम्ही आधुनिक काळातील नवनायिका आहोत.जगण्याचा हक्क नाही असे नाही.पण स्वातंत्र्य आणि हिम्मत आणि आत्मविश्वास नाही.या कथेत बंडखोरी आहे,चांदणवेळीची हताशा,नाराजी आहे.भूतकाळ बदलता येत नाही.पण वर्तमानकाळ जगुन बघायचा प्रयत्न करुन बघायला काय हरकत आहे?.

समाप्त

***

शुभांगी पासेबंद यांचे अन्य प्रकाशित साहित्य

१. मयूरमासा कादंबरी - 2012 - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबईतर्फे (नवोदित अनुदान योजने अंतर्गत, हार्ड कॉपी) मायबोली प्रकाशन मुंबई

२. नाते शब्दांचे -ललित - 2014 पुणे-हार्ड कॉपी. घरकुल प्रकाशन पुणे

३. मुलीही जन्माला येऊ द्या- ललित-2015- द. कृ. सांडू पुरस्कार बक्षिसपात्र -पुणे-हार्ड कॉपी घरकुल प्रकाशन, पुणे.

४. रंगकेशरी - कादंबरी- इ-बुक 2015 बुकगंगा डॉट कॉम. उद्वेली बुक्स

५. बिलिव्ह इट ऑर नॉट- कथासंग्रह - इ-बुक - 2016 बुकगंगा डॉट कॉम, विनामूल्य

६. कस्तुरी पक्षी- इ बुक- कादंबरी- इ साहित्य -2016 विनामूल्य

७. एक दिवा लावूया - स्तंभ संग्रह – 2016 बुकगंगा डॉट कॉम

८. जाईन मी विचारीत रानफुला- स्तंभ संग्रह – 2016 बुकगंगा डॉट कॉम

९. राहू दे घरटे- इ कादंबरी- 2016 विनामूल्यwww. esahity. com

१०. मी तुझेच गीत गात आहे- इ साहित्य - कादंबरी-2016 विनामूल्य

११. कृष्णकुसुमांजली-२०१६-स्तंभ संग्रह इ साहित्य- विनामूल्य

१२. आम्रकुसुमांजली -२०१६- स्तंभ संग्रह- इ साहित्य- विनामूल्य

१३. Why did I fall in love? novel, Amazon. com, Create space, ई बुक. २०१२. 3$

१४. मधुर दंश कथासंग्रह - नवल प्रकाशन २०१६ पुणे, हार्ड कॉपी

१५. बेलाची पाने-स्तंभ संग्रह- ई बुक-बुकगंगा डॉट कॉम-२०१७एप्रिल

१६. रानफुलांचे थवे स्तंभ संग्रह -ई-साहित्य-२०१७ एप्रिल

१७. केशरबाग-विचक्षण प्रकाशन= ई बुक स्तंभसंग्रह- जुलै २०१७ शिरपुर=

१८. कुठे शोधिशी रामेश्वर अन् कुठे==२०१७अनघा प्रकाशन ठाणे

१९. दीपज्योति नमोस्तुते-स्तंभसंग्रह-ईबुक-२०१८

२०. कशाला ऊद्याचि बात -कथासंग्रह=पुणे-2018 नवल प्रकाशन

२१. Unholy water. bookganga. com. ईबुक.

२२. तू ऐकतो आहेस ना? ई बुक कवितासंग्रह = Bookganga. com

२३. नक्षत्रबन =अनाहत प्रकाशन पुणे=कथासंग्रह=पुणे-2019

२४. प्राजक्ताची फुले, स्तंभसंग्रह. ई-साहित्य 2019

२५. त्या तिथे पलिकडे कथासंग्रह, नवल प्रकाशन, पुणे2019

२६. स्वरसावल्या कथासंग्रह. अनघा प्रकाशन, ठाणे, 2019

२७. माझा मधुसंचय ईसाहित्य, स्तंभ 2020

२८. परिकथेतील राजकुमारा ईसाहित्य कादंबरी : सप्टेंबर 2020

२९. सागरकिनारे: ऑडिओ बुक ई साहित्य. कथा-संग्रह. www eSahity. com

३०. या सुखांनो या, उद्वेली बुक्स 24/11/2020

३१. मन शुध्द तुझं, स्तंभ संग्रह २०२१ हे पुस्तक

३२.साधी माणसे स्तंभसंग्रह बुकगंगा डॉट कॅाम.विनामूल्य

33 सुखसंवाद हे पुस्तक स्तंभ संग्रह- ईसाहित्य

34. डाव मांडून मांडून मोडू नको-कथासंग्रह-आगामी,पुणे,नवल प्रकाशन

३5. पॅरिस स्पर्श, पर्यटन आगामी पुणे

36 डाव मांडुन मांडुन मोडु नको.आगामी

37 पाचुची बासरी

सर्व पुस्तके ई बुक स्वरूपात उपलब्ध आहेत. ठाणे नगर वाचन मंदिरात वाचनासाठी उपलब्ध आहेत.

ई साहित्यची पुस्तके विनामूल्य उपलब्ध आहेत.

काही पुस्तके प्रकाशकांकडे विक्रीसाठी आहेत.

***

Biodata-2021 3१-03-2021

1. Shubhangi Chandrashekhar Paseband, Phone: 9869004712, 02225345992

2. M. Sc. B. Ed. Certificate course in Journalism, Diploma in performing Arts.

3. About 400 columns published in Loksatta, Dainik Aikya (satara), Prahaar, Pudhari, Gramodhhar (satara), Gavkari (Nasik).

4. Address: 202 Anandi Bhuvan, Veer Savarkar Marg, opp. Maharashtra Vidyalaya, Thane (West) 400602.

5. Retired as Branch Manager from a Nationalized bank in 2012.

6. I Write stories and articles, Perform programmes

Mulihi Janmala Yeu Dya…Marathi, Kya Itni Buri Hoon Mai Maa- Hindi (both with message to stop female foeticide), Manachi Mashagat (about mental health), Pasaydaan (telling students about fraternity)

7. Other appreciations and prizes: TMC Samaj Sevika Puraskar 2008, Maharashtra Deep Puraskar 2008, Maharashtra deep puraskar 2009, Samata sahitya academy, Savitribai Fule puraskar 2008.

8. Mumbai Marathi Granth Sangrahalaya Kavi Prafull Datta Kushal Sampadak prize 2016

9. D. K. Sandu, best book award 2016,

10. Thane Municipal Corporation, Thane Gaurav puraskar 2016.

11. First novel Mayurmasa was published in Navodit Anudaan Yojna of Maharashtra Rajya Sahitya Sanskriti mandal 2012.


12. Waman Rege puraskar 2020.

13. Blog writing in a different creative way.

Till 15. 10. 2020, 30 books of various genre published (List Enclosed)


# शुभांगी पासेबंद यांची पुस्तके.

त्या कव्हरवर क्लिक करताच ते पुस्तक हजर होईल



















Biodata-2020 19.5-2020



1.Shubhangi Chandrashekhar Paseband,

Phone:9869004712, 02225345992

2. M.Sc. B.Ed. Certificate course in Journalism

Diploma in performing Arts

3.about 350 columns published on loksatta, dainik aikya(satara), prahaar, pudhari, gramodhar(satara), Gavkari(Nasik)

4. Address

202, Anandi Bhuvan, Veer Savarkar Marg

opp Maharashtra Vidyalaya

Thane (West) 400602.

5. Retired as Branch Manager from a Nationalized bank in 2012

6. I am Writing stories and articles in various magazines, with a social message.

7. Perform programmes

Mulihi Janmala Yeu Dya…(Marathi), Kya Itni Buri Hoon Mai Maa (Hindi) (both with a message to stop female foeticide)

Manachi Mashagat (about mental health) Pasaydan (telling students about fraternity)

8. Other appreciations and prizes

TMC Samaj Sevika Puraskar 2008

Maharashtra Deep Puraskar 2008

Maharashtra deep puraskar 2009

Samata sahitya academy, Savitribai Phule puraskar 2008

9.Mumbai Marathi Granth Sangrahalaya


Kavi Prafull Datta Kushal Sampadak prize 2016


10|d.k.sandu, best book award 2016,


11Thane Municipal Corporation,Thane Gaurav puraskar 2016

□□□□□



**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.**

**शुभांगी पासेबंद यांचे हे ई साहित्यवरचे चौदावे पुस्तक.**

शुभांगी पासेबंद या एक ज्येष्ठ लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या. आजवर त्यांची तीसहून अधिक पुस्तके विविध मान्यवर प्रकाशनांतर्फ़े प्रसिद्ध झाली आहेत. त्यांना आजवर अनेक साहित्यिक व सामाजिक पुरस्कारांनी नावाजले गेले आहे. अनेक व्यावसायिक प्रकाशक त्यांना मानधन देऊन त्यांची पुस्तके प्रकाशित करायला तयार अहेत.

पण शुभांगीजी आपली काही पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३७), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता

चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३४), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२१), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(८), श्याम कुलकर्णी(६), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अरुण कुळकर्णी(१२) अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(२), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(२), बंकटलाल जाजू (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।